अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

जून २०११ । किंमत १५ रुपये















'ग्रोईंग अप बिन लादेन' या पुस्तकाचे प्रकाशन करताना ॲड. उज्ज्वल निकम, श्री. अरुण शौरी, श्री. सुनील मेहता, मेजर शशिकांत पित्रे, अनुवादक बाळ भागवत आणि श्री. अनिल मेहता.



सूर्यकांत जाधव यांच्या 'अस्मिता'या कादंबरीचे प्रकाशन मंत्रालयात मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते गृहराज्य मंत्री सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या उपस्थितीत झाले.

◆ जून २०११
◆ वर्ष अकरावे
◆ अंक सहावा

# मेहता मराठी ग्रंथजगत

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **साहित्यवार्ता** | **१०** |
| **विशेषवार्ता** | **४०** |
| **पुस्तक परिचय** | |
| **ग्रोईंग अप बिन लादेन** | |
| : अनु. बाळ भागवत | **४६** |
| **जोहार माय बाप जोहार** | |
| : मंजुश्री गोखले | **५४** |
| **अंकरहित शून्याची बेरीज** | |
| : अनु. अंजनी नरवणे | **६०** |
| **आनंदाचं पासबुक** : श्याम भुर्के | **६८** |
| **पुरस्कार** | **७६** |
| **वाचकांचा प्रतिसाद** | **९७** |
| **श्रद्धांजली** | **९९** |
| **बालनगरी** | **१०४** |
| **दिवाळी अंक स्पर्धा** | **१११** |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
Extension **(ग्रंथजगत विभाग) -२२७/२४३**
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु.**
**३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## नवे तंत्रज्ञान - नवे बदल

ई-बुक्सना दिवसेंदिवस अधिकाधिक स्वागतशील स्वीकृती मिळत आहे आणि प्रकाशक, ग्रंथविक्रेते तसेच ग्रंथालयेही ई-बुक्स म्हणजे आपल्या व्यवसायावरची एक आपत्ती असे न मानता, विकासाची आणि व्यवसाय वृद्धीची एक संधी म्हणून त्याकडे पाहू लागली आहेत.

ई-बुक्समुळे छापील पुस्तकांच्या संदर्भात विकसित झालेल्या (मुद्रणालये, बांधणी, वितरणव्यवस्था, विक्रीकेंद्रे, पोस्टाने पुस्तके पाठवणे, गोडाऊन किंवा अन्य व्यवस्था यंत्रणा ई-बुक्सच्या संदर्भात अनावश्यक ठरणार आहेत किंवा त्या बदलाव्या लागणार आहेत. त्यामुळे बदलत्या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा लागणार आहे; आणि पुस्तकांची उलाढाल कमी होण्याऐवजी अधिक वाढत राहणार आहे हेही अनेकांना जाणवले आहे.

डिजिटल पुस्तक हे कोणालाही ई-रीडरवर, स्मार्ट फोनवर, संगणकावर मोबाईलवर वाचणे शक्य होणार आहे; त्यासाठी कागदाचा वापर करावा लागणार नाही, मुद्रण बांधणी करावी लागणार नाही. विक्रेत्यांकडे पुस्तकाच्या प्रती पाठवाव्या लागणार नाहीत. ग्राहकाकडे ते पाठवण्यासाठी पोस्टाचा किंवा कुरियरचा खर्च करावा लागणार नाही. छापलेल्या पुस्तकांचे गठ्ठे ठेवण्यासाठी गोडाऊनची गरज उरणार नाही. मोठमोठी ग्रंथदालने उभारावी लागणार नाहीत. डिजिटल स्वरूपातील पुस्तक एका क्लिकसरशी ग्राहकाला डाऊनलोड करून घेता येईल आणि छापील पुस्तकाप्रमाणे वाचता येईल. ते वाचताना मागचे पुढचे संदर्भ बघता येतील; टाईप लहान मोठा करता येईल. गुगलवर आताच काही लाख पुस्तके उपलब्ध आहेत. चार हजार प्रकाशन संस्थांची नवी जुनी सर्व पुस्तके त्यामुळे वाचकांना सहजपणे आपल्याला ई-रीडरवर किंवा मोबाईलवर वाचायला मिळू शकतात. ॲमेझॉन, बार्न्स ॲंड नोबल, ॲपल वगैरे कंपन्यांनीही अशी ऑनलाईन ई-बुक्स स्टोअर्स सुरू केली आहेत. या पुस्तकांच्या किमती छापील पुस्तकांपेक्षा कमी असल्याने वाचकांचा फायदा होईल तसेच लाखो पुस्तके मोफतही वाचायला मिळू शकतील. आपल्या

ई-रीडरवर किंवा टॅब्लेटवर हजारो पुस्तके स्टोअर करता येतील. एक मोठे ग्रंथालयच जणू खिशात असावे, अशी काहीतरी नवलाई अनुभवायला मिळेल. लेखक-प्रकाशकांनाही त्यांचे मानधन ठरल्याप्रमाणे मिळत जाईल. एखादा वाचक घरी आय-पॅडवर ई-बुक वाचू शकेल, ऑफिसला जाताना वा प्रवास करताना अँड्रोइड फोनवर वाचन चालू ठेवू शकेल; ऑफिसात गेल्यावर वेब ब्राऊझरवर पुढचे वाचन करू शकेल. प्रत्येक वेळी जेथे वाचत होता, तेथून पुढचा मजकूर आपोआप समोर दिसेल. त्यामुळे ई-बुक्सबद्दल एरव्ही पुस्तके वाचण्याची टाळाटाळ करणाऱ्यांनाही आकर्षण वाटते. ॲमेझॉनने किंडल या वाचनयंत्राद्वारे ई-बुक्सच्या क्षेत्रात प्रथम मुसंडी मारली. जगातील सर्वात मोठी ग्रंथविक्रीसंस्था म्हणून ॲमेझॉनचा लौकिक आहे. आता मुद्रित पुस्तकांपेक्षा ई-बुक्सची विक्री जास्त होत असल्याचा आश्चर्यकारक अनुभव ॲमेझानला येत आहे.

चीनमध्ये आजच्या घडीला १० कोटी लोक मोबाईलवर ई-बुक्स वाचत आहेत. २००९ मध्ये ५० लाख ई-रीडर्सची (वाचनयंत्रांची) विक्री झाली. ९ लाख ७० हजार ई-बुक्स चीनमध्ये उपलब्ध आहेत. डिजिटल प्रकाशन क्षेत्रात प्रचंड प्रगती होत आहे. शांघायला ऑक्टोबर २०१० मध्ये डिजिटल प्रकाशन क्षेत्रातील अग्रगण्य प्रकाशकांचे चर्चासत्र झाले. ई-बुक्सबाबतीत अमेरिकेइतकीच आपलीही घोडदौड चालू आहे. या नव्या माध्यमाला खूप मोठे क्षेत्र आहे. आजवर पुस्तकांकडे न वळलेला समाजाचा मोठा वर्ग यापुढे ई-बुक्सकडे वळणार हे निश्चित. या नव्या वाचकवर्गाला योग्य प्रकारे आकृष्ट करण्यासाठी त्याची मानसिकता जाणून घेण्याची गरज आहे. अमेरिकेत ई-बुक्सचा वापर व प्रसार ज्या रीतीने होत आहे, ते मॉडेल चीनला लागू पडणारे नाही. अमेरिकेतील वेगवेगळ्या कंपन्यांची वाचनयंत्रे वेगवेगळ्या तंत्रज्ञानावर आधारित असून त्यांच्यात परस्पर मेळ नाही. चीनमध्ये वाचनयंत्रांची ही विविधता असण्याची गरज नाही, एकाच प्रकारची ती असावीत. चीनमध्ये ई-बुक्सच्या किंमती ठरवण्याबाबतही काही निश्चित मार्गदर्शक सूत्रे असावी. छापील पुस्तकांपेक्षा डिजिटल पुस्तके ही खूपच स्वस्त हवीत. तरुण वर्गाला ती किमान किंमतीत मिळायला हवीत. पुस्तके जास्त विकली गेली तर नफ्याचे प्रमाण कमी ठेवूनही प्रकाशकांना योग्य तो फायदा होऊ शकेल. किंमती कमी ठेवून ऑनलाइन पायरसी रोखणेही अपरिहार्य ठरेल. मुद्रित पुस्तकांपेक्षा ई-बुक्सचे मार्केटिंग वेगळ्या प्रकारे करावे लागेल हे या चर्चासत्राद्वारे सर्वांच्या लक्षात आले.

भारतात अजून याबाबत फारसे प्रयत्न झालेले नाहीत. मंदार जोगळेकर बुकगंगामार्फत काही प्रयत्न करीत आहेत. ई-रीडरच्या त्यांच्या किमती जास्त असल्याने, अपेक्षित वेग त्यांना गाठता आलेला नाही. स्मार्टफोन, मोबाईलचे माध्यम त्यांना कदाचित लाभदायक ठरेल.

ई-बुक्सचा नवा झंझावात ग्रंथालयांनाही भेडसावणार आहे. खरे तर ई-बुक्समुळे

ग्रंथालयांचा फायदाच जास्त होणार आहे. पुण्याच्या ब्रिटिश लायब्ररीने या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालयाच्या विस्ताराची योजना आखली आहे. आजवर केवळ पुणे-मुंबई येथील वाचक सदस्यांपुरता तिचा व्याप मर्यादित होता. ई-बुक्समार्फत महाराष्ट्रात सर्वदूर पोचायची महत्त्वांकाक्षा ब्रिटिश लायब्ररीने बाळगली आहे, अशी माहिती कजरी मिश्रा यांनी दिली. ई-लायब्ररीद्वारे पुढच्या महिन्यापासून नाममात्र वार्षिक शुल्क घेऊन हजारो पुस्तके वाचक सदस्यांना इंटरनेटद्वारे मिळवता येतील. आतापर्यंत वाचकांना प्रत्यक्ष लायब्ररीत जाऊन पुस्तके घ्यावी-द्यावी लागत होती. किंवा कुरिअरचा वापर त्यासाठी करावा लागत होता. ही मर्यादा आता उरणार नाही. तरुण किंवा प्रौढ वाचकांनाही ई-बुक्स ही घरबसल्या वाचायला मिळतील. त्यासाठी लायब्ररीत यावे लागणार नाही. या आधी काही पाठ्यपुस्तके ई-फॅसिलिटीद्वारे ही लायब्ररी पुरवत होती. परंतु आता ॲकॅडमिक पुस्तकांबरोबर कथाकादंबऱ्या व इतर सर्व प्रकारची पुस्तके ई-बुक्सच्या स्वरूपात वाचकांना मिळू शकतील. आरंभी किमान ५० हजार ई-बुक्स उपलब्ध असतील. बालवाङ्मयही उपलब्ध असेल.

'ऑनलाइन'मुळे काही पुस्तकांवर आणि प्रकाशनांवर प्रतिकूल परिणाम होण्याचीही शक्यता आहे. उदाहरण द्यायचे झाले तर ते ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरीचे देता येईल. गेली शंभरावर वर्षे इंग्लिश डिक्शनरी ही विद्यार्थ्यांची एक अटळ गरज असे. तिच्या अनेक आवृत्ती असत. सर्वात मोठी म्हणजे २० खंडांची आवृत्ती ११६५ डॉलर्सना (साठ हजार रुपयांना) मिळे. १९८९ मध्ये छापलेली तिची आवृत्ती; तिचे ३० हजार सेट विकले गेले. ही डिक्शनरी ऑनलाइनवर उपलब्ध करण्यात आली. छापील आवृत्तीच्या खपापेक्षा ऑनलाइनवर तिचा वापर करणाऱ्यांची संस्था फारच प्रचंड आहे. प्रचंड म्हणजे किती? दरमहा वीस लाख. त्यांच्याकडून मिळणारे शुल्कही खूप असते. छापील आवृत्तीला त्यामुळे मागणी कमी झाली आहे. या महाकाय डिक्शनरीची नवी आवृत्ती निघण्याची शक्यता फार कमी आहे.

डिजिटलायझेशनसाठी मूळ पुस्तकाचे स्कॅनिंग करावे लागते. ती वेळखाऊ प्रक्रिया असे. आता प्रगत तंत्रज्ञानाने हे काम वेगाने होऊ लागेल. पुस्तकाचे पान उलटण्यास लागेल तेवढा वेळ आता स्कॅनिंगसाठी पुरेसा ठरेल. दीडशे पानी एका पुस्तकाचे स्कॅनिंग एका मिनिटात होऊ लागेल.

नव्या तंत्रज्ञानाने असे अनेक चमत्कार घडणार आहेत.

वाचकांचा त्यात फायदा आहे. हवे ते पुस्तक अल्प शुल्कात वाचण्याचे अनेक पर्याय त्यांना उपलब्ध आहेत.



# दिवाळी अंक २०११

## रसिक वाचकांसाठी स्पर्धा
## एक हजार रुपयांची पुस्तके बक्षिस मिळवा

**वाचक मित्रांनो,**

- या दिवाळी अंकासाठीही एक स्पर्धा जाहीर करत आहोत.

- ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. फक्त अट एवढीच की इ.स. २०१०-२०११ मध्ये तुम्ही एका पेक्षा जास्त पुस्तके विकत घेऊन वाचलेली असावीत.

- किमान दोन पुस्तके तरी दोन वर्षात विकत घेतलेली असणे आवश्यक. त्यासाठी बिल वगैरे पुरावा देण्याची गरज नाही. तुमच्या शब्दावर आमचा विश्वास आहे.

- आपण खरेदी केलेल्या पुस्तकांची नावे **(जास्तीत जास्त दहा)** पोस्टकार्डावर लिहून कळवा.

- त्यातील तुम्हाला सर्वात जास्त आवडलेल्या पुस्तकाबद्दल तीनचार ओळीत माहिती द्या.

- या स्पर्धेत भाग घेणाऱ्यांची नावे दिवाळी अंकात छापण्यात येतील.

- लॉट टाकून यशस्वी ठरणाऱ्या दोन स्पर्धकांना प्रत्येकी १,००० रुपयांची पुस्तके बक्षीस म्हणून देण्यात येतील

**पत्र पोचण्याची अंतिम मुदत ३० जुलै २०१०**

**आमचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, संपादक, मेहता मराठी ग्रंथजगत
१९४१ माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
फोन – ०२०-२४४७६९२४

**आगामी**

# फिफ्टी इयर्स ऑफ सायलेन्स

**जॅन रफ्–ओ'हर्न**

अनु. **नीला चांदोरकर**

**२७०रु.** पोस्टेज २५रु.




मनातल्या खोल कप्प्यात दडवून ठेवलेली गोष्ट आपल्या मुलींना, नातवंडांना कशी सांगायची? कारण ही गोष्ट साधीसुधी नव्हतीच.

ती अत्यंत लज्जास्पद होती. तिची तीव्रता पन्नास वर्षांनंतरही कमी होत नाही.

थोडीथोडकी नव्हे, पन्नास वर्षं जॅननं कोंडमारा सहन केला. मग ठरवलं, ''ते सगळं आपण लिहून काढायचं, कागदावर उतरवायचं.''

१९९२ साली या कोंडमाऱ्यांचा उद्रेक झाला. तारुण्यात जॅनला जो शारीरिक आणि मानसिक त्रास सोसावा लागला त्याचं हृदयद्रावक वर्णन या पुस्तकात वाचायला मिळतं.

मृत्यूची टांगती तलवार तिच्या डोक्यावर होती. शिवाय घरादाराची अब्रू वेशीवर टांगली जाईल ही भीतीही होती.

लैंगिक अत्याचारांमुळे जे दु:ख तिला सोसावं लागलं त्याची ही कहाणी.

**इंग्रजी मध्ये सुद्धा उपलब्ध**

**आगामी**

# मेकिंग द कट

**डॉ. मोहम्मद खाद्रा**

अनु. **डॉ. देवदत्त केतकर**




**२००रु. पोस्टेज २५रु.**

डॉ. मोहम्मद खाद्रा हे एक नामांकित सर्जन.

सर्जन असण्याचा अर्थ असतो, मानवी यातनांच्या सागरात अविचल उभं राहणं. आपलं ज्ञान, कौशल्य आणि बुद्धिमत्ता पणाला लावून व्याधीशी झुंज देणं.

एक इंटर्न म्हणून त्यांनी जेव्हा पहिला छेद घेतला तेव्हा शिक्षकांनी त्याची खिल्ली उडवली.

एका वृद्धेच्या इच्छेविरुद्ध त्यांनी तिचा जीव वाचवला.

मेंदूच्या कर्करोगामुळे एका कुप्रसिद्ध सर्जनला वेड लागले.

ल्युकीमिया झालेल्या मुलाची आई अगतिक होऊन कोलमडून पडली.

अशा स्मृतिचित्रांमधून, डॉ. मोहम्मद खाद्रा यांनी सर्जन म्हणून आपले आयुष्य उलगडून दाखवले आहे. खडतर प्रशिक्षणापासून ते निद्रानाश करणाऱ्या अविरत कामापर्यंत... आपलं आयुष्य घडवणाऱ्या रुग्णांच्या स्मृती ते जागवतात. ऑपरेशन थिएटरमध्ये घडणाऱ्या धक्कादायक चुकांमुळे उद्ध्वस्त झालेल्या रुग्णांच्या कहाण्याही यात आहेत.

राजकारणामुळे आरोग्यसेवेची झालेली दैना आपल्याला इथे दिसते.

मृत्यू समोर दिसत असताना रुग्णांनी बाळगलेल्या वेड्या आशा दिसतात.

**आयुष्यात घडलेल्या असाधारण घटनांमुळे निर्माण होणारे नाट्य.**

# साहित्यवार्ता



*** २५ लाखांची बनावट पुस्तके जप्त**

गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाने रस्त्यांवर पुस्तक विक्री करणाऱ्या काही दुकानांवर कॉपी राईट कायद्यानुसार कारवाई करत २५ लाख रुपयांची पुस्तके जप्त करून सात जणांना ताब्यात घेतले आहे. फर्ग्युसन रोड, जंगली महाराज रोडवर झालेल्या या कारवाईमुळे खळबळ उडाली होती. पेंग्विन, हार्पर कॉलिन्स, हॅचेट बुक पब्लिशर्स, रॅण्डम हाऊस, मॅकमिलन पब्लिशर्स, वेस्ट लँड इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या प्रकाशकांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली होती. त्यामुळे मास रेड करत पोलिसांनी हिंदी आणि इंग्रजी अशी सुमारे ४००० पुस्तके जप्त केली.

प्रभाकर ठाकूर (वय ३१), अखिलेश पाल (वय २१) आणि नथुराम यादव (वय १९, सर्व रा. एसएनडीटी कॉलेजजवळ), मेजर राजन पांडे (वय २०) द्वारिका शामलाल विश्वकर्मा (वय २१ रा. कोथरूड), रामगणेशपाल (वय २८, रा. पौड रोड) आणि अजित जमनादास ठक्कर (वय ५२, रा. कोथरूड) यांना ताब्यात घेण्यात आले. वीरेंद्र पाल हा पुण्यातील पुस्तकांचा मुख्य पुरवठादार असून त्याचा शोध सुरू आहे.

*** मोनालिसाचे गूढ उकलण्याच्या मार्गावर**

प्रसिद्ध चित्रकार लिओनार्दो दा विंची यांच्या गाजलेल्या मोनालिसा या चित्राचे गूढ उलगडण्याची शक्यता आहे. या चित्रातील मोनालिसा ही कोण होती? लंडनमधील ज्येष्ठ कलाइतिहासतज्ज्ञ प्रा. सिल्वानो विन्सेटार्ट यांनी त्यासाठी एक योजना आखली आहे. त्यानुसार मोनालिसा म्हणून ज्या महिलेचे चित्र काढल्याची शक्यता वर्तवली जाते, तिचे थडगे खणून मृतदेह बाहेर काढण्यात येणार आहे आणि त्या मृतदेहातील हाडांच्या गुणसूत्रांची (डीएनए) तपासणी करण्यात येणार आहे.

गूढ हास्याच्या चित्रामागे लपलेली मोनालिसा म्हणजे ब्रिटनमधील उमराव घराण्यातील लिसा घेरादिनी दिल जिओकोंडा ही महिला असावी, असा समज आहे. पाचशे वर्षांपूर्वी तिचा मृतदेह फ्लोरेन्समधील सेंट ओरसोला चर्चखाली भुयारी खोलीत दफन करण्यात आला होता. आता तिच्या मृतदेहातील हाडे शोधून गुणसूत्रांच्या माध्यमातून तिच्या चेहऱ्याची प्रतिकृती तयार करण्यात येणार आहे.

'पहिल्या टप्प्यात जी हाडे मिळतील त्यांची गुणसूत्रे फ्लोरेन्समधील ज्या दोन चर्चमध्ये लिसाच्या मुलांचे दफन करण्यात आले त्यांच्याशी जुळतात की नाही हे बघणार आहे,' असे प्रा. विन्सेटार्ट म्हणाले. १६४२ मध्ये लिसाचा मृत्यू झाला. श्रीमंत व्यापारी फ्रॅन्सिस्को दिल जिओकोंडा यांची ती पत्नी. इटलीमध्ये मोनालिसाला जिओकोंडा म्हणून ओळखले जाते.

*** भारतीय भाषांचे 'यूआरएल'**

'इंटरनेट कॉर्पोरेशन फॉर असाइन्ड नेम्स ॲण्ड नंबर्स' (आयसीएएनएन) या संस्थेने हिंदी, पंजाबी, गुजराती, तामिळ, तेलगू, बंगाली आणि उर्दू या सात भाषांना 'यूआरएल' दिल्यामुळे आपण आपल्या ॲड्रेस टूलमध्ये आता थेट या भाषेतून साइटचे नाव टाईप करू शकता.

'यूआरएल' म्हणजे 'युनिफॉर्म रिसोर्स लोकेटर'. थोडक्यात आपल्या साइटचे नाव. आपली साइट प्रादेशिक भाषांमध्ये असली तरी तिचा ॲड्रेस मात्र इंग्रजीत असतो. आता हा ॲड्रेस प्रादेशिक भाषांमध्येच असणार आहे. उदाहरणार्थ 'क्रिकइन्फो' ही साइट जर पंजाबीत उपलब्ध असेल तर इंटरनेटच्या ॲड्रेस टूलमध्ये या साइटचे नाव पंजाबीत टाईप केले तरी ते ओपन होऊ शकेल. अर्थात यासाठी आपल्याकडे त्या भाषांचे युनिकोड व्हर्शन असणे गरजेचे आहे.

इतक्या भाषांमधील 'यूआरएल' असलेला भारत हा एकमेव देश आहे. भारताच्या आधी पाकिस्तानने उर्दूचा 'यूआरएल' मिळविला होता. 'आयसीएएनएन' सहसा एकपेक्षा अधिक 'यूआरएल' देत नाही. आता सरकार मराठी, मल्याळम आणि कानडी भाषेचे 'यूआरएल' मिळावे यासाठी प्रयत्नशील आहे. यामुळे कोणतीही व्यक्ती आपल्या मातृभाषेत 'यूआरएल' टाइप करून साइट ओपन करू शकेल. या भाषांचे डोमेन देण्याचा अधिकार 'नॅशनल इंटरनेट एक्स्चेंज ऑफ इंडिया' ला देण्यात आला असून ॲड्रेसच्या पुढे 'डॉट इन' हे एक्स्टेन्शन लागेल. ई-जगतामध्ये भारताचे वर्चस्व प्रस्थापित होण्यास या गोष्टीचा उपयोग होईल.

*** राजन खान यांची खंत**

साहित्य संमेलन अध्यक्षपदाच्या निवडणुकीत 'खान' हे माझे आडनाव आडवे आले, अशी खंत प्रसिद्ध साहित्यिक राजन खान यांनी सांगली येथे नेमगोंडा दादा पाटील व्याख्यानमालेत व्यक्त केली. अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या निवडणुकीत प्रा. म.द. हातकणंगलेकर यांच्याशी माझे वैचारिक मतभेद होते. संमेलनाध्यक्ष रस्त्यावर उतरून काम करणारा असावा, असे माझे ठाम मत होते व आजही कायम आहे. पण माझे 'खान' हे आडनाव आडवे आले, आपल्याला जातीय राजकारण कळत नाही व करता येत नाही, असेही ते म्हणाले. 'आजही मी मुस्लिम किंवा हिंदू नाही. राजन खान हा 'साधा' माणूस म्हणून समाजात जगत आहे,' असे ते म्हणाले.

अफजलखान वधाच्या देखाव्यावरून मिरज येथे उसळलेल्या हिंदू-मुस्लिम दंगलीबाबत ते म्हणाले, अफजलखानाने शिवाजी महाराजांवर वार केला. मात्र कृष्णाजी भास्कर कुलकर्णी यांनीही महाराजांवर पहिला वार केला. खरा इतिहास जाणून घ्यायचा असेल, तर त्या संपूर्ण प्रसंगाचे पोस्टर पूर्ण स्वरूपात लावायला हवे होते, त्यातील फक्त शिवाजी महाराज व अफजल खानाचे दृश्य मोठे करून लावण्यात काय अर्थ आहे, असा सवाल त्यांनी केला.

*** बौद्धिक संपदा क्षेत्रातील संधींबाबत मार्गदर्शन**

गरवारे कॉलेज आणि ग्रेट मिशन ग्रुप कन्सल्टन्सीतर्फे 'बौद्धिक संपदा हक्क' विषयक सेमिनार आयोजित करण्यात आला होता. या सेमिनारमध्ये 'जीएमजीसी'चे संचालक प्रा. गणेश हिंगमिरे बौद्धिक संपदा हक्क आणि त्याच्याशी निगडीत अर्थकारण यांची माहिती देताना म्हणाले, 'एक व्यक्ती, एक पेटंट, त्या सहाय्याने उभी राहणारी एक कंपनी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या व्यवसाय -उद्योगधंद्याच्या संधी या बाबींचा आपल्याकडे बारकाईने विचार केला जात नाही. कदाचित त्यामुळेच इतर प्रगत राष्ट्रांच्या तुलनेत आपल्या देशातर्फे पेटंटसाठी केले जाणारे अर्ज कमी असतात.' सर्वसामान्य व्यक्तीच्या डोक्यातील एखादी भन्नाट कल्पनासुद्धा पेटंटसाठी रजिस्टर होऊ शकते, असे सांगत त्यांनी उत्तर प्रदेशातील एका खेडेगावात गावकऱ्याने तयार केलेल्या पाण्यावर चालणाऱ्या सायकलचे तसेच पवनऊर्जेवर चालणाऱ्या हातपंपाचे उदाहरण दिले.

*** इंटरनेट एक्स्प्लोअरची नववी आवृत्ती**

मायक्रोसॉफ्टने इंटरनेट एक्स्प्लोअरची नववी आवृत्ती बाजारात आणली आहे. ॲडव्हान्स लूक असलेले हे एक्स्प्लोअर वापरायला तुलनेने सोपे आहे हे एक्स्प्लोअर एचटीएमएल-५वर चालणार आहे. तसेच यामध्ये वापरण्यात आलेले जावा स्क्रिप्ट इंजिनही नवे असून याचे नाव 'चक्र' असे आहे. एचटीएमएल-५ मुळे सोशलनेटवर्किंग साइटवरील स्पीड वाढणार आहे. मात्र यासाठी कम्प्युटरवर विंडोज विस्टा किंवा विंडोज-७ ही ऑपरेटिंग सिस्टिम असणे गरजेचे आहे. विंडोज एक्सपीसाठी हे व्हर्शन पोर्टेबल नसल्यामुळे कम्प्युटरमधील ऑपरेटिंग सिस्टिम बदलावी लागेल.

इंटरनेट एक्स्प्लोअर-९ मध्ये प्रिंट, झूम यासारख्या कमांडसाठी थेट पर्याय उपलब्ध असून यामध्ये आपल्या कम्प्युटरच्या मधोमध वेबपेज ओपन होते. 'पीन्ड साइट्स'मुळे सातत्याने ओपन कराव्या लागणाऱ्या वेबसाइट विंडोज-७ च्या टूलबारमधून थेट ओपन करता येते. यामधील डाऊनलोड मॅनजरमध्ये डाऊनलोड केलेल्या सर्व गोष्टींची माहिती उपलब्ध असेल. जुनी एखादी फाइल थेट ओपन करता येईल. 'एनहान्स टॅब'ने आपल्याला एकावेळी दोन वेब साइट पाहता येतील. या एक्स्प्लोअरमुळे ब्राऊजिंगच्या बाजारात मोठी चढाओढ सुरू झाली आहे. सध्या इंटरनेट एक्स्प्लोअर

आघाडीवर आहे हे मात्र खरे.

एखाद्या इंग्रजी शब्दाचा उच्चार कसा करायचा याबद्दल आपली खात्री नसते. तीन-चार लोक एकत्र असतील तर हा गोंधळ आणखीनच वाढतो. तुमचा शब्द http://www.howjsay.com या साइटवर टाइप केला की, तुम्हाला त्याचा योग्य उच्चार २६ देशी आणि परदेशी भाषांमध्ये मिळतो. तसेच त्याचा उच्चारही ऐकू येतो.

*** इडियट बॉक्स झाला 'स्मार्ट'!**

इडियट बॉक्स अशी हेटाळणी होणारा टीव्ही आता स्मार्ट झाला आहे. एलजी, सॅमसंग आणि पॅनासॉनिक या टीव्हीउत्पादक कंपन्यांनी 'स्मार्ट टीव्ही' बाजारपेठेत दाखल केले आहेत.

स्मार्ट टीव्ही म्हणजे इंटरॲक्टिव, वेबशी जोडलेला एलसीडी टीव्ही.या टीव्हीमध्ये इंटरनेट सोर्सिंग, इंटरनेट ॲप्लिकेशन वापरणे आणि हवा तेव्हा व्हीडिओ वापरणे शक्य होते.

नेट-एनेबल्ड टीव्हीपेक्षा तो वेगळा असतो.

नेट-एनेबल्ड टीव्हीवर विशिष्ट ॲप्लिकेशन्सच वापरता येतात. पूर्णपणे ब्राऊजिंग करता येत नाही. स्मार्ट टीव्ही हा सर्च इंजिन असलेल्या कम्प्युटरसारखा असतो. त्यावर फेसबुक, यूट्यूब आणि ट्विटरसरख्या सोशल नेटवर्किंग साइट वापरता येतात. गुगल टॉकसारख्या साइटवरून चॅटिंग करता येते. मोबाइल फोन आणि कम्प्युटरला जोडणे सहज शक्य होते.

स्मार्ट टीव्हीवर ईमेल पाहता येतात आणि चॅटही करता येते.

स्मार्ट टीव्हीवर गरजेनुसार उपलब्ध होणाऱ्या सेवा कोणत्या आहेत?

टीव्हीनिर्मात्यांनी ॲप्लिकेशन डेव्हलपर्सच्या सहयोगाने क्रीडा, मनोरंजन, गेम्स, जीवनशैली, हवामान, पाककला, बिझनेस, शेअर्स संबंधी खास कार्यक्रम तयार केले आहेत. सॅमसंगने अशा ॲप्लिकेशन्स डेव्हलपर्सशी तर एलजी इलेक्ट्रॉनिक्स इंडियाने पाच कंटेन्ट पार्टनरशी करार केला आहे.



**अदम्य जिद्द**

**डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम** अनु. सुप्रिया वकील

विकसनशील भारताचं स्वप्न पाहणारा थोर द्रष्टा नेता, चिंतनशील वैज्ञानिक, हाडाचा शिक्षक आणि राष्ट्रपती या विविध भूमिकांमध्ये व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू झळाळून उठलेल्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची भाषणे.

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

एलजीचे स्मार्ट टीव्ही ३२ आणि ५५ इंची असून, त्यांची किंमत अनुक्रमे ४३ हजार ते १ लाख ७० हजार रुपये आहे. ४० इंची आणि ६० इंची सॅमसंग स्मार्ट फोन अनुक्रमे ६८ हजार ते ४ लाखांदरम्यान मिळतात.

यावर्षी जगभरात १.२ कोटी स्मार्ट टीव्ही युनिट खपतील अशी अपेक्षा आहे. अमेरिका, युरोप आणि कोरियामध्ये इंटरनेट कनेक्टिविटीमुळे स्मार्ट टीव्हीचे प्रमाण जास्त आहे. सॅमसंगने यंदा भारतात एक लाख स्मार्ट टीव्ही विकण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

*** लाइव्ह ॲट एज्यु. यंत्रणा**

महाविद्यालयातील मुख्य घडामोडी, परीक्षेचे वेळापत्रक, महत्त्वाच्या सूचना यांपासून ते परीक्षेचा निकाल वाचण्यासाठी आता महाविद्यालयाच्या नोटीस बोर्डाजवळ गर्दी करावी लागणार नाही. एवढेच नाही तर माजी विद्यार्थ्यांच्या संमेलनाच्या वेळी विद्यार्थ्यांचा फोन क्रमांक व पत्ता यासाठी शोधाशोध करण्याची गरज पडणार नाही. कारण महाविद्यालयातील सर्व आजी-माजी विद्यार्थी व शिक्षकांना एकाच ई-मेलच्या पोर्टलवर जोडणारी ही यंत्रणा मायक्रोसॉफ्टने विकसित केली आहे. शहरातील भारती विद्यापीठ, सिंबायोसिस व इंदिरा या शिक्षण संस्था त्याचा लाभ घेत आहेत.

अनेक सर्व्हरच्या माध्यमातून सर्व विद्यार्थी या यंत्रणेमध्ये एकमेकांशी जोडले गेले आहेत. या सुविधेचा लाभ घेणाऱ्या महाविद्यालयाला स्वत:चे डोमेन मिळेल. प्रत्येक विद्यार्थ्याला स्वत:चा स्वतंत्र ई-मेल आयडी या यंत्रणेद्वारे मिळत असून, तो आयुष्यभर राहील. त्यामुळे महाविद्यालयातून शिक्षण पूर्ण केल्यावर देखील विद्यार्थी कायम आपल्या शिक्षकांच्या व महाविद्यालयाच्या संपर्कात राहू शकेल. या यंत्रणेमध्ये प्रत्येक तुकडीप्रमाणे विद्यार्थ्यांची व शिक्षकांची नावे, ई-मेल आयडीची यादी असेल. महाविद्यालयातील सर्व सूचना या ई-मेल आयडीच्या माध्यमातून सर्वांना पाठवता येतील. ई-मेलमध्ये अमर्याद जागा असणार आहे. विद्यार्थी एकमेकांचा डेटा आदानप्रदान करू शकतील. तसेच ऑनलाइन विद्यार्थ्यांची यादी दिसण्याची त्यामध्ये सोय आहे.

मायक्रोसॉफ्टचे प्रॉडक्ट, मार्केटिंग आणि स्ट्रॅटेजी विभागाचे संचालक तरुण मलिक म्हणाले, ''या यंत्रणेमुळे विद्यार्थी एकमेकांशी जोडले जातील व कायम संपर्कात राहतील. ही यंत्रणा आम्ही पूर्णपणे मोफत देत आहोत. कॉर्पोरेट क्षेत्राला आम्ही अनेक सुविधा मोफत देत आहोत. मग शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी योगदान का देऊ नेय, या विचारातून ही संकल्पना पुढे आली. भविष्यात सर्व मुख्य शिक्षण संस्थांना जोडण्याची मायक्रोसॉफ्टची योजना आहे. ''या सुविधेसाठी अनेक महाविद्यालये व शिक्षण संस्था संपर्क साधत आहेत. शिक्षण संस्थेचा दर्जा व तंत्रज्ञानसज्जता करून यावर निवड करीत आहोत. टप्प्याटप्प्याने ही योजना सर्व ठिकाणी कार्यान्वित केली जाईल.''

"live@edu" यंत्रणेचा वापर करणाऱ्या भारती विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाचे संचालक सत्यजित हंगे म्हणाले, ''या यंत्रणेमुळे विद्यार्थ्यांशी संवाद अधिक सुरळीत झाला आहे. अभ्यासक्रमाबद्दलच्या अनेक प्रतिक्रिया व सूचना विद्यार्थ्यांकडून मिळू शकतात. शिक्षण पूर्ण केल्यावर पुढे काय करावे, याबाबत या यंत्रणेमुळे माजी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणे शक्य होत आहे.''

*** भरत नाट्य मंदिराला ५८ लाखांचे अनुदान**

राज्य सरकारतर्फे भरत नाट्य मंदिराला एप्रिल २०११ मध्ये ५८ लाख ६० हजारांचे अनुदान देण्यात आले. भरत नाट्य मंदिराच्या विविध कामांसाठी दोन कोटी २० लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. या रकमेच्या माध्यमातून १२ हजार पुस्तके आणि साठ वर्षांपूर्वीपासूनच्या तीन हजार एकांकिका यांचे जतन केले जाणार आहे. ग्रंथालयात नाटके, संगीत नाटके, जुनी हस्तलिखिते, चित्रे, नियतकालिके, ध्वनिचित्रफिती आहेत. त्यांचे संगणकीकरण करणे, नाट्यगृहाची बाल्कनी मोठी करून, ध्वनिसंयोजन व्यवस्था सुधारणे, नाट्यगृहात सीसीटीव्ही बसविणे, खुर्च्या व वॉल सीलिंग बदलणे, नाट्यगृहाला कुलिंग पेंट देणे, टेरेसचे वॉटर प्रूफिंग करणे या सर्व कामांचे नियोजन करण्यात येणार आहे.

*** 'भरत नाट्य'ची नवी कार्यकारिणी**

भरत नाट्य संशोधन मंदिर संस्थेच्या २४ एप्रिल २०११ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. विजय वांकर (अध्यक्ष), आनंद पानसे (उपाध्यक्ष), शिरीष फुले, दीपकराज दंडवते, रवींद्र खरे (विश्वस्त), प्रतिभा दाते (कार्याध्यक्ष), अविनाश फाटक (कार्योपाध्यक्ष), विश्वास बापट (कार्यवाह), अभय जबडे (सहकार्यवाह), विश्वास पांगारकर (खजिनदार), विष्णू साठे, संजीव मेहेंदळे, सीमन्तिनी पानसे (नियामक मंडळ सदस्य), राजीव परांजपे, पुष्कर केळकर, चिन्मय पाटसकर, प्रज्ञेश पितळे (कार्यकारी मंडळ सदस्य), अविनाश बेलसरे (अंतर्गत आय-व्यय निरीक्षक), गोविंद पटवर्धन (कायदाविषयक सल्लागार), मिलिंद क्षीरसागर (लेखापाल) यांचा समावेश आहे.

*** इंग्रजी प्रगतिपुस्तकात भारत पिछाडीवर**

इंग्रजी माध्यमाचे आपल्याला भलतेच आकर्षण आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे पेव फुटलेले आहे. मात्र, इंग्रजी शिक्षणामुळे आपले इंग्लिश भाषेचे ज्ञान वाढते आहे काय? त्यामधील प्रोफिशियन्सी वाढते आहे काय? इंग्रजी मातृभाषा नसलेल्या देशांमधील इंग्रजी भाषाविषयक कौशल्यांची पाहणी करण्यात आली. तिच्यात मलेशियाने इंग्रजी भाषा बोलण्याच्या कौशल्यात पहिले स्थान पटकावले आहे. दुसरे स्थान हाँगकाँग आणि तिसरे स्थान दक्षिण कोरियाने पटकावले. आता तुम्हाला प्रश्न पडला असेल की भारत कुठे आहे?

जपाननंतर तैवान, सौदी अरेबिया, चीन, भारत, रशिया, इंडोनेशिया, व्हिएतनाम, थायलंड आणि कझाकिस्तान अशी आशियातील नामावली आहे. इंग्रजीबरोबरच आता दुसरा वाद सुरू झाला आहे. गणित आणि विज्ञान हे विषय मातृभाषेतून शिकवायचे की इंग्रजीतून? पारंपरिक बहासा या भाषेमधूनच गणित-विज्ञान शिकविण्याचा निर्णय मलेशिया संसदेने घेतला आहे. त्यावरून तिथे गदारोळ सुरू झाला आहे. भारताबरोबरच चीनमध्येही गणित-विज्ञान इंग्रजीमधून शिकविण्याकडेच कल आहे. जागतिक ज्ञानभाषा म्हणून आपल्याला इंग्रजी आलीच पाहिजे. पण, इंग्रजी शिक्षणाचा आणि भाषिक कौशल्याचा काही संबंध नाही, असा याचा अर्थ नाही ना!

*** तमाशाच्या फडात जर्मनीची बाई**

मराठी मातीतील तमाशा ही अस्सल कला नेमकी कशी आहे, याचा शोध घेत पेट्रा शेमाखा ही जर्मन तरुणी वेगवेगळ्या फडात फिरतेय. कांताबाई व रघुवीर खेडकर यांच्या तमाशा फडात मुक्काम ठोकून कलावंतांचं जगणं ती स्वत: त्यांच्यातलीच एक होऊन अनुभवतेय. पेट्रा तीन वर्षे तमाशाचा अभ्यास करतेय. तमाशाने तिला भुरळ घातलीय. पेट्रा एम.ए. आहे. पाच वर्षांपूर्वी भारतात-महाराष्ट्रात ती प्रथम आली. पुण्यात दोन वर्षे स्वखर्चाने राहून ती मराठी बोलायला-लिहायला शिकली. प्रायोगिक-व्यावसायिक नाटके पाहून नाट्य कार्यशाळेत सहभागी होऊन तिने दीड तासाचं मराठीत नाटक लिहिलं. त्याचे काही प्रयोग केले. प्रत्येक जण कशाचा तरी शोध घेतो, आयुष्याचा, प्रेमाचा, ध्येयाचा... अशा शोधाच्या प्रवासावरच तिनं नाटक लिहिलं. त्याच काळात छायाचित्रकार संदेश भंडारे यांच्या तमाशाविषयक छायाचित्रांचं प्रदर्शन तिनं पाहिलं. महाराष्ट्रातील भटकंतीत ती जे शोधत होती, ते सापडलं. जर्मनीत संशोधनासाठी पेट्राने तमाशा हाच विषय नोंदविला. आता ती तमाशाचा हंगाम पाहून महाराष्ट्रात येते.

रघुवीर खेडकरांनाही पेट्राचं खूप कौतुक. ''एकदा एक कलाकार आला नव्हता, तर पेट्रा साडी नेसून व रंग लावून रंगमंचावर देवी म्हणून उभी राहिली, इतका ती तमाशाचा आदर करते. उलट आपल्याकडे तमाशाविषयी गैरसमजुती फार. समाजाने पेट्राचं ज्ञान थोडं घ्यावं. तमाशाला नाही आला तरी नावं ठेवू नका!''

खेडकरांची व्यथा ऐकून पेट्रा म्हणाली, ''माझ्या राहण्या-वागण्याचं कौतुक काय करता! परिस्थितीचे चटके खाणाऱ्या या कलावंताचं आयुष्य पाहा!''

कांताबाई म्हणाल्या ''पोर मोठी गोमटी, रसाळ आहे. मुलगीच मानते मी तिला. ती जर्मनीला जाणार म्हटल्यावर हुरहूर लागते. कलेचं चांगलं नॉलेज आलंय तिला. एकटीने फिरते. एकट्या बाईला काय सोसावं लागतं ते मी अनुभवलंय... भगवंत तिला अभ्यासात यश देवो!''

मंदाबाई म्हणाल्या, ''ती आली आणि मला बहीण, मैत्रीण मिळाली. फडात

आली तेव्हा आश्चर्य वाटलं. हिला कुठं ठेवायचं, खायला काय घालायचं, प्रश्न पडला. पण, तिनं कशाचा बाऊ नाही केला. जेवताना तिच्या नाकातोंडातून पाणी आलं. नंतर तिच्यासाठी फिक्क जेवण करायला लागलो. मेथीची भाजी, वांग्याचं भरीत, भाकरी तिला आवडते. उन्हाळ्याच्या दिवसांत पंख्याचं वारं हवं, असंही म्हणत नाही. जर्मनीवरून येते तेव्हा दुधासारखी सफेद असते.'' पेट्रा तिचं बोलणं अडवून म्हणाली, ''मला ऊन आवडतं. त्वचा तुकतुकीत होते.''

मंदाबाईंनी आणि तिनं बसल्या जागीच नटरंग चित्रपटातील 'कोमल काया' वर अभिनय करायला सुरुवात केली. मंदाबाई पुढे म्हणाल्या, ''तमाशाचा अभ्यास ती करते, आमच्यातली होऊन! आमच्याबरोबर गावोगाव फिरते. लाकडी गाडीतून अंग ठेचकाळत प्रवास करते. तंबू उभा करण्यापासून घुंगरू बांधण्यापर्यंत सगळी कामं करते. पहाटे तमाशाचा कार्यक्रम संपेपर्यंत जागी राहते. ग्रामीण भागात कार्यक्रम असतो, तेव्हा संडास-बाथरूमची सोय नसते. पेट्राची त्याबद्दल कुरकुर नसते. नदीवर जाऊन धुणं धुते. ओढ्या-विहिरीचं पाणी पिते. आता सांगा, पेट्रा आमचीच ना!'

*** 'मोबाईल व्हॅल्यू ॲडेड'ची बाजारपेठ**

वायरलेस ब्रॉडबँड सेवेचा वाढता विस्तार आणि थ्रीजी नेटवर्क यांच्या पार्श्वभूमीवर देशातील व्हॅल्यू ॲडेड (मूल्यवर्धित) बाजारपेठ चार वर्षांत ५५ हजार कोटी रुपयांच्या घरात जाण्याची शक्यता आहे. देशातील मोबाईलसेवेचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारत असून, मेसेजिंग आणि व्हॉइस प्ले हे कंपन्यांच्या उत्पादनाचे प्रमुख साधन बनले आहे. त्यामुळे या सेवांची व्याप्ती विस्तारण्याकडे कंपन्यांचा कल आहे. चार वर्षांत देशातील दूरसंचार क्षेत्रातील सेवांच्या माध्यमातून मिळणारा महसूल २० हजार कोटींचा टप्पा गाठेल, तर करमणूक सेवेतून मिळणारा महसूल २५ हजार कोटी होईल. या शिवाय माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील महसूलाचा वाटा ७ हजार ९०० कोटी राहील. भारतात मोबाईल कंपन्यांचा मोठा ग्राहकवर्ग असून, त्यांचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि भाषेनुसार वर्गीकरण होते. तरुण ग्राहकांची संख्या जास्त असल्यामुळे त्यांना टार्गेट करण्याची एकही संधी मोबाईल कंपन्या सोडत नाहीत




## चॅम्पियन व्हा!

डॉ. रमा मराठे

पंचसूत्रांच्या माध्यमातून जीवनात यशस्वी होण्यासाठी खास मुलांसाठी उघडलेला गोष्टीरूप खजिना!

**२४०रु. पोस्टेज २५रु.**

*** पत्रव्यवहारासाठी ई-मेलच्या वापराचे आदेश**

कागदाचा अनिर्बंध आणि अतिवापर थांबविण्यासाठी कंपन्यांनी शेअरधारकांशी इलेक्ट्रॉनिक (ई-मेल) स्वरूपात पत्रव्यवहार करावा, अशी सूचना केंद्र सरकारने केली आहे. केंद्र सरकारने 'ग्रीन इनिशिएटिव्ह' हा उपक्रम हाती घेतला आहे. सध्या कंपन्यांचा पत्रव्यवहार बहुतांशी प्रिंटेड कागदाच्या रूपात होतो. या निर्णयामुळे कागदाच्या खर्चात बचत होऊ शकेल. माहिती तंत्रज्ञान कायदा २००० नुसार इलेक्ट्रॉनिक पत्रव्यवहार किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील डॉक्युमेंट्स अधिकृत समजली जातात. कंपनी कामकाज मंत्रालयाने सर्व कंपन्यांना वैध ई-मेलचे एक रजिस्टर तयार करण्यास सांगितले असून, त्या आधारे शेअरधारकांना कंपनीच्या बैठकीची माहिती अथवा नोटीस ई-मेलद्वारे पाठविता येणे शक्य होणार आहे. प्रादेशिक संचालक आणि कंपनी रजिस्ट्रारनी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पत्रव्यवहार करावा अशी सूचना केली आहे. 'ही प्रक्रिया सुरू होण्यास काही कालावधी लागेल. इलेक्ट्रॉनिक स्वरूपात विविध कागदपत्रे फाइल करता यावीत यासाठी कंपन्यांना आणि शेअरधारकांना त्यांचा ई-मेल पत्ता कंपन्यांकडे रजिस्टर करण्यासाठी वेळ दिला जाईल.

*** 'अमर जीव'**

मानवाची उत्क्रांती कशी झाली यावर गेली अनेक वर्षे संशोधन सुरू आहे. अमेरिकी वैज्ञानिक जोनाथन आयसन यांनी शोधलेला 'अमर जीव' या अभ्यासात महत्त्वाची भूमिका बजावू शकेल. 'अमर जीवा'च्या 'डीएनए'मध्ये जीवसृष्टीतील सूक्ष्मजीव आणि सजीव यांच्या 'डीएनए'शी साधर्म्य असलेला जनुकीय घटक आढळल्याने हा जीवसृष्टीचा चौथा भाग होऊ शकतो. या जीवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे याची अनोखी चयापचय क्रिया. हा जीव जेथे जाऊन पडेल तेथील जीवांतील प्रथिने शोषून घेऊन जगतो. यामुळे तो अमर असल्याचा दावा करता येऊ शकतो. याचा आकार हा सध्या ज्ञात असलेल्या जिवाणू आणि विषाणूंपेक्षा मोठा आहे. यामुळे या जीवाचे स्थान सृष्टीच्या सध्याच्या साखळीतील सूक्ष्मजीव आणि प्राणी या दोघांमधील असू शकते, असा दावा वैज्ञानिकांनी केला आहे.

नव्याने सापडलेला हा जीव उत्क्रांतीच्या अभ्यासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतो. सध्याच्या साखळीमधील दोन गटांशी साधर्म्य असल्याने या संशोधनाचे विशेष महत्त्व आहे. (डॉ. सिद्धीविनायक बर्वे)

जनुकीय साखळ्यांच्या अभ्यासातून माहिती असलेल्या कोणत्याही सजीव जनुकांपेक्षा वेगळेपण जपणाऱ्या या जीवाचा शोध अतिमहत्त्वाचा आहेच, शिवाय उत्क्रांतीविषयीचे आकर्षण, त्यामुळे पुन्हा वाढीस लागणार आहे. (डॉ. शरद काळे)

विषाणू किंवा जिवाणू आणि प्राणी यांच्यामधील हा जीव असल्याने उत्क्रांतीच्या अभ्यासासाठी सध्या तयार केलेल्या ढोबळ साखळीचा हा एक भाग होऊ शकतो. या

जीवाच्या शोधामुळे उत्क्रांतीच्या अभ्यासातील पोकळी भरून निघेल (डॉ. रेखा वर्तक)

*** हस्तलिखित मजकूर डिजिटलमध्ये मिळणार**

'ई-गव्हर्नन्स' च्या सुलभ वापरासाठी भारतीय भाषांमधील अक्षरे वाचून ती डिजिटल स्वरूपामध्ये आणण्यासाठी पुण्याच्या ग्लोबल इमेजिंग कंपनीने विशेष सॉफ्टवेअर विकसित केले आहे. यामुळे कोणत्याही भाषेतील हस्तलिखित मजकूर डिजिटल स्वरूपात उपलब्ध होऊ शकेल. सांगली महापालिका आणि नवी मुंबई पोलिस आयुक्तालयात नुकताच एक पथदर्शक प्रकल्प राबविला असून, यामध्ये सुमारे ९८ टक्के अचूकता गाठण्यात यश आल्याचे ग्लोबल इमेजिंग टेक्नॉलॉजीचे बिझनेस हेड मेघ घोलप यांनी सांगितले.

सरकारी कार्यालयातील अनेक नोंदी अजूनही हस्तलिखित स्वरूपात आहेत. ई-गव्हर्नन्ससाठी या सर्व गोष्टी डिजिटल स्वरूपात आणणे आवश्यक आहे. मात्र, हा मजकूर नव्या रूपात आणताना उद्‌भवणाऱ्या समस्या हे नवे सॉफ्टवेअर हाताळण्यास उपयुक्त आहे.

'हँडरिटन रिजनल लँग्वेज स्क्रिप्ट डिजिटायझेशन सिस्टीम'च्या माध्यमातून हस्तलिखित मजकुराचे डिजिटल रूपांतर आणि अक्षरे ओळखणे शक्य होणार आहे. त्याशिवाय, लिखित माहिती रकाने आणि ओळी अशा स्वरूपात मांडणेही शक्य आहे. हस्ताक्षराचे स्वरूप, आकार, ब्रशचे फटकारे अशा सर्व बाबी या नव्या प्रणालीत अचूक टिपता येत असल्याने प्रादेशिक भाषेतील मजकूर तंत्रज्ञानाच्या नव्या भाषेत घेता येणे शक्य होणार आहे. इंग्रजी, हिंदी, मराठी, पंजाबी आणि गुजराती या भाषांमधील हस्तलिखिते सध्या डिजिटल स्वरूपात आणता येतील.

*** धार्मिकता विज्ञानाची प्रगती**

प्राचीन भारतामध्ये अनेक धर्मांचा आपल्या समाजावर पगडा होता. याच कालखंडातील बदलत्या धार्मिक अधिष्ठानामुळे खऱ्या अर्थाने भारतातील विज्ञानाची प्रगती खुंटली, असे उद्‌गार इतिहास अभ्यासक डॉ. अशुतोष मुळे यांनी वसंत व्याख्यानमालेत 'प्राचीन भारतातील विज्ञानाचा ऱ्हास' या विषयावर बोलताना काढले.

पोलादावर पाणी चढवण्याचे काम भारतीय करत होते. नालंदा व तक्षशीला विद्यापीठात वैद्यकशास्त्र शिकवले जात होते. भारतात ११२० रोगांचे निदान केले जात होते, आदी इतिहासातले दाखले देत डॉ. मुळे म्हणाले, ''कलेचा विकास झाला की चैनीची अवस्था निर्माण होते. वैदिक तत्त्वज्ञान ईहवादी होते, त्यामुळे चंगळवादाला सुरुवात झाली. बौद्ध धर्मात चिकित्सक वृत्ती होती, त्यामुळे विज्ञानाला चालना मिळाली. बौद्ध धर्मानंतर शंकराचार्यांनी हिंदू धर्माचे पुनर्निर्माण केले. बुद्धांचे विचार त्यांनी थांबवले. इतिहासातील या धार्मिक चढाओढीमुळे भारतातील विज्ञान थांबले.'' प्राचीन भारतात सिंधूबंदी, स्पर्शबंदी, यासारख्या प्रथांना मोठे स्थान मिळाले त्यामुळे

विचारांचे आदान-प्रदान कमी झाले. जुन्या ग्रंथांतील चुका सुधारायच्या नाहीत या वृत्तीमुळे नवनिर्माण झाले नाही. इसवी सनापासून १९ व्या शतकापर्यंत आर्यभट्टांनी केलेली गणिताची प्रगती सोडली तर भारतीयांनी काहीच केले नाही. इसवीसनापूर्वी भारतात विविध वैज्ञानिक शोध लागत होते. जगाला पारा धातू भारताने दिला आहे. आयुर्वेदाचे उगमस्थान म्हणून भारताची ओळख आहे.''

*** लोकाभिमुख पर्यावरणाने विकास**

नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क आणि फिनलंड या स्कँडेनेव्हियन देशांचा आदर्श ठेवला पाहिजे. या देशांनी कायद्यांचे पालन करून निसर्गाची हानी होऊ न देता विकास साधला आहे. देश समृद्ध करण्यासाठी निसर्गाची नासाडी करण्याची गरज नाही, असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, ''हे देश कोकणसारखेच वन आणि जलसंपत्तीने संपन्न आहेत. पण कोकणातील अनेक उद्योगांनी नद्या प्रदूषित करून, त्यांच्या विषगंगा केल्या आहेत. त्यामुळे मासेमारीसह अनेक व्यवसायांवर गदा येत आहे. याविरुद्ध तक्रार केल्यास सरकारकडून दडपशाही करण्यात येते. सामान्य लोकांना निषेध करण्याचाही अधिकार दिला जात नाही. चुकीचे अहवाल सादर करून जनतेची दिशाभूल केली जाते. कोकणच्या लोकांनी निसर्गाची हानी टाळून 'लोकाभिमुख' विकास साधावा. डॉ. प्रमोद काळे म्हणाले, ''पाणी या साधनसंपत्तीचा फार काळजीपूर्वक वापर करायला हवा, तरच आपण सुसह्य जीवन जगू शकू.''

*** फोटोंचे सोशल नेटवर्किंग**

आपल्याकडील निवडक फोटो आपण फेसबुक, ऑर्कुट यासारख्या सोशल नेटवर्किंग साइटवर टाकतो. पिकासा, फ्लिकरसारख्या वेबसाइटवरही आपण फोटो शेअर करतो. म्हणजे htpp://photobucket.com या साइटवर आपण ग्राफिक्स, आयकॉन व्हीडीओज असे सर्वकाही शेअर करू शकतो. या साइटवर सध्या आठ अब्ज फोटो आहेत. या साइटवरून फेसबुक, ट्विटर किंवा ईमेल माध्यमातून लिंक शेअर करू शकतो.

*** परदेशी विद्यापीठांशी करार**

महाराष्ट्रात प्रस्तावित स्वयंअर्थसहायित विद्यापीठ कायद्याअंतर्गत स्थापन होणाऱ्या खासगी विद्यापीठांना परदेशी विद्यापीठांशी करार करून संयुक्त अभ्यासक्रम, कार्यक्रम व प्रमाणपत्र आणि परदेशी विद्यापीठांत शिक्षणाची संधी मिळणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी दिली. राज्यातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देणे आणि उद्योगांना पूरक उच्चशिक्षित मनुष्यबळ तयार करणे हा विद्यापीठ स्थापनेमागचा उद्देश आहे. ही विद्यापीठे स्वयंअर्थसहायित असतील. अमेरिकेत जवळपास ८० टक्के विद्यापीठे स्वयंअर्थसहायित आहेत. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास

त्याचा फायदा झाला आहे.

खासगी विद्यापीठे उभारण्यास परवानगी देताना काही अटी घालण्यात आलेल्या आहेत. या विद्यापीठांसाठी मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) कार्यक्षेत्रात १० एकर, महसुली विभागाच्या मुख्यालयाच्या शहरात २५ एकर, जिल्ह्याच्या शहरात ५० एकर व ग्रामीण भागत १०० एकर जमीन आवश्यक आहे, 'एमएमआरडीए' च्या कार्यक्षेत्रातील विद्यापीठांना राज्य सरकारकडे १० कोटी रुपये व त्याबाहेरील विद्यापीठांना पाच कोटी रुपये अनामत ठेवावे लागणार आहेत. परदेशी विद्यापीठांतील विद्यार्थी महाराष्ट्रातील खासगी विद्यापीठात व खासगी विद्यापीठातील विद्यार्थी परदेशी विद्यापीठात शिक्षणासाठी जाऊ शकतील.

*** परग्रहावरील जीवसृष्टीचे पुरावे**

भारतातर्फे २००१ आणि २००५ मध्ये अंतराळातील जीवसृष्टीचा शोध घेण्यासाठी आखण्यात आलेल्या खास मोहिमेत सापडलेले सूक्ष्मजीव परकीय जीवसृष्टीचे निदर्शक आहेत की नाही, याबाबत अधिक संशोधनाची गरज आहे असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी व्यक्त केले. भारतीय विद्या भवन, मुक्तांगण विज्ञानशोधिकेतर्फे आयोजित व्याख्यानमालेत 'पृथ्वीबाहेर सूक्ष्मजीवांचा शोध' या विषयावर माहिती देताना डॉ. नारळीकर म्हणाले की, पृथ्वीबाहेरील जीवसृष्टीचा शोध घेण्यासाठी २००१ मध्ये खास बलूनच्या सहाय्याने भूपृष्ठापासून जवळपास ४१ किलोमीटरवरील हवेचे नमुने जमा करण्यात आले. त्यामध्ये बुरशीचे काही प्रकार आणि स्टफिलोकोकस प्रकारचे काही जीवाणू आढळून आले. ते आपल्यासाठी नवीन नव्हते तरी ते त्या वातावरणातही जगू शकले, हे महत्त्वाचे होते. त्याबाबत तज्ज्ञांकडून शंका उपस्थित करण्यात आल्यावर २००५ साली पुढचा टप्पा राबविण्यात आला. या दुसऱ्या टप्प्यात १२ बॅक्टेरिअल कॉलनी आणि ३ पूर्णपणे नवे सूक्ष्मजीव सापडले. जॅनी बॅक्टर फॉईला, बॅसिलस इस्त्रोनेसिस आणि बॅसिलस आर्यभटायस असे या नव्या सूक्ष्मजीवांचे नामकरण करण्यात आले. या सर्व सूक्ष्मजीवांच्या डीएनए आणि रचना यांचा अभ्यास होणे गरजेचे आहे.



**स्लमगर्ल ड्रीमिंग**

अनु. मैत्रेयी जोशी

'स्लमडॉग मिलेनिअर' मधल्या रुबिना अली
या चिमुरड्या चित्रतारकेचा धारावीपासून ऑस्करपर्यंतचा प्रवास
तोही तिच्याच शब्दांत!

**१२०रु. पोस्टेज २५रु.**

*** महाराष्ट्रीय मुलांना मराठी शिकविण्याचा उपक्रम**

भारती विद्यापीठाच्या मदतीने उत्तर अमेरिका, कॅनडा येथील महाराष्ट्रीय मुलांना मराठीचे धडे दिले जात आहेत. मराठी भाषा शिकणारी पहिली बॅच जुलै महिन्यात पासआउट होणार आहे. या उपक्रमाचे समन्वयक व भारती विद्यापीठाचे सहकार्यवाह डॉ. म.शि. सगरे म्हणाले, भारती विद्यापीठ व अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (बीएमएम) वतीने उत्तर अमेरिकेतील १२ आणि कॅनडातील चार अशा १६ शहरांमधील चार ते १४ वयोगटातील साडेपाचशे मुले भाषण, संभाषण, वाचन व श्रवण आत्मसात करीत आहेत. पुस्तिका आणि प्रश्नपत्रिका तयार करण्यात आल्या आहेत. आठवड्यातून एक दिवस हा अभ्यासक्रम चालवला जातो. या माध्यमातून मुलांना इयत्ता पहिली ते तिसरीपर्यंतचे शिक्षण दिले जात आहे.

*** 'मसाप'च्या अध्यक्षपदी पुन्हा द.मा. मिरासदार**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. द.मा. मिरासदार यांची फेरनिवड करण्यात आली आहे. ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. भास्करराव आव्हाड आणि आमदार उल्हास पवार यांच्यासह भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम यांची संस्थेच्या विश्वस्तपदी निवड झाली आहे. नव्या कार्यकारिणीच्या बैठकीत डॉ. प्र. चिं. शेजवलकर आणि डॉ. द.ता. भोसले यांची उपाध्यक्षपदी निवड केली गेली आहे. डॉ. सु.प्र कुलकर्णी यांच्याकडे महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या संपादकपदाची जबाबदारी सोपविली आहे. उद्धव कानडे आणि महेंद्र मुंजाळ यांची स्वीकृत सदस्यपदी तर प्रा. मेधा काळे आणि रवींद्र बेडकीहाळ यांची पुण्याबाहेरील कार्यवाह म्हणून नियुक्ती झाली आहे. कार्याध्यक्ष डॉ. माधवी वैद्य आणि प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यांच्यासह डॉ. पुरुषोत्तम काळे यांची अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळावर प्रतिनिधी म्हणून निवड झाली.

*** 'आयपॅड २' भारतात दाखल!**

ॲपलचा 'आयपॅड टू' भारतीय बाजापेठेत सादर झाला. टॅब्लेट पीसी असणारा 'आयपॅड टू' पहिल्या व्हर्शनपेक्षा कमी जाडीचा पण अधिक वेगवान आहे. यात दोन कॅमेरे बसविण्यात आले असून, त्यात व्हीडीओ चॅटचीही सुविधा आहे. 'आयपॅड टू'ची किंमत २९ ते ४६ हजार दरम्यान आहे. आतापर्यंत आयपॅडच्या सर्व मॉडेल्सची ३ कोटी ९७ लाख युनिटस विकली गेली आहेत.

*** टाइपरायटरचे उत्पादन बंद**

एके काळी मॅट्रिक झाल्यावर टायपिंगचा कोर्स करायचा, व्हॅल्यू ॲडिशन म्हणून शॉर्टहँडही शिकायचे आणि सरकारी नोकरीत चिकटायचे हा शिरस्ताच बनला होता. जिल्हा परिषदा, कोर्ट अशी या नोकऱ्या देणारी खास कार्यालये होती. हळूहळू या सर्व

कार्यालयांचे कम्प्युटरायझेशन होत गेले आणि टाइपरायटरची गरज कमी होत गेली. टाइपरायटरचे उत्पादन करणाऱ्या कंपन्या बंद पडत गेल्या. 'गोदरेज-बॉईस' या कंपनीनेही उत्पादन बंद केल्याने टाइपरायटर टकटक आता पूर्णत: बंद होणार आहे. मुंबईतील या कंपनीकडे शेवटचे २०० टाइपरायटर आहेत. त्यातही बहुतांश अरबी भाषेचा की-बोर्ड असलेले आहेत. 'टाइपरायटरचा वापर बंद झाल्याने आमच्याकडची मागणी घटली होती. त्यामुळे आम्ही उत्पादन बंद करण्याचा निर्णय घेतला,' असे कंपनीचे सरव्यवस्थापक मिलिंद डुकले यांनी सांगितले. २००९ पर्यंत वर्षाला दहा ते बारा हजार टाइपरायटरचे उत्पादन करण्यात येत होते. मात्र, मागणी नसल्याने आता ते बंद करण्यात आले आहे.

*** सलील कुलकर्णी लेखकाच्या भूमिकेत**

शहरातील सर्वात मोठे सभागृह असलेल्या गणेश कला क्रीडा केंद्रात ख्यातनाम संगीतकार डॉ. सलील कुलकर्णी यांच्या 'लपवलेल्या काचा' या पुस्तकाचे कॉन्टिनेन्टल प्रकाशनातर्फे प्रकाशन झाले. गीतकार-संगीतकार अशी ओळख असलेल्या सलील कुलकर्णींचे हे पहिलेच पुस्तक असून, यातील लेखांचे अभिवाचन दहा 'सेलिब्रिटी'नी केले.

*** 'आरशात पाहताना'चे प्रकाशन**

माणसाची हरवत चाललेली संवेदनशीलता टिकविण्यासाठी आत्मचरित्रासारख्या साहित्याची गरज आहे, असे मत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी व्यक्त केले. संस्कृती प्रकाशनाच्या वतीने वि.श्री.दामले यांच्या 'आरशात पाहताना' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. ह.वि. सरदेसाई यांच्या हस्ते करण्यात आले. संस्कृती प्रकाशनच्या संचालिका सुनीताराजे पवार या वेळी व्यासपीठावर उपस्थित होत्या. डॉ. दाभोळकर म्हणाले, संवेदनशीलता टिकविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी आत्मचरित्रांची गरज आहे. आत्मचरित्रामध्ये सर्व खरे लिहावे लागते; मात्र खोटे लपविता येते. आत्मचरित्र लिहिण्यासाठी समाजाकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी लागते. आत्मचिंतन लागते.''

दामले म्हणाले, ''विचारातून माणसाची ओळख झाली पाहिजे. प्रत्येक माणसाचे एक स्वतंत्र मत असते. त्या प्रत्येकाच्या मताचा आदर केला पाहिजे,''

प्रास्ताविक भाषणात सुनीताराजे पवार म्हणाल्या, ''वित्तीय क्षेत्रावरील आंतरराष्ट्रीय परिणामांची चर्चा या पुस्तकात आहे. जेव्हा बँकांचा इतिहास मांडला जाईल त्यावेळी या पुस्तकाचा विचार करावा लागेल.''

*** 'पहावा विठ्ठल'चे प्रकाशन**

वर्षानुवर्षे श्रद्धेने पंढरीच्या वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांची वारी शिवसेना कार्याध्यक्ष

उद्धव ठाकरे यांनी चित्रबद्ध केली असून त्या चित्रांच्या 'पहावा विठ्ठल' या पुस्तकाचे प्रकाशन ३० एप्रिल रोजी वरळीच्या जांबोरी मैदानात 'प्रबोधन प्रकाशन'च्या वतीने झाले. या प्रकाशन समारंभासाठी कोणत्याही सेलिब्रेटीज्ना निमंत्रित करण्यात आले नव्हते तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणारे वारकरी हेच सेलिब्रेटीज् होते. पाच वारकऱ्यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन आणि लोकार्पण झाले. विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर, रामेश्वर महाराज शास्त्री, शशिकांत पागे, ह.भ.प. बाळासाहेब महाराज हरपळकर, ह.भ.प. महंत भास्कर गिरीजी महाराज हे उपस्थित होते. उपेंद्र भट, देवकी पंडित, नंदेश उमप, किरण जोगळेकर, प्रथमेश लघाटे, कार्तिकी गायकवाड भक्तिसंगीताची वारी घडविली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर गाडगीळ यांनी केले.

*** कुरेशींनी चर्मवाद्यांतून उलगडले संगीताचे मर्म**

शाई असलेला तबला आणि शाई नसलेले जेंबे हे मूळ आफ्रिकन वाद्य. उस्ताद तौफिक कुरेशी यांच्या या चर्मवाद्यांच्या वादनाने रसिक मंत्रमुग्ध झाले. 'सा' व 'नी' सूर संगीत संस्थेर्फे उस्ताद अल्लारखाँ यांच्या जयंतीनिमित्त आयोजित संगीत समारंभात युवा कलाकार यशवंत वैष्णव याचे एकल तबलावादन झाले. त्रितालातील पेशकार, विविध कायदे, गती, चक्राधार गती आणि अनाघात गतीच्या वादनातून बनारसी घराण्याचे वैशिष्ट्य त्यांनी उलगडले. उस्ताद तौफिक कुरेशी यांनी जेंबे वादनामध्ये अकरा मात्रांची सवारी वाजवली. आफ्रिकन वाद्यावर त्यांनी शास्त्रीय संगीत सादर करून श्रोत्यांना तालाचे दर्शन घडविले. जोगळेकर यांच्या लेहरा साथीने त्यांनी त्रितालातील काही रचना सादर केल्या. यावेळी तौफिक यांच्या 'ता..धा' या नव्या अल्बमचे प्रकाशन व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ बासरीवादक पं. हरिप्रसाद चौरासिया यांचे शिष्य राकेश चौरासिया यांनी बासरीवादनातून 'जोग' रागातील नऊ मात्रांचा मत्त ताल सादर केला. या रागातील द्रुत त्रितालाची गत सादर करताना त्यांनी तौफिक यांना जेंबेवादनाची साथ केली आणि या जुगलबंदीने सांगता झाली.

*** 'लायब्ररी ऑफ काँग्रेस'चे प्रतिनिधी विजय देवधर**

'लायब्ररी ऑफ काँग्रेस' या अमेरिकेतील राष्ट्रीय ग्रंथालयाने संग्रह समृद्धीसाठी मुंबई वगळता उर्वरित महाराष्ट्राच्या प्रतिनिधीपदी राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) निवृत्त ग्रंथपाल विजय देवधर यांची नियुक्ती केली आहे. राज्यातील शिक्षणसंस्था, स्वयंसेवी संस्था, विद्यापीठ, संशोधन संस्था, शासकीय-निमशासकीय संस्थांनी प्रसिद्ध केलेली पुस्तके, नियतकालिके, वार्षिक अहवाल, सभा, चर्चासत्रांची इतिवृत्ते आणि विशेष प्रकाशने यांच्या माहितीचे संकलन आणि करण्याची जबाबदारी

त्यांच्यावर राहील.

*** 'काव्येर कथा'मधून टागोर यांच्या काव्यप्रतिभेचा आविष्कार**

महाराष्ट्र ज्ञान महामंडळातर्फे (एमकेसीएल) टागोर यांच्या दीडशेव्या जयंतीनिमित्त 'शब्दवेध' च्या सहकार्याने 'काव्येर कथा' अर्थात 'कवितेची गोष्ट' या कार्यक्रमाद्वारे चंद्रकांत काळे, अभिनेत्री शर्वरी जमेनिस आणि अभिनेता जितेंद्र जोशी यांनी रवींद्रनाथांच्या प्रतिभेचे विविध पैलू उलगडणाऱ्या कवितांचे अभिवाचन केले. प्राची दुबळे यांनी टागोरांच्या बंगाली कवितांचे गायन करून रवींद्र संगीताची झलक दाखवली. या गायनाला ज्येष्ठ संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा यांचे शिष्य दिलीप काळे यांनी संतूरच्या सुरांची साथ केली. 'अंतर्नाद' मासिकाचे संपादक भानू काळे यांनी 'रवींद्रनाथ- एक सौंदर्ययात्री' या विषयावर श्रोत्यांशी संवाद साधला. यावेळी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. राम ताकवले आणि एमकेसीएलचे संचालक विवेक सामंत उपस्थित होते. काळे म्हणाले, ''रवींद्रनाथांची प्रत्येक कविता एक छोटी कथा सांगते. झोपडीत राहणारी मुलगी रवींद्रनाथांची वसंत ऋतूवरची कविता गुणगुणते तेव्हा त्यांची सौंदर्यदृष्टी किती सर्वसमावेशक होती याची कल्पना येते.''

*** 'बालभारती'ची पाठ्यपुस्तके संगणकावर**

नवी पिढी संगणकावर अधिक वेळ रमते, याचा विचार करून पाठ्यपुस्तकांची निर्मिती करणाऱ्या'बालभारती'ने संकेतस्थळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध करून 'हायटेक' च्या दिशेने पाऊल टाकले आहे. बदलत्या काळात विद्यार्थी पाठ्यपुस्तकात रमायला हवे म्हणून या www.balbhaarati.in'डाऊनलोड' विभागात ही पुस्तके पाहता, वाचता येतील. सध्या पहिली व दुसरीची मराठी, गणित, इंग्रजी या तीन विषयांची पुस्तके उपलब्ध आहेत. लवकरच आठवीपर्यंतची सर्व पुस्तके येतील.




## गर्ल्स ऑफ रियाध

अनु. स्नेहल जोशी

एकविसाव्या शतकातही जुन्या पद्धतीने जगणाऱ्या समाजात त्यांना जगावे लागते. तेथील न संपणाऱ्या सांस्कृतिक मतभेदांना सामोरे जाताना ज्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते; अशा सौदी अरेबियातील चार तरुणींचा जीवनप्रवास

**२६०रु. पोस्टेज २५रु.**

*** नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांचा सत्कार**

एखादे नाटक गाजते तेव्हा त्यातल्या कलाकारांची चर्चा होते; पण त्या नाटकातील पडद्यामागचे कलाकार मात्र काहीसे दुर्लक्षितच राहतात. अशा बॅकस्टेज कलाकारांचा सेवा मित्र मंडळातर्फे कामगार दिनानिमित्त विशेष गौरव करण्यात आला. भरत नाट्य मंदिर आणि बालगंधर्व रंगमंदिर यातील डोअर बेल देणारे कर्मचारी, डोअर कीपर आदी कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र, शाल, श्रीफळ आणि मिठाई देऊन गौरव करण्यात आला. 'बालगंधर्व'चे व्यवस्थापक अमर परदेशी; तसेच भरत नाट्य मंदिराचे अध्यक्ष विजय वांकर या वेळी उपस्थित होते. गजानन भगत, गणेश सांगळे, विशाल भोसले अध्यक्ष ॲड. हेमंत झंजाड, शिरीष मोहिते, चेतन पवार आदींनी संयोजन केले. या उपक्रमाचे यंदाचे बारावे वर्ष होते.

*** गायिका अन् गायकी पुस्तकाचे प्रकाशन**

डॉ. शुभदा कुलकर्णी यांनी लिहिलेल्या गायिका अन् गायकी (ठुमरी व ख्याल) या पुस्तकाचे प्रसिद्ध गायक पंडित विजय सरदेशमुख यांच्या हस्ते प्रकाशन झाले. विसाव्या व एकविसाव्या शतकातील सामाजिकतेचा व त्यातून घडणाऱ्या गायिकांच्या सांगीतिकतेचा वेध या पुस्तकातून घेण्यात आला असल्याचे डॉ. रेखा इनामदार-साने यांनी सांगितले. या संशोधनासाठी शुभदा कुलकर्णी यांना संगीततज्ज्ञ भास्कर चंदावरकर यांचे मार्गदर्शन मिळाले आहे. अभ्यासाची बैठक व उत्स्फूर्तता या दोन्हींचा संगम या पुस्तकात असल्याचे कवी सुधीर मोघे यांनी सांगितले.

*** 'सेट'चा निकाल अवघा पाऊण टक्का**

राज्य शासनाच्या वतीने डिसेंबर २०१० मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता चाचणी (सेट) परीक्षेचा निकाल अवघा पाऊण टक्के म्हणजेच ०.७७ टक्के एवढा लागल्याचे जाहीर करण्यात आले आहे. पुणे विद्यापीठात घेण्यात आलेली २६ वी सेट परीक्षा ही महाराष्ट्रासह गोवा राज्यातील ५२ केंद्रांवर घेण्यात आली. परीक्षा केंद्रांवर ४३ हजार ५६८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ३३६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांना निकालाची प्रत माहितीसाठी www.setexam.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मिळालेले गुणसुद्धा संकेतस्थळावर एका महिन्याच्या आत प्राप्त होतील, असे सेट परीक्षेच्या उपकुलसचिवांनी जाहीर केले आहे. सेटची २७ वी परीक्षा ही येत्या सात ऑगस्टला होणार आहे.

*** अभ्यासक्रमांचा व्यापक विचार**

विद्यापीठाचा सध्याचा अभ्यासक्रम उच्च दर्जाचा आहे का, देशातील पहिल्या दहा विद्यापीठांच्या बरोबरीचा व जगातल्या पहिल्या दहा विद्यापीठांच्या बरोबरीचा

आपला अभ्यासक्रम आहे का, महाविद्यालयांमध्ये मिळणारे शिक्षण जगामध्ये कोठेही उपयुक्त ठरणारे आहे का, या दृष्टीने विचार करणे व तसे बदल करणे गरजेचे आहे, असे मत राज्याच्या उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. किर्दक यांनी व्यक्त केले.

*** बोलताना मोबाइल फोनची बॅटरी चार्ज होणार**

मोबाइल फोनवर बोलत असतानाच अचानक बॅटरी संपून फोन कट होण्याचा प्रसंग नेहमीचाच... तशात हाताशी चार्जर नसेल तर आणखी चीडचीड!..प्रत्येकाला हा अनुभव आला असणार.आता याच्या उलट अनुभव आपल्याला घेता येणार आहे. कारण 'बोलत' असतानाच फोन चार्ज होईल, असे तंत्रज्ञान दक्षिण कोरियामधील काही इलेक्ट्रिक इंजिनीअर्सनी एकत्रित येऊन विकसित केले आहे. बोलत असताना निर्माण होणाऱ्या ध्वनिलहरींतून वीजनिर्मिती करून ती मोबाइलच्या बॅटरीला पुरविणे, असे हे तंत्रज्ञान सोल येथील इन्स्टिट्यूट ऑफ नॅनोटेक्नोलॉजीने हे तंत्र विकसित केले आहे.

मोबाइलफोन वापरात नसतानाही आजूबाजूचे इतर आवाज तसेच मोबाइलमध्ये वाजवल्या जाणाऱ्या गाण्यांचे आवाज यावरूनही वीज निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू राहील, याची काळजी या तंत्रज्ञानाद्वारे घेण्यात आली आहे. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी सध्या जगभर पर्यायी वीजनिर्मितीसाठी प्रयत्न होत आहे. याचाच एक भाग म्हणून हा प्रयोग करण्यात आला असून याला 'साऊंड एनर्जी फ्रॉम स्पीच' असे नाव देण्यात आले आहे. या तंत्रज्ञानाचा वापर करून १०० डेसिबल आवाजामधून ५० मिलिवोल्टस वीजनिर्मिती होणार आहे. मोबाइल चार्जिंगसाठी एवढी वीज पुरेशी नसली, तरी विविध वायर्स आणि इतर सामग्री वापरून कमी आवाजापासून मोठ्या प्रमाणावर वीजनिर्मिती करण्यावर संशोधन सुरू आहे.

*** आरोग्य विज्ञान विद्यापीठ संस्था**

आरोग्य विज्ञान विद्यापीठांची संघटना स्थापन करण्यात आली असून, तिच्या संस्थापक अध्यक्षपदी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अरुण जामकर यांची निवड करण्यात आली आहे. देशभरात चौदा आरोग्य विज्ञान विद्यापीठे आहेत. आत्तापर्यंत या विद्यापीठांमध्ये कोणताही संवाद नव्हता. देशातील या विद्यापीठांची पहिली राष्ट्रीय परिषद पुण्यात यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीत (यशदा) झाली. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने तिचे आयोजन केले होते. या परिषदेत या चौदा विद्यापीठांनी एकत्र येऊन संघटना स्थापन केली. संशोधन परीक्षा पद्धती, समान परीक्षक अशा विविध उपक्रमांबद्दल विचार विनिमय करून वैद्यकीय शिक्षण व्यवस्था अद्ययावत होऊ शकेल.

*** राजर्षी शाहू ग्रंथाचा १४ भाषांत अनुवाद**

डॉ. जयसिंगराव पवार संपादित राजर्षी शाहू ग्रंथाचा अनुवाद अन्य चौदा भाषांत करण्याचा संकल्प महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीच्या वतीने जाहीर करण्यात आला. या ग्रंथाच्या कानडी आवृत्तीचे प्रकाशन कर्नाटक विद्यापीठ धारवाड येथे १० मे रोजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. एच.बी. वालीकर यांच्या हस्ते झाले. आसामी बंगाली, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मल्याळम, पंजाबी, सिंधी, तामिळ, तेलगू, आणि उर्दू, तसेच इंग्रजी,फ्रेंच, रशियन आणि जपानी या भाषांमध्ये ग्रंथाचा अनुवाद करण्यात येणार आहे. या अनुवादित ग्रंथासाठी मुख्यमंत्री निधीतून आवश्यक निधी देण्याची घोषणा मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी कोल्हापूर भेटीवर असताना केली होती.

*** पं. वसंतराव देशपांडे यांचे व्यक्तिमत्त्व अलौकिक**

चिंचवड येथील पं. वसंतराव देशपांडे फाऊंडेशनच्या वतीने डॉ. विकास कशाळकर आणि पं. चंद्रकांत लिमये यांचा एकसष्टीनिमित्त सत्कार करण्यात आला.

संगोराम म्हणाले, पं. देशपांडे यांचे गाणे आपण लहानपणापासून ऐकले आहे, वसंतराव हे अलौकिक व्यक्तिमत्त्व होते. भारतीय संगीतातील ते ताकदीचे कलाकार होते. तंत्रज्ञानाचे आक्रमण असतानाही डॉ. देशपांडे यांच्यासारखे गायक त्या तंत्रज्ञानावर स्वार झाले, त्यामुळेच ते टिकून राहिले. त्यांचे गाणे त्यांनी ताकदीने मांडले. भारतीय संगीत टिकविण्यासाठी मनापासून प्रयत्न केल्याबद्दल संगोराम यांनी पं. कुलकर्णी, पं. कशाळकर आणि पं. लिमये यांचा गौरव केला.

*** तिसरे विश्व साहित्य संमेलन सिंगापूरला**

तिसरे विश्व साहित्य संमेलन सिंगापूरला १३ आणि १४ ऑगस्ट रोजी होणार असून त्याचे अध्यक्ष ज्येष्ठ नाटककार महेश एलकुंचवार हे असणार आहेत. गेल्या वर्षी दुबई येथे दुसरे विश्व साहित्य संमेलन झाले होते. महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे यांनी याबाबत माहिती दिली. ''अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे तिसरे विश्व साहित्य संमेलन सिंगापूर येथे घेण्याचा निर्णय झाला आहे. त्याबाबत तेथील महाराष्ट्र मंडळाने प्रस्ताव दिला होता. संमेलनातील साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन हे महामंडळाच्या वतीने केले जाईल; तर सांस्कृतिक कार्यक्रमांची जबाबदारी सिंगापूरच्या मराठी मंडळावर सोपविली जाईल''.

*** 'कॉकटेल'चे प्रकाशन**

वात्रटिकाकार रामदास फुटाणे यांच्या कॉकटेल, सफेद टोपी लाल बत्ती आणि चांगभलं या तीन कवितासंग्रहाचे प्रकाशन केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला माजी खासदार यशवंतराव गडाख, ज्येष्ठ व्यंगचित्रकार

शि.द. फडणीस, कवी फ.मुं.शिंदे, अशोक नायगावकर, डॉ. विठ्ठल वाघ उपस्थित होते.

डॉ. विठ्ठल वाघ यांनी सध्याच्या परिस्थितीवर काव्यमय टिप्पणी करत कार्यक्रमात रंग भरला. अशोक नायगावकर यांनी मंत्र्यापासून ते सरकारी यंत्रणेच्या त्रुटी सांगणारी गद्य कविता सादर केली. समाजाला मार्गावर आणण्याचे काम कविता करत असते. रामदास फुटाण्यांच्या कविता हे शब्दचित्र असल्याचे ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि.द.फडणीस म्हणाले. दांभिकपणा, अपप्रवृत्तीवर प्रहार करत राहणे हे या क्षेत्राचे काम आहे. परिस्थितीची जाण, उत्तम निरीक्षण या दोन गोष्टींमुळे फुटाणेंसारखा उत्तम कवी महाराष्ट्राला मिळाला असे यशवंतराव गडाख यांनी नमूद केले.

''आपल्या काव्यप्रतिभेतून चार ओळींमध्ये आत्मचिंतनपर भाष्य करीत रामदास फुटाणे यांनी समाजाला नवे शिक्षण दिले आहे. वात्रटिकेतून हसवता हसवता समाजातील बिघडलेला तोल सुधारण्याचा प्रयत्न करणाऱ्या कवीला कोणी थांबवू शकत नाही,'' असे केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी सांगितले.

फुटाणे म्हणाले, ''चित्रपट निर्मितीच्या माध्यमातून कर्जबाजारी झालो तेव्हा बिनभांडवली धंदा म्हणून कविता करू लागलो. केवळ हसविणे आणि व्यंग्य शोधणे एवढाच त्यामागचा उद्देश नाही. व्यंग आणि वास्तव यातील अंतर कमी होते तेव्हा समाजात वाईट, स्फोटक घडू शकते.''

*** नवे कलाकार मिळत नाहीत**

तमाशाने जन्म दिलेली लावणी सातासमुद्रापार पोचली. मात्र, तमाशा अजूनही गावच्या यात्रा, जत्रांमध्येच अडकला आहे. त्याला आता लोकाश्रयाबरोबरच राजाश्रयाची गरज आह, अशी खंत प्रसिद्ध तमाशा कलावंत मंगला बनसोडे यांनी व्यक्त केली. पन्नासहून अधिक काळ तमाशाच्या माध्यमातून कलेची सेवा करणाऱ्या मंगलाबाई साठीच्या उंबरठ्यावर असूनही नृत्य करून मनोरंजन करीत आहेत. तमाशा टिकून रहावा यासाठी त्यांचा जीव तीळतीळ तुटतो आहे. प्रसिद्ध तमाशा कलावंत विठाबाई भाऊ मांग यांची मुलगी असल्याचा सार्थ अभिमान बाळगणाऱ्या मंगलाबाईंनी वयाच्या सातव्या वर्षी (१९५९ मध्ये) नृत्याला सुरुवात केली. आजही त्या प्रत्येक प्रयोगात




# द फकीर

अनु. सुनीति काणे

फक्त तुम्हाला कसं जगायचं एवढंच तो शिकवत नाही... तर मरण कसं स्वीकारायचं हेही तो शिकवतो. अशी अजब विनोदबुद्धी असलेल्या फकिराचा जीवनप्रवास तुमचं आयुष्य बदलू शकेल. कसे? ते वाचा

**१८०रु. पोस्टेज २५रु.**

एक गाणे सादर करतात. 'पोटासाठी नाचते मी, पर्वा कुणाची,' हे गीत म्हणजे आमची प्रेरणा आहे, असे मंगलाबाई सांगतात.

त्या म्हणाल्या, तमाशाला महिलांचा प्रेक्षक वर्ग मिळावा, यासाठी कोल्हापूर, जळगाव या ठिकाणी मी आवर्जून प्रयत्न केले. मात्र आता तमाशाला नवीन महिला कलाकार सापडत नाहीत. त्यामुळे आहे त्या कलाकारांना प्रसंगी जास्त पैसे देऊन अक्षरश: थोपवून ठेवावे लागते. ५० ते ६० हजार रुपये उचल देऊन आकर्षित करावे लागते. गावोगावी प्रयोग करताना काही कटू अनुभवांना सामोरे जावे लागत असले, तरी तमाशाचा गोडवा अजूनही टिकून असल्याचा हेवा वाटतो. तमाशा जिवंत राहण्यासाठी त्याला लोकाश्रयाबराबरच आता राजाश्रयाची गरज आहे.

*** 'लावण्यसंध्या'**

महाराष्ट्राचे लोकसंगीत आणि संस्कृतीची श्रीमंती प्रकट करणाऱ्या 'लावण्यसंध्या' कार्यक्रमात गायक, वादक यांच्यासह ६५ कलाकारांनी रंगत आणली. 'शुभ मंगल चरणी गण नाचला' या गणानंतर 'घनश्याम सुंदरा' ही भूपाळी सादर झाली. 'सुंदर माझं जातं ग' ही जात्यावरची ओवी, 'दाम करी काम' हे वासुदेवाचे गीत, 'गाऊ मोटवरचं गाणं', 'नाव सांग सांग', 'जिवा शिवाची बैल जोडी' या गीतातून शेतकऱ्याचे जीवन उलगडले. 'दत्त दर्शनाला जायाचं', 'चंद्रभागेच्या तीरी' या भक्तिरचना, 'तुम्हावर केली मी मर्जी बहाल,' 'मला हो म्हणत्यात लवंगी मिरची', 'बुगडी माझी सांडली गं' यांसारख्या गीतांनी कार्यक्रमात रंग भरला. पारंपरिक गोंधळ सादर करून कार्यक्रमाची सांगता झाली.

*** वेदामुळे मनुष्य अंतरंगातून श्रीमंत होतो**

''वेदविद्या ही पोट भरायचे साधन नसून, ती अलौकिक विद्या आहे. वेदाने मनुष्य अंतरंगातून श्रीमंत होतो,'' असे मत वेदाभ्यासक शंकर अभ्यंकर यांनी सप्तर्षी वेदपाठ प्रतिष्ठानच्या पदवीदान सोहळ्यात व्यक्त केले. प्रतिष्ठानचे प्रमुख डॉ. नित्यानंद देशमुख, पुणे विद्यापीठाच्या वेद विभागाचे प्रमुख रवींद्र मुळे यावेळी उपस्थित होते. पाठशाळेच्या ३५ विद्यार्थ्यांना वेदशास्त्रातील ब्रह्मविद्या ही पदवी प्रदान करण्यात आली. अभ्यंकर म्हणाले, ''संपूर्ण विश्व हे जर घर असेल तर भारत देश त्या घरातील देवघर आहे. कारण वेदांमुळे भारतास पावित्र्य लाभले आहे. वेद, उपनिषदे यांचा प्रसार करणे ही चांगली गोष्ट आहे. वेदशास्त्र शिकवताना त्याची शुद्ध परंपराही कायम राखली पाहिजे,'' मुळे म्हणाले, ''वेद विचाराने आपण आपल्या मनातील विकार दूर करू शकतो. माणूस म्हणून कसे जगायचे याचे ज्ञान आपणास वेद शिकवतात.''

*** ठाणे संमेलन - एक कोटीची शिल्लक**

ठाणे संमेलन जाहीर झाल्यापासूनच ते वादाच्या भोवऱ्यात सापडले ते अखेरपर्यंत.

संमेलनासाठी निधी कमी पडत असल्याचे कारण देत शेवटच्या दिवसापर्यंत निधीसंकलन सुरू राहिले. संमेलनासाठी जमा २ कोटी ५ लाख रुपयांपैकी अवघे १ कोटी ६ लाख रुपयेच खर्ची पडल्याने ९९ लाखांची घसघशीत रक्कम आयोजक मराठी ग्रंथ संग्रहालयाला मिळाली आहे. प्रतिभा इंडस्ट्रीज, व्हॅल्यूएबल इन्फ्रास्ट्रक्चर, मॉडर्न रोड मेकर्स, विजय भावे तसेच राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ या प्रत्येकाकडून २५ लाख असे सव्वा कोटी रुपये मिळाले. याखेरीज नवी मुंबई, वसई, विरार, भिवंडी निजामपुर, कल्याण डोंबिवली, मीरा भाईंदर या पालिकांनी एकूण ३६ लाख रुपये दिले. विद्यार्थ्यांनी प्रत्येकी १० रुपये दिल्याने ९० हजार जमा झाले. संमेलनमंडपाचा ६५ लाखांचा खर्च ठाणे महापालिकेने केल्याने खर्च १ कोटी ६ लाख रुपये इतकाच झाला. मंडप व इतर सुविधा (२० लाख), निवास (११ लाख) भोजन (१४ लाख) स्टेशनरी व इतर छपाई (१२ लाख ८४ हजार रुपये) उरलेले ९९ लाख रुपये आयोजक मराठी ग्रंथ संग्रहालयाकडे सुपुर्द केल्याची माहिती कोषाध्यक्ष संजीव ब्रह्मे यांनी दिली. साहित्य महामंडळाच्या घटनेनुसार साहित्य व ग्रंथालय चळवळीच्या प्रसारासाठी या निधीचा विनियोग केला जाऊ शकतो.

*** 'ज्ञानसुधा' पुस्तकाचे प्रकाशन**

होराभूषण वि.ल.शिंत्रे यांच्या 'ज्ञानसुधा' पुस्तकाचे प्रकाशन संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांच्या हस्ते झाले. मनश्री प्रकाशनच्या या कार्यक्रमात कुंदा वैशंपायन, ए.एस.फाटक, वृषाली देशपांडे, विनय फडके, रवी कुलकर्णी आदी उपस्थित होते. डॉ. देखणे म्हणाले की, सद्विचारांची जाणीव करून देणारी शक्ती म्हणजे अध्यात्म.

*** सचिन जोशी यांच्या पुस्तकांचे प्रकाशन**

'गड-कोट ही महाराष्ट्राची दौलत आहे. किल्ल्यांकडे फक्त पर्यटन म्हणून न पाहता अभ्यास, उत्सुकता आणि उपयुक्तता म्हणून त्यांच्याकडे पाहावे,' असे मत शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी 'बुकमार्क पब्लिकेशन'च्या सचिन जोशी लिखित 'रायगड जिल्ह्याचे दुर्गवैभव' आणि 'रत्नागिरी जिल्ह्याची दुर्गजिज्ञासा' या दोन पुस्तकांचे प्रकाशन करताना व्यक्त केले. 'किल्ल्यांचा अभ्यास करताना त्या गड-कोट दुर्गांच्या इतिहासाचाही मागोवा घेणे गरजेचे आहे,' असे सांगून सध्याची तरुण पिढी विविध प्रकारे अभ्यास करीत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

गडावरील पाण्याच्या टाक्या आणि इतर अवशेष काळाच्या ओघात लुप्त होत चालले असल्याने त्यांचे संवर्धन आणि जतन सरकारसह जनतेनेही केले पाहिजे, असे मत पाळंदे यांनी व्यक्त केले. 'जीपीएस आणि गुगल-अर्थ या अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे किल्ल्यांचे नकाशे आणि तेथील अवशेषांचे आरेखन या दोन्हीही पुस्तकात दिले आहे. ते वाचकांना उपयुक्त ठरेल,' असा विश्वास जोशी यांनी व्यक्त केला.

*** बाबा पाठक यांच्या गौरवार्थ चित्रसाहित्य उत्सव**

'एक साहित्यिक म्हणून बाबा पाठक सर्वांना परिचित आहेतच; मात्र, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करायचा झाला तर, त्यांच्या साहित्याबरोबर त्यांच्या पटकथालेखनालाही साहित्यिक दर्जा द्यायला हवा. चित्रपट पाहणाऱ्या प्रेक्षकांना अशा पटकथा पाहायला, वाचायला मिळायला हव्यात.' राष्ट्रीय सन्मानप्राप्त दिग्दर्शक, ज्येष्ठ साहित्यिक, उत्तम पटकथाकार असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व लाभलेले मधुकर गोपाळ तथा बाबा पाठक यांनी नुकतीच वयाची ८५ वर्षे पूर्ण केली, त्यानिमित्ताने त्यांच्या गौरवार्थ चित्रसाहित्य उत्सवाचे आयोजन करण्यात आले.

साहित्यिक म्हणून बाबा पाठकांचे योगदान महत्त्वपूर्ण असून, वाचनीयता हे वाङ्मयाचे लावण्य बाबांच्या साहित्यात आहे. गोष्टीवेल्हाळ माणूस म्हणून त्यांची ख्याती आहे. बाबा पाठकांच्या स्वभावातील स्थायीभाव त्यांच्या लेखनात डोकावणारा आहे. समोरच्या व्यक्तीबरोबर संवाद साधण्याची ताकद त्यांच्या लिखाणात असून त्यांच्या पटकथा लेखनालाही साहित्य म्हणून मान्यता मिळायला हवी, असे मत सुरेशचंद्र पाध्ये यांनी व्यक्त केले.

शब्दांचा फुलोरा मांडणाऱ्या साहित्यिकांच्या रांगेत माणसाच्या मनातले भाव शब्दात नेमकेपणाने कोरणारे बाबा पाठक यांचे योगदान मोठे असल्याची भावना द.मा.मिरासदार यांनी व्यक्त केली.

*** सावरकरांचे साहित्य 'ई-बुक'च्या स्वरूपात**

स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांचे विचार तरुणांपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने त्यांनी लिहिलेली सर्व पुस्तके 'बुकगंगा डॉट कॉम' या वेबसाइटवर मोफत उपलब्ध करण्यात आली आहेत. गेल्या काही वर्षांत 'ई-बुक' ही संकल्पना स्थानिक भाषांमध्येही लोकप्रिय होत असून, विशेषत: जगाच्या कानाकोपऱ्यात वास्तव्यास असलेल्या तरुणवर्गाचा यात मोठा सहभाग आहे. वेबसाइटवरून पुस्तके डाऊनलोड करून त्यांचा संगणकावर संग्रह करायचा आणि फावल्या वेळेत वाचन करायचे, ही तरुणांची सवय असल्याने ई-पुस्तकांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे.

१८५७ चे स्वातंत्र्यसमर या पुस्तकाचे चार भाग, सावरकरांचे निबंध, कविता, स्फूट लेख, सावरकरांची सामाजिक भाषणे, आता मृत्यूचे स्वागत करावे, आत्मचरित्र : माझ्या आठवणी, अंदमानाच्या अंधेरीतून, बोधी वृक्ष, हिंदूराष्ट्र दर्शन अशा ६० हून अधिक पुस्तकांचा समावेश आहे. द रिव्होल्यूशनिस्ट टू हिमसेल्फ आणि इंडियन वॉर ऑफ इंडिपेंडन्स हे इंग्रजीतील खंडही मोफत उपलब्ध करण्यात आले आहेत. वाचण्यास अतिशय सुटसुटीत आणि आकर्षक मांडणी असल्यामुळे या ई-पुस्तकांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे, अशी माहिती 'बुकगंगा डॉटकॉम'चे मयुरेश जोगळेकर यांनी दिली.

*** अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलन**

अण्णा भाऊ साठे पेटून उठले म्हणूनच ते लिहू शकले. शोषण आणि विषमतेविरुद्ध जोपर्यंत पेटून उठत नाही, तोपर्यंत लेखन प्रक्रिया शक्य नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेली जाती अंताची लढाई आता आणखी तीव्र करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन तिसऱ्या राज्यव्यापी कॉ. अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलनाचे उद्घाटक प्रेमानंद गज्वी यांनी केले.

नांदेड येथे अण्णा भाऊ साठे साहित्य संमेलनाचे उद्घाटन प्रेमानंद गज्वी यांच्या हस्ते चार रंगाच्या कापडाची एक गाठ बांधून झाले. व्यासपीठावर संमेलनाध्यक्ष दीनानाथ मनोहर, साहित्य संमेलनाचे अध्यक्ष उत्तम कांबळे, स्वागताध्यक्ष संजय रुईकर, सतीश काळसेकर, मार्गदर्शक गोविंद पानसरे, अर्जुन डांगळे, माजी संमेलनाध्यक्ष प्रा. राजन गवस, आमदार ओमप्रकाश पोकर्णा उपस्थित होते.

गज्वी म्हणाले, ''एखाद्या व्यक्तीच्या नावाने होत असलेल्या साहित्य संमेलनातून व्यक्तिवादाचा पुरस्कार तर होणार नाही ना, याचाही विचार झाला पाहिजे. खरा कॉम्रेड हा डॉ. आंबेडकर यांच्या जाती अंताच्या लढाईचा पाईक असला पाहिजे. अण्णा भाऊ साठे आणि डॉ. आंबेडकर यांचे मनस्वी नाते होते. या दोघांच्या विचारांचा विसर पडला, तर कुणाचेच भले होणार नाही. या दोघांच्या विचारांची भिंत कोणी भेदू पाहत असेल तर जात लढ्याबरोबरच वर्ग लढ्याचेही मोठे नुकसान होणार आहे.''

ज्येष्ठ नेते गोविंद पानसरे यांनी साहित्य संमेलनाची भूमिका स्पष्ट केली. सध्या सर्व क्षेत्रांतील चळवळी मंदावल्या आहेत. त्या नाहीशा होणार नाहीत; पण त्याला उभारी देण्याची सध्या तीव्र गरज आहे. त्यामुळे वर्तमानात प्रेरणा मिळत नसतील तर इतिहासात जाऊन प्रेरणा मिळवाव्या लागतात. तो उद्देश डोळ्यांसमोर ठेवून हे साहित्य संमेलन आयोजित केले असल्याचे ते म्हणाले. अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनाचा आणि विचारांचा विरोध प्रस्थापितांनी केला तो साहजिकच आहे; पण त्यांच्या अनुयायांनीही केला याचा खेद वाटतो असे पानसरे म्हणाले.

महापौर बिसेन यांनीही अशा संमेलनामधून राजकीय व्यक्तींचे मतपरिवर्तन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. माजी संमेलनाध्यक्ष राजन गवस यांनीही आपले विचार मांडले. संयोजक फारुख अहेमद यांनी प्रास्ताविक केले. बालाजी थोटवे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रदीप नागापूरकर यांनी आभार मानले. या संमेलनाला ज्येष्ठ नाटककार प्रा. दत्ता भगत, वासुदेव मुलाटे, मनोहर टाकसाळ, हेमंत पाटील, मनोज बोरगावकर, डॉ. आदिनाथ इंगोले उपस्थित होते.

*** स्ट्रगलर्ससाठी क्रिसेंडो ट्रस्टची स्थापना**

नृत्य, नाटक आणि संगीत अशा तीन कलांचा वारसा पुढे चालविणाऱ्या स्ट्रगलर्सना साह्य करण्यासाठी दिवंगत कलाकार सुरेश बसाळे यांच्या स्मरणार्थ

क्रिसेंडो ट्रस्ट स्थापन झाला आहे. होतकरू कलाकारांना अर्थसाह्य तसेच व्यासपीठ मिळवून देण्यात येणार आहे. महानिर्वाण, घाशीराम कोतवाल, तीन पैशांचा तमाशा अशी नाटके आणि उंबरठा, सिंहासन, सामना अशा अनेक चित्रपटामधून भूमिका केलेल्या बसाळे यांनी स्ट्रगलर्ससाठी काहीतरी काम करण्याची इच्छा होती. प्रसिद्ध नाटककार सतीश आळेकर, संगीतकार आनंद मोडक यांच्या उपस्थितीत ट्रस्टचे उद्घाटन झाले.

*** जीवन समृद्ध करण्यासाठी संशोधन हवे**

'मनाचे विविध पैलू, छटा आणि फुलांचा रंग या तीन विषयांतील संशोधन मानवी जीवन अधिक समृद्ध करेल,'' असे मत ज्येष्ठ संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांनी व्यक्त केले. संत ज्ञानेश्वर ॲकॅडमी ऑफ इन्व्हेंशन, रिसर्च आणि इनोव्हेशन' या संशोधन केंद्राचे उद्घाटन भटकर यांच्या हस्ते झाले, ते म्हणाले, ''आजच्या वैज्ञानिक युगात माहिती तंत्रज्ञान, संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता, पार्टिकल फिजिक्स या माध्यमातून अद्भुत संशोधन झाले आहे. तरीही मानवाच्या मनाचा थांगपत्ता अद्याप कुणालाही लागला नाही. गंध या विषयावरही कमी संशोधन झाले आहे. तसेच मनाचे पैलू, छटा आणि फुलांचा रंग यांची वैज्ञानिक परिमाणे अस्तित्वात नाहीत. संत ज्ञानेश्वर ॲकॅडमीत प्रामुख्याने या विषयावर संशोधन होणार आहे. या केंद्रावर नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक मूल्ये यावर आधारित व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. 'माईर्स एमआयटी'चे डॉ. विश्वनाथ कराड, अधिष्ठाता शरच्चंद्र दराडे पाटील, कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनील कराड, डॉ. संजय उपाध्ये, मिलिंद पांडे आदी उपस्थित होते.

*** डॉ. शरच्चंद्र गोखले यांच्या कार्याचा गौरव**

कुष्ठरोगी, अंध, अपंग आणि वृद्धांना कशी देतो, यावरच आपल्या सुस्कृंतपणाचे मोजमाप करता येईल. या घटकांना भीक नको आहे, त्यांना जगण्याची संधी दिली तरच आपला देश खऱ्या अर्थाने समृद्ध झाला असे म्हणता येईल, असे प्रतिपादन 'कास्प'चे डॉ. शरच्चंद्र गोखले यांनी केले. महापालिकेच्या वतीने डॉ. गोखले यांना महापौर मोहनसिंग राजपाल यांच्या हस्ते मानपत्र, स्मृतिचिन्ह, पुणेरी पगडी देऊन गौरव करण्यात आला. महापौर राजपाल यांनी 'कास्प' या संस्थेला अकरा लाख रुपये देणगी जाहीर केली. माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. माजी केंद्रीय सचिव बी.जी. देशमुख, निवृत्त तुरुंग महासंचालक राम बेलवडी, रोहिणी गोखले आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

ज्येष्ठ समाजवादी नेते एस.एम. जोशी, अच्युतराव पटवर्धन यांच्यामुळे समाजकार्याची प्रेरणा मिळाल्याचे डॉ. गोखले यांनी नमूद केले. पत्नी रोहिणी यांचे पाठबळ मिळाले नसते तर काम करता आले नसते याचा उल्लेख त्यांनी केला. पुढील काळात वृद्धांची

संख्या, समस्या वाढणार असल्याचे नमूद करीत डॉ. गोखले यांनी काही वृद्धांचे अनुभव सांगितले. ''कुष्ठरोगी हा समाजातील सर्वांत शेवटचा माणूस आहे. त्याची जबाबदारी घेण्याचे आपले कर्तव्य आहे की नाही याचा विचार समाजानेच करायला हवा.'' असे डॉ. गोखले यांनी सांगितले. प्रमुख पाहुणे न्यायमूर्ती धर्माधिकारी यांनी आपल्या मनोगतात डॉ. गोखले यांच्या कार्याचा गौरव केला. स्थायी समितीचे अध्यक्ष गणेश बिडकर, विरोधी पक्षनेते आबा बागूल उपस्थित होते. नगरसेवक विकास मठकरी यांनी प्रास्ताविक तर मुक्ता टिळक यांनी आभार मानले.

*** 'शिका आणि कमवा'च्या ब्रँड ॲम्बेसेडरपदी मकरंद अनासपुरे**

विनोदी भूमिका आणि त्यातील अस्सल ग्रामीण लहेजामुळे खेड्यापाड्यांतील गावकऱ्यांना आपलासा वाटणारा प्रसिद्ध अभिनेता मकरंद अनासपुरे यांना 'ब्रँड ॲम्बेसेडर' म्हणून नियुक्त करण्यात आल्याचे यशस्वी इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी यांनी जाहीर केले.

'शिका आणि कमवा' योजनेमध्ये सहभागी होऊन शिक्षणासह नोकरीचा अनुभव मिळण्याची संधी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहे. कंपनीत प्रत्यक्ष मिळणारा कामाचा अनुभव त्यांना पुढील वाटचालीत दिशादर्शक ठरू शकेल. विद्यार्थी, दहावी, बारावी पास, नापास, आयटीआय आणि एमसीव्हीसी विद्यार्थ्यांना विद्यावेतनासह ट्रेनिंग आणि परीक्षा फी उद्योग क्षेत्रामार्फतच दिली जात असल्याने विद्यार्थ्यांनी या संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन अनासपुरे यांनी केले.

*** डॉ. पांडे यांच्या 'ग्रेट अंदमानीज' पुस्तकाचे लंडनमध्ये प्रकाशन**

साडेसात हजार वर्षांपूर्वी अंदमानमध्ये वास्तव्यास आलेल्या 'ग्रेट अंदमानीज' या समाजाचे वैशिष्ट्यपूर्ण पैलू उलगडणाऱ्या 'ग्रेट अंदमानीज : भाषाशास्त्राच्या दृष्टीने संस्कृतीमधील पक्षीशास्त्र' या पुस्तकाची लंडन विद्यापीठाने दखल घेतली आहे. हे पुस्तक पक्षी तज्ज्ञ डॉ. सतीश पांडे आणि अन्विता अबी यांनी लिहिले आहे. १२ मे रोजी लंडन विद्यापीठामध्ये त्याचे प्रकाशन झाले.

अतिशय सुसंस्कृत आणि बुद्धिमान असूनही 'ग्रेट अंदमानीज' समाजावर पूर्वी नरमांसभक्षक असा शिक्का बसला. तेव्हापासून हा समाज विकसित मानवजातीपासून दुर्लक्षित राहिला... हळूहळू नष्टही झाला. या समाजाने स्वत:ची संस्कृती जपली होती. त्यांना लेखन येत नव्हते, पण बोलीभाषा परिपूर्ण होती. या लोकांनी तेथील वनस्पती, जीवसृष्टी, पक्षिजीवन यांचे त्यांच्या पद्धतीने वर्गीकरण केले होते. स्थानिक भाषेत त्यांनी प्रत्येकाला विशिष्ट नावे ठेवली होती आणि निसर्गसाखळीतील या जीवांचे महत्त्व त्यांना माहिती होते. दुर्मिळ जातींच्या संवर्धनासाठीही ते प्रयत्नशील होते. त्यांच्याविषयी अधिकृत माहिती असणाऱ्या काही मोजक्याच व्यक्ती हयात आहेत. सात वर्षे अभ्यास करून या समाजाची संस्कृती आणि परंपरा पुस्तकरूपाने

समाजासमोर आणली आहे, अशी माहिती डॉ. पांडे यांनी दिली.

'बर्डस ऑफ ग्रेट अंदमानीज' (ॲन्थ्रो ऑर्निथॉलाजी: बर्ड्स ऑफ ग्रेट अंदमानीज : नेम्स क्लासिफिकेशन अँड कल्चर) हे पुस्तक ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीने प्रकाशित केले आहे. पक्षी अभ्यासकांना 'फिल्ड गाइड' म्हणून याचा उपयोग होईल.

❐


## आनंदाचं पासबुक

**श्याम भुर्के**




**३००रु.**
**पोस्टेज ३०रु.**

दुर्दम्य इच्छाशक्ती असेल तर माणूस अनेक क्षेत्रात यश प्राप्त करू शकतो.
श्याम भुर्के यांनी 'बँक ऑफ महाराष्ट्र'मध्ये यशाचे शिखर गाठले.
साहित्य व कला क्षेत्रात भरारी मारली. वि.स. खांडेकर, आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे, रणजित देसाई, जगदीश खेबूडकर, राम गबाले, भीमसेन जोशी, शरद तळवलकर, सुरेश भट, वामनराव चोरघडे, प्रा. शिवाजीराव भोसले अशा अनेक नामवंतांसंबंधीच्या आठवणी आनंददायी आहेत. डॉ. शिवाजीराव पटवर्धन, डॉ. स्वर्णलता भिशीकर यांच्या समाजकार्यात ते सहभागी झाले. खुमासदार अत्रे, पु.ल. एक आनंदयात्रा, नंदादीप-वि.स. खांडेकर, साहित्यिक सावरकर, गोनीदां-एक झंझावात, व्यंकटेश माडगुळकरांची गोष्ट, मिरासदारी, शरद तळवलकर-गुदगुल्या असे कार्यक्रम रसिकांपर्यंत पोहोचविले. ज्याला आयुष्यात मोठं व्हावंसं वाटतं, यशस्वी व्हावंसं वाटतं, आनंदी रहावंसं वाटतं; त्याला हे पुस्तक नक्कीच प्रेरणा देईल.



## या सुखांनो

**सुरेश वसंत नाईक**

सर्वांगानी जीवनाचे मर्म शोधून सुखाचा मार्ग दाखवणारे सुंदर ललितलेखन

**१७०रु. पोस्टेज २५रु.**

**८ वी आवृत्ती आता नव्या रूपात**




# संभाजी

**विश्वास पाटील**

**४८०रु. पोस्टेज ३०रु.**

औरंगजेबाच्या पाच लाख फौजेशी
सलग आठ वर्षे कडवी झुंज देणारा मराठ्यांचा दुसरा छत्रपती,
ज्याने वयाच्या बत्तीसाव्या वर्षी कराल काळाच्या वेदीवर
आपले मस्तक दिले;
पण शिवरायांच्या हिंदवी स्वराज्यातील
एकही महत्त्वपूर्ण किल्ला
किंवा आपल्या आरमारातील एकही जहाज गमावले नाही!
गेली सव्वातीनशे वर्षे या विचारी,
कवी-राज्यकर्त्याची आणि पराक्रमी सेनानीची गाथा
संशयाच्या धडप्यामध्ये गुंडाळून ठेवली गेली होती!

आजचे अग्रगण्य प्रतिभावंत कादंबरीकार विश्वास पाटील यांना
सह्याद्रीच्या निबिड दऱ्याखोऱ्यांनी,
सागरखाड्यांनी आणि दुर्लक्षिलेल्या दुर्मिळ कागदपत्रांनी
सांगितलेली शिवपुत्र संभाजीराजांची

चित्तथरारक, वादळी, पण वास्तव गाथा!!

**नवे कोरे**




# ग्रोईंग अप बिन लादेन

**जीन सॅसन/नज्वा बिन लादेन/ ओमर बिन लादेन**

अनु. **बाळ भागवत**

**४०० रु. पोस्टेज ३० रु.**

११ सप्टेंबर, २००१ रोजी आजपर्यंतच्या सर्वात मोठ्या दहशतवादी हल्ल्यात
अमेरिकेत चार प्रवासी विमानांचे
अपहरण करून ती अमेरिकन लक्ष्यांवर आदळवतात.
त्या पैकी दोन विमाने वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या गगनचुंबी
इमारतींना धडक देतात आणि त्या कोसळतात
हे जगभर प्रसारित झालेले दृश्य कोणीच विसरू शकत नाही.
तीन हजार निरपराध लोक जीव गमावतात.
त्या वेळेपासून दहशतवाद हा शब्द उच्चारताच
प्रथम एकच चेहरा डोळ्यांसमोर येतो, ओसामा बिन लादेन!
हा इतका कट्टर दहशतवादी बनला कसा
हे कळणे अवघड होते; कारण अत्यंत धनाढ्य
अशा कुटुंबात त्याचा जन्म झाला होता.
पण आता त्याला ओळखणारे त्याच्या कुटुंबामधले
कुणीही त्याच्याबद्दल बोलायला
तोंड उघडायलाच तयार नव्हते.
आणि मग खरे तर आश्चर्यच घडले,
ओसामाची पहिली पत्नी नज्वा आणि त्यांचा चौथा मुलगा ओमर यांनी
बोलण्याची तयारी दर्शवली.
कट्टर धर्मवेडा, दहशतवादी, स्वत:च्या मुलांनीही
आत्मघातकी हल्लेखोर बनावे अशी आशा बाळगणाऱ्या
ओसामा बिन लादेनच्या व्यक्तिमत्त्वाचे वेगळेच पैलू उलगडले.
त्यांनी सांगितलेली चित्तवेधक कथा म्हणजेच
**ग्रोईंग अप बिन लादेन!**

# द. मा. मिरासदार यांची खुमासदार शैलीतील पुस्तके आता नव्या रूपात















| | | | |
|---|---|---|---|
| १. चकाट्या | ₹ १५० | १०. माकडमेवा | ₹ १२५ |
| २. गंमत गोष्टी | ₹ १४० | ११. गुदगुल्या | ₹ १२० |
| ३. हसणावळ | ₹ १४० | १२. सरमिसळ | ₹ १२० |
| ४. भोकरवाडीच्या गोष्टी | ₹ १४० | १३. नावेतील तीन प्रवासी | ₹ १२० |
| ५. बेंडबाजा | ₹ १४० | १४. खडे आणि ओरखडे | ₹ ११० |
| ६. विरंगुळा | ₹ १३० | १५. मी लाडाची मैना तुमची | ₹ ७० |
| ७. गप्पांगण | ₹ १३० | १६. सुट्टी आणि इतर एकांकिका | ₹ ७० |
| ८. माझ्या बापाची पेंड | ₹ १३० | १७. जावईबापूंच्या गोष्टी | ₹ ६० |
| ९. चुटक्याच्या गोष्टी | ₹ १२५ | १८. गाणारा मुलुख | ₹ ४० |

**संपूर्ण संचाची किंमत ₹ २०६०/-**

**पोस्टेज / कुरीअर खर्च १००/-**

**रक्कम मनिऑर्डरने किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवून आमच्याकडे नोंदणी करा अथवा नजिकच्या विक्रेत्याकडे नोंदवा.**

## मेहता पब्लिशिंग हाऊस

**१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड, पुणे ३०.**

**फोन : २४४७६९२४, २४४६०३१३**

**मेहता बुक सेलर्स,** कोल्हापूर. फोन २५४२९०१

E-mail : info@mehtapublishinghouse.com | Website: www.mehtapublishinghouse.com

# विशेषवार्ता




*** मैत्री पुस्तकांशी' पुस्तक प्रदर्शन, ड्रॉईंग स्पर्धा, फॅन्सी ड्रेस क्राफ्ट स्पर्धा**

दि. ६ मे ते ११ मे २०११ या पाच दिवसात मुलांना वाचनाबरोबर मनोरंजनाची मजा देणारा पुस्तक महोत्सव अर्थात **'मैत्री पुस्तकांशी'** हा उपक्रम मेहता पब्लिशिंग हाऊसने आयोजित केला होता.पुस्तकांच्या दालनातली विविध पुस्तके मुलांनी हाताळली. शिवाय चित्रकला (६मे), फॅन्सी ड्रेस (७मे), क्राफ्ट स्पर्धा (८मे) आणि सायन्स प्रोजेक्ट (६ ते १०मे) या स्पर्धांमध्ये मुलांनी भाग घेतला.

त्यातल्या उत्तम प्रयत्नांना बालसाहित्यिक डॉ. न. म. जोशी यांच्या हस्ते ११ मे रोजी पारितोषिके देण्यात आली. या सर्व स्पर्धा संध्याकाळी ४ ते ६ या वेळात मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पुस्तक दालनातच भरविल्या गेल्या होत्या. यानिमित्ताने सर्वच पुस्तकांच्या खरेदीवर २० टक्के सवलत ठेवली होती..





* **मेहता बुक सेलर्स तर्फे पुस्तक वाटप**

२३ एप्रिल हा जागतिक वाचक दिन. या दिनाचे औचित्य साधून मेहता बुक सेलर्स यांच्या तर्फे महात्मा गांधी यांच्या 'माझे सत्याचे प्रयोग' या आत्मचरित्राच्या दोनशे प्रती मोफत वितरीत करण्यात आल्या. कवी सतीश सोळांकूरकर, श्री. अनिल मेहता, डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या उपस्थितीत शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे हा कार्यक्रम पार पडला.



**पुस्तकांचे वाटप करताना सतीश सोळांकूरकर, अनिल मेहता, डॉ. सुनीलकुमार लवटे**

### * 'ग्रोईंग अप बिन लादेन' चे प्रकाशन

''देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत भयावह असा दहशतवादी हल्ला होतो आणि त्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरासाठी निर्णय घेण्यास तब्बल १२ तास लागतात. तत्काळ निर्णय क्षमतेचा अभाव आपल्याकडे असून, आपण अजूनही महासत्ता झालेलो नाही. त्यामुळे पाकिस्तानात घुसून अमेरिकेने कुख्यात दहशतवादी लादेनला ठार केले या कारवाईसारखी कारवाई करण्याची क्षमता आपल्या देशात नाही'', असे परखड मत ज्येष्ठ पत्रकार अरुण शौरी यांनी व्यक्त केले.

अमेरिकन लेखिका जीन सॅसन यांनी लिहिलेल्या आणि बाळ भागवत यांनी मराठीत अनुवादित केलेल्या 'ग्रोईंग अप बिन लादेन' पुस्तकाचे प्रकाशन शौरी यांच्या हस्ते करण्यात आले. व्यासपीठावर विशेष सरकारी वकील ॲड उज्ज्वल निकम, निवृत्त लष्करी अधिकारी शशिकांत पित्रे, 'मेहता पब्लिकेशन'चे सुनील मेहता आदी उपस्थित होते.

महासत्ता असलेली राष्ट्रे आपल्या मनाप्रमाणे जगात कुठेही कारवाई करू शकतील. मात्र भारताला अशी कारवाई करण्यासाठी धोरणात्मक बदल करावे लागतील. कारण मुंबईवरील हल्ला होऊन खूप काळ लोटलेला नाही. त्यामुळे आपल्या धोरणात्मक निर्णयात फारसा बदल झालेला नाही. त्यातच आपल्याकडे प्रभावी गुप्तचर यंत्रणेचा मोठा अभाव आहे. अशा प्रकारचा हल्ला जरी आपण केला, तरी त्यास समोरील राष्ट्र जशास तसे उत्तर देईल. त्यामुळे सध्या तरी आपल्यामध्ये ही क्षमता नाही. आपल्याकडे प्राधान्यक्रम ठरविण्याची गरज आहे. दहशतवादाचे समूळ उच्चाटन करायचे असल्यास पाकिस्तानमध्ये लोकशाही प्रस्थापित होणे आवश्यक आहे. कारण पाकिस्तानात लोकशाही मजबूत नसल्याने दहशतवादाला पाकिस्तानातून खतपाणी मिळत आहे. आपल्या देशात दहशतवादाविरोधात निश्चित धोरण राबविले जात नाही. जगात कोणतीही गोष्ट घडली, तरी ती आपल्या विरोधात घडत आहे, अशी मुस्लिमांची भावना बनत आहे. त्यामुळे या भावनेतूनच दहशतवादी हल्ले करण्याची प्रेरणा त्यांना मिळत आहे. 'अल्-कायदा'ने अमेरिकेवरील हल्ल्याची नियोजनबद्ध पूर्वतयारी आधीपासूनच केली होती. त्यानंतर ओसामा पाकिस्तानात लष्करी केंद्राजवळ तब्बल पाच वर्षांहून अधिक काळ वास्तव्य करतो, ही आश्चर्यकारक घटना आहे.

'ओबामा ते ओसामा : भारतावरील परिणाम' या विषयावर बोलताना ॲड. निकम म्हणाले, की लादेन हा अमेरिकेने रसद पुरवून तयार केलेला भस्मासुर आहे. प्रगत राष्ट्रांनी हिंसेच्या माध्यमातून विकासाचा प्रयत्न केला म्हणूनच जागतिक दहशतवादाची निर्मिती झाली. पाश्चात्य राष्ट्रांनी केलेल्या इस्त्राईलच्या निर्मितीनंतर

कट्टर अरब राष्ट्रे दुखावली गेली. त्यातूनच 'पॅलेस्टाईन मुक्ती संघटने'ची निर्मिती झाली आणि त्यांनी हल्ले करण्यास सुरुवात केली. अमेरिकेने कट्टर पंथीयांच्या गटाद्वारे 'मुजाहिद' ही संघटना अफगाणमध्ये सुरू केली. 'मुजाहिद'मुळे रशियाला माघार घ्यावी लागली. मात्र हीच संघटना डोईजड होईल असे अमेरिकेलाही वाटले नव्हते. अमेरिका पाकिस्तानच्या माध्यमातून मुजाहिदला रसद पुरवित होती. काही गटांनी आपल्या देशात घुसून धार्मिक तेढ निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले. अमेरिकेने स्वत:चे धोरण निश्चित केले असून, तिला पाकिस्तानशी असलेले संबंध अजूनही तोडायचे नाहीत. पाकिस्तानची संपूर्ण अर्थव्यवस्था ही अमेरिकेवर अवलंबून आहे. पाकिस्तानमधील वाढती धार्मिक कट्टरता सर्वांनाच धोकादायक ठरू शकते.

भारतातील दहशतवादी कारवाया पाकिस्तानच्या प्रोत्साहनामुळेच होतात, हे अमेरिकेला माहित असतानाही त्यावर कोणतेही पाऊल उचलले जात नाही. अमेरिका पाकिस्तानला फक्त सुनावते. मात्र कारवाई केली जात नाही. आपल्या देशात सामाजिक विघटन होत असून, धार्मिक गटात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

पित्रे म्हणाले, की अमेरिकेवरील हल्ल्यानंतरही दहशतवादाची दुसरी बाजू मांडणारे हे पुस्तक २००९ मध्ये प्रकाशित करणे कौतुकास्पद आहे. राजकीय, सामाजिक, तात्विक आणि आर्थिक उद्देशासाठी हिंसेचा वापर करणे म्हणजे दहशतवाद आहे. ओसामाने आजवर केलेल्या दहशतवादी कारवायांमध्ये सर्वाधिक मुस्लिम नागरिकच मारले गेले आहेत. ओसामाला राष्ट्र राज्य ही संकल्पना नष्ट करायची होती. ओसामाचा अंत म्हणजे 'अल-कायदा'चा अंत नव्हे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात चांगले संबंध प्रस्थापित होण्याची थोडीही शक्यता नाही, सध्या तरी आपण शत्रू राष्ट्र आहोत. क्रिकेट सामन्यादरम्यान दोन्ही देशांतील नागरिकांमध्ये आपापसात चीडच निर्माण झालेली असते. त्यामुळे दोन्ही देशांतील संबंध सुधारण्यासाठी 'क्रिकेट डिप्लोमसी'चा काहीही उपयोग होणार नसून, भारत आणि पाकिस्तानमध्ये क्रिकेट सामने कशाला हवेत, असा प्रश्न ॲड. निकम यांनी उपस्थित केला.

प्रकाशनापूर्वी या पुस्तकाच्या मूळ लेखिका जीन सॅसन यांनी अमेरिकेतून उपस्थितांशी संवाद साधला. या वेळी ध्वनिक्षेपकाच्या माध्यमातून सॅसन यांनी उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मृण्मयी भजक यांनी केले, तर अनिल मेहता यांनी आभार मानले.

## * सिन्नर वाचनालयाला २५ हजारांची पुस्तके भेट

सिन्नरच्या सार्वजनिक वाचनालयाला दरवर्षी २०-२५ हजार रुपयांची भेट देण्याचा जगन्नाथ गंगावणे यांचा परिपाठ १९९७ पासून सुरू आहे. यंदाही त्यांनी



गुढी पाडव्याला २५ हजार रुपयांची १५८ पुस्तके गुढी पाडव्याला भेट देऊन हा उपक्रम चालू ठेवला. आजवर त्यांनी ३ लाख २० हजार रुपयांची पुस्तके भेट देऊन या वाचनालयाला समृद्ध केले आहे. श्री गंगावणे हे ८५ वर्षांचे असून वाचनीय पुस्तकांची स्वत: निवड करतात. मेहता पब्लिशिंग हाऊसला भेट देऊन दरमहा उत्तमोत्तम पुस्तकांची खरेदी करतात. पुस्तकांच्या निवडीत मेहता मराठी ग्रंथजगतचा चांगला उपयोग होतो असे त्यांनी म्हटले. त्यांच्या परिवारातील डॉ. सुधीर गंगावणे, शालिनी गंगावणे वगैरे सदस्यही यावेळी उपस्थित होते.

❐

सध्या पोस्टातून अंक न मिळाल्याच्या किंवा उशिरा मिळत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. आमचे पोस्टिंग दर महिन्याच्या ११ तारखेला नियमित होत असते. वाचकांनी कृपया गैरसमज करून घेऊ नये. तरीही अंक न मिळाल्यास फोन किंवा पत्र आल्याबरोबर आम्ही लगेच दुसरा अंक पाठवतो. ही वस्तुस्थिती समजून घेऊन वाचकांनी सहकार्य करावे ही विनंती. गैरसमज नसावा.

**संपादक**

## आगामी

# द गॉड ऑफ ॲनिमल्स

**आर्यन कायले**
अनु. **गीतांजली वैशंपायन**

**२८०रु.** पोस्टेज २५रु.




बारा वर्षांच्या लहानशा ॲलिस विन्स्टनची ही गोष्ट आहे.
लग्नासाठी घरातून पळून गेलेली मोठी बहीण,
अंथरुणाला खिळलेली मनोरुग्ण आई
अन् तापट, घुम्या स्वभावाचे वडील – हे तिचं कुटुंब.
जोडीला घोड्यांचा मोडकळीस आलेला तबेला.
गुजराण करण्यासाठी विन्स्टन कुटुंबीय इतरांच्या घोड्यांची
देखभालही करतात. त्या घोड्यांच्या मालकांशी (बहुतेक स्त्रिया!)
आणि त्यांच्या आयुष्याशी विलक्षण भावनिक गुंतागुंत होते.
लहानगी ॲलिस शाळेत असतानाच एका प्रौढ माणसाच्या प्रेमात
पडते. त्यातला आनंद मिळवत असतानाच, कठोर वास्तवाची
तिला जाणीव होते. क्रौर्य, खोटेपणा, फसवणूक याबरोबरच
चांगुलपणा, हळवेपणा प्रत्येकात असतो,
याचीही जाणीव तिला या प्रवासात होते.

**पौगंडावस्थेतल्या स्वप्नाळू मुलीची**
**निसरड्या वाटेवरची अविस्मरणीय कहाणी!**

# पुस्तक परिचय

## दहशतवादी ओसामाचे कौटुंबिक जीवन

# ग्रोईंग अप बिन लादेन




**जीन सॅसन, नज्वा बिन लादेन आणि ओमर बिन लादेन**

**अनु. बाळ भागवत**

ओसामा बिन लादेन याचा १ मे २०११ रोजी पाकिस्तानमधील अबोटाबाद येथे त्याच्या निवासस्थानावर हेलिकॉप्टरने हल्ला करून अमेरिकेने खात्मा केला. ११ सप्टेंबर २००१ रोजी ओसामाने अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला चढवून अमेरिकेच्या सुरक्षाव्यवस्थेला आणि अस्मितेला हादरा दिला. त्या वेळेपासून ओसामाला पकडण्यासाठी आपल्या सर्व यंत्रणा अमेरिकेने कामाला लावल्या होत्या. या मोहिमेला दहा वर्षांनी यश लाभले.

अमेरिकेसारख्या महासत्तेला असा प्रचंड दणका देणारा ओसामा बिन लादेन एका रात्रीत जगभर कुतूहलाचा विषय झाला. त्याच्याबद्दलच्या बातम्या वृत्तपत्रे आणि टेलिव्हिजनवर झळकू लागल्या. त्याच्या विषयी लोकांना वाटणारे कुतूहल लक्षात घेऊन पुस्तके प्रसिद्ध होऊ लागली. ओसामाला प्रत्यक्ष भेटणे किंवा त्याच्या कुटुंबियांशी संपर्क साधणे दुरापास्त असल्याने या पुस्तकांचे स्वरूप संकलात्मक राहिले.

द बिन लादेन्स हे स्टीव्ह कोलचे पुस्तक येमेन आणि सौदी अरेबियातील लादेनच्या काही नातलगांशी संपर्क साधून, त्यांच्या त्रोटक मुलाखती घेऊन लिहिले गेले. परंतु या त्रोटक मुलाखतीतून महत्त्वाच्या मुद्यांना बगल देण्याचाच प्रयत्न जाणवला.

इनसाइड द किंगडम-माय लाइफ इन सौदी अरेबिया हे छोटेखानी पुस्तक ओसामाच्या भावजयीने लिहिले आहे. पण त्यात ओसामापेक्षा त्याच्या सावत्र भावाकडून घटस्फोट मिळवण्याच्या खटाटोपाची हकीकत सांगण्यावर भर आहे.

'ग्रोइंग अप बिन लादेन' या २००९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील तपशील ओसामाची पहिली पत्नी नज्वा बिन लादेन आणि तिचा चौथा मुलगा ओमर बिन लादेन यांनी पुरवले आहेत. जीन सॅसन या पत्रकार महिलेने त्याचे शब्दांकन केले आहे. नज्वा आणि ओमर यांनी एक पत्नी आणि एक मुलगा म्हणून ओसामाच्या कौटुंबिक आठवणी आणि घडामोडी यात सांगितलेल्या आहेत. यात ओसामाच्या राजकीय, इस्लामिक दहशतवादी कारवायांबद्दल किंवा मतांबद्दल फारसे काही सांगण्यात आलेले नाही. कारण ओसामाने त्याबद्दल आपल्या बायकामुलांना विश्वासात घेऊन कधी काही सांगितले नव्हते. त्याच्या दहशतवादी हालचाली, अल कायदाची जडणघडण आणि कार्यपद्धती याबद्दल त्याच्या कुटुंबियांना फारशी कल्पना कधी देण्यात आली नव्हती. जीन सॅसनने नज्वा आणि ओमर यांच्या कौटुंबिक आठवणी जशाच्या तशा नोंदवल्या आहेत, त्यात राजकीय किंवा दहशतवादी घटना घुसडलेल्या नाहीत. एक पती किंवा पिता म्हणून ओसामाचे जे वर्तन होते ते जिव्हाळ्याचे होते. क्रूरकर्मी दहशतवादी व्यक्तीसारखे नव्हते.

मार्च २००८ मध्ये ओमरने जीन सॅसनला एक ई-मेल पाठवून ''मी ओसामा बिन लादेनचा चौथा मुलगा असून, माझ्या बालपणच्या आणि तरुण वयातल्या

ओसामाच्या सानिध्यातील आठवणी आणि अनुभव जगासमोर यावे अशी माझी इच्छा आहे.''ही मेल वाचून जीनने इंटरनेटवरून ओमरची माहिती मिळवली.

ओमर हा ओसामाच्या पहिल्या पत्नीचा, नज्वाचा चौथा मुलगा. जन्म १९८१. आईला सर्वात जास्त जवळचा. वडिलांचा हिंसात्मक मार्ग, जिहादच्या नावावरचे अत्याचार पसंत नसलेला. २००१ मध्ये तो वडिलांच्या परवानगीने अफगाणिस्तानातून बाहेर पडतो. सौदी अरेबियाचा पासपोर्ट मिळवतो. आपल्यापेक्षा दुप्पट वयाच्या बाईशी लग्न करतो. एक मुलगा होतो. इजिप्तमध्ये एका ब्रिटिश तरुणीच्या प्रेमात पडतो. पहिल्या बायकोला तलाक देऊन त्या ब्रिटिश तरुणीशी लग्न करतो. इंग्लंडमध्ये मॅरेज व्हिसा मिळवून राहण्याचे ठरवतो. व्हिसाला वेळ लागल्याने कतारमध्ये राहतो. त्याचबरोबर ओमरचे एक वेगळेपण तिला चकित करते. वडिलांचा इस्लामी दहशतवाद त्याला मान्य नसतो. उलट जागतिक शांतता आणि अहिंसा यांचा तो पुरस्कार करतो.

ओसामा बिन लादेन हा एक पिता म्हणून कसा होता, मुलांशी त्याचे वागणे कसे होते, घरात त्याचा दरारा असा जाणवत असे वगैरे तपशील ओमरकडून मिळू शकतील असे जीनला जाणवते आणि ती ओमरशी फोनवरून संपर्क साधते. फोनवरच्या संभाषणातून ओसामाच्या खाजगी घरगुती जीवनाबद्दल तिला बऱ्याच गोष्टी कळतात; प्रत्यक्ष मुलाकडूनच त्या कळल्याने त्यांची विश्वासार्हता वादातीत आहे असे जीनच्या लक्षात येते. तशातच ओमरची आई ही ओसामाची सख्खी मामेबहीण आणि पहिली बायको आहे, ती सध्या नवऱ्याबरोबर राहत नाही, तिने तलाक घेतलेला नाही; ओसामाच्या ११ मुलांना तिने जन्म दिला, ती रूढिप्रिय आणि धार्मिक होती. तिने ओमरबद्दल एक पत्र लिहून जीनला त्याच्या बालपणाबद्दल कळवले. तेव्हा ओमरबरोबर नज्वानेही आपली कहाणी सांगावी असे जीनला वाटले. नज्वाने या कल्पनेला होकारात्मक प्रतिसाद दिला.

११ सप्टेंबर २००१ रोजी न्यूयॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या दोन गगनचुंबी मनोऱ्यांवर हल्ला करून अमेरिकेच्या सुरक्षिततेला आणि सामर्थ्याला आव्हान देणाऱ्या सर्वात मोठ्या दहशतवादी कृतीचा कर्ताकरविता म्हणून ओसामा बिन लादेन हा क्रूरकर्मा जगाला ज्ञात झाला. एकविसाव्या शतकाचा हा आरंभ संपूर्ण मानवी संस्कृतीला हादरा देणारा आणि भीषण भवितव्याची कृष्णछाया मनामनावर दाट फैलावणारा ठरला. अमेरिका ही जगातली सर्वात प्रबळ महासत्ता, पण त्या महासत्तेचे अस्तित्व किती क्षणभंगुर आहे हे या घटनेने नि:संदिग्धपणे दाखवून दिले. अमेरिकेतील एखाद्या शहरावर अमेरिकन विमानांद्वारेच काही मूठभर दहशतवादी सर्व सुरक्षा व्यवस्थांना भेदून इतका संहार घडवून आणू शकतात हे जगाला प्रथमच कळले आणि इस्लामी दहशतवादाचे संहारक स्वरूप स्पष्ट झाले.

या बिन लादेनला जिवंत किंवा मृत पकडण्यासाठी अमेरिकेने आपले सर्व

सामर्थ्य पणाला लावले. अब्जावधी डॉलर्स खर्च केले. अफगाणिस्तान, इराक यांच्यावर लष्करी कारवाई केली. या ओसामा बिन लादेन मोहिमेला दहा वर्षांनी यश मिळाले आणि पाकिस्तानातील अबोटाबादमधील त्याच्या निवासस्थानावर हल्ला करून त्याला ठार मारले. ११ सप्टेंबरच्या नामुष्कीचा सूड उगवला.

बिल लादेन हा पाकिस्तानात इस़.२००३ पासून राहत होता.

२००१ मध्ये अफगाणिस्तानातील तोराबोरा पर्वताच्या दुर्गम ओसाड रूक्ष उतारावरच्या झोपडीवजा कच्च्या घरामध्ये त्याला बायका-मुलांसह रहावे लागले. घरासमोरच्या बाजूचा उतार सरळ तीन हजार फूट खाली पोचणारा होता. तेथील कड्यामागची खडकाळ सपाटीवरची जुनीपुराणी घरे गुरेढोरे ठेवण्याच्या लायकीची; त्यात राहण्याची पाळी संबंध जगाला हादरवून सोडणाऱ्या ओसामा बिन लादेनवर आली. अफगाणिस्तानचा सत्ताधीश मुल्लाह नौरालहाने ओसामाला अशा बिकट, गैरसोयीच्या डोंगराळ भागात जागा दिली हे बघून त्याच्या बायका-मुलांची फारच निराशा झाली. पर्वतावरचे दगड कापून ते एकमेकावर ओबडधोबडपणाने रचून बांधलेल्या खोल्या, त्यावरची लाकडाची छपरे, त्यावरचे गवत, खिडक्या दारांच्या मोकळ्या चौकट, एकूणच ती जागा गैरसोयीची होती. तशात बाथरूम-संडास नाही, पाणीपुरवठ्यासाठी नळ नाही, स्वयंपाक घर नाही, वीज नाही. हे सर्व बघितल्यावर ओसामा सोडून सारेच हैराण झाले. आपल्यावर भयंकर काळच ओढवला आहे असे त्यांना वाटले.

ओसामा आपला मुलगा ओमरला म्हणाला, ''युद्धात शूर लढवय्यांसाठी या झोपड्यांनी खूप साथ दिली होती.. आपण येथे प्रत्येकी दोन खोल्यांसाठी एकेक बाथरूम बांधू. खिडक्या-दरवाजांवर प्रांण्याची कातडी लावू. पोर्टेबल गॅस कुकर्स आणू. कापसाच्या गाद्या, लष्करी कॉट्स, कार्पेट, प्लॅस्टिकच्या डिशेस, स्वयंपाकासाठी भांडी, पाण्यासाठी बकेटस् सगळे व्यवस्थित करू.नंतरच बायका-मुलांना येथे आणू.'' पण हे सगळे होऊनही येथील वास्तव्य फारच कंटाळवाणे होते...नज्वा आणि ओमर या दोघांच्या निवेदनांवरून जीन सॅससने या पुस्तकाची निर्मिती केली. या दोघांच्या निवेदनांतून ओसामा बिन लादेनच्या कौटुंबिक जीवनाची, त्याच्या कुटुंबीय स्त्री पुरुषांची आणि त्यांच्यातील नातेसंबंधाची कल्पना येते. ओसामाची राजकीय भूमिका, त्याची व्यूहरचना, धार्मिक कडवेपणा, त्याने दहशतवादी कारवायांच्या संदर्भात उभे केलेले नेटवर्क याबद्दल या कौटुंबिक सदस्यांना फारशी कल्पना नसते; त्यांनी त्याबाबत जिज्ञासाही दाखवू नये असे ओसामाचे धोरण होते. एक बाप, पती, कुटुंबप्रमुख म्हणून त्याची ओळख व्हावी असाच जीनचा हेतू असून तो साध्य व्हावा या दृष्टीने एकूण लेखन केले गेले आहे. नज्वा आणि ओमर यांची निवेदने शक्यतो त्यांच्याच शब्दांत दिली आहेत. स्वत: फक्त जरूर तेथे त्या त्या वेळच्या राजकीय

घटनांचे धावते दर्शन घडवून कौटुंबिक स्थित्यंतरे, विवाह, अपत्यजन्म, प्रवास यांच्या संदर्भातील बदलांची नोंद केली आहे.

नज्वा ही ओसामाची मामेबहीण. सीरियाच्या लाटकिया या समुद्राजवळच्या छोट्या शहरात घानेम कुटुंबात तिचा जन्म झाला. घानेम कुटुंब हे मूळचे येमेनचे. पण तिचे पूर्वज सीरियात स्थलांतरित झाले. घानेम कुटुंबीय देखणे, उमदे, व्यापारात अग्रगण्य; नज्वाचे जग शालेय शिक्षणाने विस्तारले. तिचा चौकस स्वभाव, तिचे वाचनाचे वेड, चित्रकलेचा छंद, ॲकार्डियन वाद्यवादन, सौदी अरेबियात राहणारी आलिया आत्या हिचे लग्न सौदी अरेबियातील श्रीमंत काँट्रॅक्टर मोहमद बिन लादेन याच्याशी झालेले. त्याच्यापासून आलियाला झालेला मुलगा म्हणजे ओसामा. पण आलियाचे हे लग्न टिकले नाही. मुहमद अल अटास या सौदी माणसाशी आलियाचा दुसरा विवाह झाला. ओसामा हा आईजवळच राहिला. सावत्र पिता असूनही ओसामावर त्याचे प्रेम होते. आलियाला आणखी तीन मुलगे आणि एक मुलगी अशी चार अपत्ये झाली. जेद्दाहमधल्या मुशर्रफ भागात ओसामा लहानाचा मोठा झाला.

१९७४ मध्ये ओसामाचे त्याच्या नज्वा घानेम या मामेबहिणीशी लग्न झाले. त्यावेळी ओसामा सतरा वर्षांचा तर नज्वा पंधरा वर्षांची होती. हा प्रेमविवाह होता.

नज्वा व ओसामा यांना ११ मुले झाली. अब्दुल्ला, अब्दुल रहमान, साद ओमर, उस्मान, मोहमद, फातिमा, ईमान, बकर, रुखैया, नीर. सात मुलगे, चार मुली. ओसामाच्या दुसऱ्या पत्नीला-खादिजाला- अली, अकबर, आयेशा अशी तीन अपत्ये झाली.

तिसरी पत्नी खैरिया हिला ओसामापासून एकच मुलगा झाला. चौथी पत्नी खदीजा, मिरियम, सुमैया या तीन मुली आणि खालिद हा मुलगा अशी ४ अपत्ये झाली. पाचवी पत्नी येमेनी अमाल अल सादाह हिला सामिया ही एक मुलगी झाली.

ओसामाने जेद्दाह मधील किंग अब्दुल अझीझ युनिव्हर्सिटीतून अर्थशास्त्र अणि मॅनेजमेंटचा अभ्यास केला. १९७९ मध्ये ओसामा आपली पत्नी नज्वा आणि दोन मुलांना घेऊन अमेरिकेला गेला त्यावेळी अब्दुल्लाह आझम हा जिहादसाठी सैनिकांची भरती करण्याच्या उद्देशाने अमेरिकेच्या दौऱ्यावर आला होता. ओसामाची व त्याची भेट झाली. ओसामावर त्याचा खूपच प्रभाव पडला. पुढे तो ओसामाचा खास सल्लागार बनला.

मक्केमधील ग्रँड मॉस्कवर सौदी बंडखोर जुहायमान अल उनेबीने हल्ला केला. भाविकांना ओलीस ठेवले. लष्कराच्या मदतीने बंडखोरांना पकडून मारण्यात आले.

२६ डिसेंबर १९७९ रोजी रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण केले. ओसामा अरब, पण अफगाण गनिमांच्या मदतीसाठी पुढे झाला. सौदी सरकारच्या प्रोत्साहनाने त्याने एक ट्रस्ट स्थापन करून अफगाण गनिमांना लष्करी व आर्थिक मदतीसाठी

कंबर कसली. त्यासाठी प्रथमच त्याने पाकिस्तानला भेट दिली. पदवीसाठी न थांबता शिक्षण सोडले. जिहादसाठी स्वत:ला झोकून दिले. रशियाने १९८० ते ८५ या काळात नऊ वेळा अफगाणिस्तानवर चढाया केल्या. ओसामाने आखाती देशातील लक्षावधी डॉलर्स जमवून अफगाणी गनिमांना-मुजाहिदीनना मदत केली. अब्दुल्लाह आझमने तरुण जिहादी सैनिकांची भरती करण्यासाठी दौरे काढले.

जेद्दाह येथे बारा अपार्टमेंटची इमारत घेऊन तेथे ओसामाने परिवाराला हलवले. मुजाहिदीनना जिहादात मदत करण्यासाठी ओसामाने अफगाणिस्तानच्या सीमावर्ती डोंगराळ भागात लष्करी प्रशिक्षण केंद्रे उभी केली (१९८४). पाक सीमेपासून दहा किलोमीटर अंतरावरील जाजी या खेड्यात अरब सैनिकांसाठी लायन्स डेन नावाचा लष्करी तळ ओसामाने सुरू केला. या तळावर ओसामा आपल्या मुलांना नेत असे. मोठा मुलगा त्यावेळी फक्त ८ वर्षांचा होता. 'इस्लामसाठी सर्वकष लढा' असा नारा देऊन ओसामाने जाजी येथे रशियन सैन्याविरुद्ध लढाई सुरू केली. ओसामाला सौदी लढवय्या हीरो म्हणून ओळखले जाऊ लागले.

१९८७ मध्ये ओसामाच्या बांधकाम उद्योगाला मोठे कंत्राट मिळाले. ओसामा बायकामुलांसह मदिनेत राहू लागला.

१९८८ मध्येच पेशावरमध्ये बॉंबस्फोट घडवून अब्दुल्लाह आझमची हत्या करण्यात आली. त्यानंतर अरब लढवय्यांचा एकमेव नेता म्हणून ओसामाचे स्थान भक्कम झाले.

१९९० मध्ये सद्दाम हुसेनने कुवेतवर हल्ला केला. सद्दामशी लढण्यासाठी सौदी अरेबियाने अमेरिकेला संयुक्त सैन्य उभारण्याची अनुमती दिली. काफरांचे सैन्य पवित्र इस्लामी भूमीवर नको असे म्हणून ओसामाने सौदी अरेबियाच्या राजकुटुंबावर टीका केली. ती टीका थांबवण्याचा इशारा न पाळल्याने ओसामावर सौदी अरेबिया सोडून जाण्यास बंदी घालण्यात आली. पण ओसामाने तेथून पळ काढला. सुदानमधील खार्टुम शहरात बायकामुलांसह वास्तव्य केले. सुदानमध्ये ओसामाने अनेक उद्योगधंदे सुरू केले. त्यात पाकमधून प्रशिक्षित केलेल्या जिहादी सैनिकांना कामगार म्हणून आणले. ओसामाच्या अल कायदाला मदत करण्यासाठी डॉ. अयमान अल जवाहिरी (अल जिहाद ग्रुप) ओमर अब्देल रहमान (अल गामा अल इस्लामिया ग्रुप) सुदानमध्ये आले. सर्व जग इस्लामच्या राजवटीखाली आणणे हे लक्ष्य ठरले. १९९३ साली न्यूयॉर्कच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर बॉंबहल्ला केला. 'अल कायदा'चा सहभाग सिद्ध करणाऱ्या पुराव्या अभावी खटला भरला गेला नाही. २००१ मधील हल्ल्याची ही जणू प्राथमिक चाचणी होती.

१९९४ मध्ये सौदी अरेबिया सरकारने ओसामाचे नागरिकत्व रद्द केले. ओसामाची बँकेतील खाती गोठवली. तर सुदान सरकारने ओसामाला सुदानी नागरिकत्व देऊन

पासपोर्ट दिले. पण दोन वर्षांनी मे १९९६ मध्ये इतर राष्ट्रांच्या दबावामुळे ओसामाला देशाबाहेर काढले. त्यामुळे ओसामाला खार्टुमहून अफगाणिस्तानातील जलालाबाद गाठावे लागले. ओसामाने जिहादचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. सुदानमधून आपल्या बायकामुलांना ओसामाने जलालाबाद येथे आणले. नंतर सर्वांसह तोरा बोरा पर्वतराजीत हलवले. या तोरा बोरा मधील आरंभीच्या गैरसोयींचे वर्णन ओमरने या पुस्तकात विस्ताराने केले आहे.

ओमर वीस वर्षांचा होतो तेव्हा वडिलांना सांगतो, ''अबू, मला आईच्या प्रकृतीची काळजी वाटते. हे वय मुले होण्याचे नाही. तिला तिच्या आईकडे सीरियाला नेण्याची परवानगी मला द्या. ती तेथे आपल्या अकराव्या अपत्याला जन्म देईल तर कदाचित सुरक्षित राहील.'' ओसामा तशी परवानगी देतो; पण बायकोला बजावून सांगतो, ''नज्वा, मी तुला कधीही तलाक देणार नाही हे लक्षात ठेव.''

११ सप्टेंबर २०११ च्या वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या हल्ल्याच्या आधी काही दिवस ओमर आणि नज्वा अफगाणिस्तानातून ओसामाच्या परवानगीने बाहेर पडले ही घटना म्हणजे योगायोग नव्हे, असे वाटते. आपल्या वडिलांना विशीतल्या ओमरने अनेकदा विचारले होते, ''रशियन युद्धात तुम्ही किती जणांना ठार केले?'' तेव्हा ओसामाने उत्तर दिले होते. नक्की आकडा सांगता येणार नाही. अनेकजण माझ्या हातांनी मेले; माझ्या आज्ञेने मेले.'' ओमरने त्यावर म्हटले, ''ही सगळी हिंसा थांबणार तरी कधी? माझा जन्म व्हायच्या आधीपासून तुमची युद्धे चालू आहेत. ती कधी थांबणार? मला युद्धाचा तिरस्कार वाटतो. हे बंद व्हायला हवे मला हा देश सोडून जावेसे वाटते. मला खऱ्या जगात रहायचे आहे.''

''माझी मुले बरोबर असण्याची मला गरज आहे. माझ्याबरोबर राहणे हे तुझे कर्तव्य आहे. या विषयावर यापुढे चर्चा करायची नाही. तू माझा उजवा हात आहेस. मला तुझी गरज आहे.''

''शक्य नाही. मी कमांडर नाही. मला शांतता असणाऱ्या जगात रहायचे आहे. शिक्षण घ्यायचे आहे. मला लढत बसायचे नाही. मला स्वतंत्रपणे जगायचे आहे. मला मरायची इच्छा नाही.''

**''मी मरेपर्यंत लढत राहणार आहे. शेवटच्या श्वासापर्यंत लढत राहणार आहे. हा जिहाद कधी थांबणार नाही.. हा विषय यापुढे बंद.''ओसामा म्हणाला.**

-ओसामा, ओमर, नज्वा यांच्या अंतरंगात या प्रसंगाइतके खोलवर नेणारे हे पुस्तक इस्लामिक आणि दहशतवादी मानसिकता प्रकट करते.

**किंमत : ४००रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.**

## टी बुक क्लब १९ मधील शेवटचे पुस्तक

# द गिफ्ट ऑफ रेन




**तान त्वान एंग**
अनु. **अशोक पाथरकर**

**४४०रु.**
टी बुक क्लब सभासदांना २२०रु.
पोस्टेज ३०रु.

पेनांग १९३९. सोळा वर्षांचा फिलिप हटन हा एकलकोंडा तरुण. अर्धा इंग्रज, अर्धा चिनी; पण स्वत:ला दोन्ही न समजणारा. हयातो एंडो या जपानी अधिकाऱ्याशी झालेल्या अनपेक्षित मैत्रीमध्ये त्याला स्वत्व सापडते. फिलिप त्याच्या नव्या मित्राला त्याचे आवडते पेनांग बेट दाखवतो आणि त्या बदल्यात एंडो त्याला आयकिडोचे शास्त्र व कला शिकवतो.

पण या शिक्षणासाठी भयंकर मोल मोजावे लागते. गूढ व्यक्तिमत्त्वाचा एंडो स्वत:च्या शिस्तीने बांधलेला असतो. जपानने मलायावर केलेल्या चढाईत फिलिपचे कुटुंब आणि सर्वस्व पणाला लागते तेव्हा आपण ज्यांच्यावर संपूर्ण विश्वास ठेवला आणि ज्यांच्याशी पूर्ण एकनिष्ठ राहिलो त्या आपल्या गुरूचे एक भयानक गुपित त्याला कळते. आपल्यामुळे ज्यांचा जीव धोक्यात आला आहे, त्यांना आपण वाचवले पाहिजे, तसेच एंडो कोण व काय आहे याचा छडा लावला पाहिजे असे त्याला वाटते.

पावसाने वरचेवर धुतले जाणारे समुद्रकिनारे, डोंगरावरील गूढ मंदिरे, मसाल्याची  गोदामे, ऐश्वर्यशाली बॉल रूम्स आणि पर्जन्यारण्ये तसेच तान त्वान एंग यांची दगाबाजी, पाशवी क्रौर्य, निधडे शौर्य व चिरंतन प्रेम यांची मनाला चटका लावणारी कहाणी.

# पुस्तक परिचय

संत चोखामेळा यांच्या जीवनावरील कादंबरी

# जोहार मायबाप जोहार




**मंजुश्री गोखले**

अनेक पुरस्कारांनी गौरविल्या गेलेल्या 'तुकयाची आवली' या पुस्तकाच्या सिद्धहस्त लेखिका मंजूश्री गोखले यांची संत चोखोबा याच्या जीवनावरील कादंबरीही वाचकांना आवडेल अशी आहे.

*उस डोंगा परी, रस नोहे डोंगा*
*काय भुललासी, वरलिया रंगा*

असे खुद्द चोखोबारायांनी म्हटले आहे. या पुस्तकाचा वरलिया रंग म्हणजे मुखपृष्ठ हे इतकं देखणं व भूल पाडणारं आहे की, नकळत आपण पुस्तकाचं पहिलं पान उघडतो आणि पुस्तक वाचून कधी हातावेगळं होतं तेच समजत नाही. चंद्रमोहन कुलकर्णी यांनी चितारलेले मुखपृष्ठ मनाचे सगळे कोपरे सरळ करते!

*फुटो हे मस्तक, तुटो हे शरीर*
*नामाचा गजर सोडू नये*

मुखपृष्ठाच्या तळाशी नामसाधनेत दंग असलेल्या मांडी घालून बसलेल्या चोखोबांच्या हातातील एकतारी आणि चिपळ्या लक्ष वेधून घेतात.

*नेणपणे मिठी घालीन पदरा,*
*बैसेन द्वारांत तयांचिया*

"मी हीन जातीत जन्माला आलो, यात माझा काय दोष? माझा काय गुन्हा?" असं त्या सवसत्ताधीश विठ्ठलाला चोखोबा विचारत आहेत असे वाटते. गडद रंगाच्या मुखपृष्ठावर एका बाजूला असलेले चोखोबाचे इवलेसे पांढरे चित्र सारे मुखपृष्ठ व्यापून टाकते. त्यांच्या पाठीशी असलेली भागवत धर्माची ध्वजा भक्तीची ज्योत बनते. आणि ती बघता बघता शेकडो दिवे लावून सारा भक्तिमार्ग उजळून टाकते. चोखोबा भक्तीची मोहोर मनावर उमटते. एका मनोवेधक कादंबरीला इतकं आशयपूर्ण मुखपृष्ठ लाभणं हा एक दुग्धशर्करा योगच.

आईने चोखा, चोखामेळा हे नाव का ठेवले हे लेखिका स्पष्ट करते. तिच्या कल्पनाशक्तीला दाद द्यावी, तेवढी थोडीच आहे असे वाटते. पंढरीची नित्य नेमाने वारी करणारे घराणे. विठ्ठल भक्तीचे लेणे घेऊन जन्माला आलेल्या चोखोबाच्या घराण्यात भक्तीला उमाळे फुटले नसते, तरच नवल.

मेहुणपुऱ्याहून चोखाचे कुटुंब मंगळवेढ्याला रहायला स्थलांतरित झाले.

मंगळवेढ्याहून पंढरपूर जवळ म्हणून चोखोबाला आनंद झाला. तेथील विठ्ठलमंदिराबाहेरचे सारे आवार रोज चोखामेळा झाडून लखलखीत ठेवायचा. एकदा मंदिराच्या कुलुपबंद दानपेटीतील चांदीची मोहोर गहाळ झाली. चोरीचा आळ पुजारी म्हादा गुरववर आला. चोखोबा म्हणाला, तू विठ्ठलाला साकडं घाल. अखंड असलेल्या पेटीच्या खाचीत अडकून बसलेली मोहोर सापडली. चोखोबाची विठ्ठल भक्ती आणखीच झळाळून निघते. तरुण चोखोबा पंढरीच्या वारीला जातो. वाटेत

वारकरी भेटतात. त्यांच्याशी गळाभेट करतात.आपण महार आहोत, आपला विटाळ होईल, या विचारानं तो कासावीस होतो. या वारीतच नामदेवांची भेट होते. या भेटीद्वारे लेखिकेने भागवत धर्माची माहिती रंजकपणे सांगितली आहे.

वारी संपवून मंगळवेढ्याला परत आलेला चोखोबा अंतर्बाह्य बदलला.

आपला लेक आता मोठा झाला, त्याचं लग्न केलं पाहिजे, म्हणून चोखोबाची आई (सावित्री) भावकीतील यमाजीची मुलगी सोयरा हिला सून म्हणून आणायचं ठरवते. एकमेकांना प्रथम पाहणं, साखरपुडा यांचं वर्णन वाचताना आपण हरवून जातो. विठ्ठलभक्त चोखा आपल्या भावी पत्नीमध्ये इतका कसा गढून गेला, असा विचार मनांत येतो, तोवर साखरपुड्याहून परत येताना भेटलेला साधू, त्यानं चोखोबाला सांगितलेली भविष्यवाणी चोखोबाला पुन्हा विठ्ठलभक्तीपाशी नेते. लग्नाच्या वर्णनांत येणारे डोरलं, टिक, कंबरपट्टा वगैरे दागिन्याचे उल्लेख आपल्याला त्या काळात घेऊन जातात. लग्नविधीचे नेटके वर्णन केले आहे. या लग्नासाठी हजर असलेल्या नामदेवाच्या तोंडी लेखिकेने चोखोबासाठी घातलेले उपदेशाचे शब्द आजही चपखल वाटतील असेच आहेत.

चोखोबाचा संसार सुरू झाला. चोखोबाची पत्नी सोयरा, त्याच्यासारखीच विठ्ठलभक्त, कामसू वृत्ती, अभ्यासूपणा, जनाबाईच्या अभंगाचं चिंतन हे नणंद-भावजयीच्या प्रसन्न संवादातून छान मांडले आहे. संसाराबराबरच वारंवार पंढरीला जाणं आणि तत्कालीन भागवतपंथातील संताच्या मांदियाळीबरोबर चोखोबाचा संतसमागम वाढत गेला. त्याची ज्ञानेश्वरादि भावंडांची भेट झाली. चोखोबाच्या मनात भावनांचा कल्लोळ उठला. मंगळवेढ्याला परतलेला चोखा विचारांच्या आवर्तात सापडला आणि एका सकाळी थेट विठ्ठल मंदिरात तो शिरला. देव बाटला म्हणून एकच गलका उसळला. त्याला लोकांनी खूप मारहाण केली. मरणोन्मुख चोखोबाला त्याच्या घराच्या दारात टाकले गेले. चोखोबाच्या जखमांना औषधपाणी करून आईने थेट चावडी गाठली आणि 'माझ्या पोराला लाथा मारणारे लोक पण विटाळले न्हाईत का? असा प्रश्न पंचांना विचारला. हळूहळू जखमा बऱ्या झाल्या, पण मनावर ओरखडे उठले. विटाळ, अपमान, तिरस्कार यांनी भरलेल्या आपल्या नेहमीच्या जगापेक्षा, पंढरीचे, त्या सर्व संतांच्या सहवासाताले जग निराळे आहे. या विचाराने आई-वडिल, पत्नीसह चोखोबा पंढरपुरी दाखल झाला. नामदेवाच्या मदतीनं महारवाड्यात संसार थाटला, पण काही दिवसांतच आई-बाप निवर्तले. घरात बायकोचे बाळंतपण. ती एकटी म्हणून चोखोबा आपली बहिण निर्मळा हिला घेऊन दुसऱ्या दिवशी सकाळी येतो. पण चोखोबाची बायको आदल्या रात्रीच प्रसूत होते. रात्रीच निर्मळा आली आणि तिनं आपलं सरं काही केलं हा भास की प्रत्यक्ष विठ्ठल निर्मळेच्या रूपात आला हे द्वंद्व फार समर्थपणे मांडले आहे.

बाळाचे बारसे, त्यासाठी त्याच्या घरी जेवणासाठी ज्ञानेश्वर आणि भावंडे, नामदेव, सावता, गोरोबा, सेना यांचे आगमन, विठ्ठलमंदिरातील पंचामृत तीर्थाची चव कडू होणे, देवळाचे पुजारी केशवभट यांचे चोखोबाच्या दारी अकांडतांडव, तीर्थाचा कलश चोखोबाकडे आणल्यानंतर ज्ञानेश्वरांनी चोखोबाला कलशात बोट बुडवायला लावणे आणि कलशासकट देवळातील तीर्थ पूर्ववत गोड होणे या प्रसंगाची गुंफण बेमालूम साधली आहे. येथून कादंबरी एक विशिष्ट उंची गाठते. ही उंची अखेरपर्यंत एक तसूभरही कमी होत नाही.

देवाचा रत्नहार चोरल्याबद्दल चोखोबाला बैलांच्या पायाशी जुंपून फरफटत नेण्याची शिक्षा झाली. चाबकाने पाठ फुटली तरी बैली जागचे हालेनात. मग चोखोबाच्या पाठीवर फटके मारण्यास सुरुवात झाली. नामदेवाच्या विनंतीवरून मारहाण थांबली. पण त्याने पंढरपूर सोडून कायमचे निघून जावे अशी शिक्षा सुनावली. या सर्व प्रसंगापासून ते चोखोबाच्या मृत्यूपर्यंत लेखिकेने चोखोबाच्या अभंगांचा वापर केला आहे. अभंगांचा अर्थ आणि प्रसंग याची अप्रतिम सांधणी झाली आहे. आपण पंढरी सोडावी ही विठ्ठलाची आणि आपले गुरू नामदेव यांची इच्छा असणार असे मानून पंढरीत शेवटचे कीर्तन करून अखेरचा जोहार घालून चोखोबा साकवातून चंद्रभागेच्या पैलतीरावर आपल्या खोपटात शिरला. पंढरी कायमची सोडून आलेल्या चोखोबाचे मन घायाळ झालेले असते. विठोबाचा विरह, दुर्मिळ संतभेटी अशा स्थितीत त्याने जगायचे कशासाठी या प्रश्नाचे उत्तर मिळवले. ''महाद्वाराच्या समोर चंद्रभागेच्या तीरावर दोन दीपमाळा बांधायच्या. या दिव्यांचा प्रकाश थेट पांडुरंगावर पडेल.'' दीपमाळेबरोबर अभंगांची संख्याही वाढत गेली. अधूनमधून चंद्रभागेच्या या तीरावर संतसहवास आणि कीर्तनेही होत होती. गोरोबा काका, नरहरी सोनार, चोखोबाचा मेहुणा आणि जिवलग मित्र बंका त्याला सोडून गेले. गुरू नामदेवांनीही प्रदीर्घ तीर्थाटनाला जाण्यासाठी चोखोबाचा निरोप घेतला. येथील वास्तव्यात प्रत्यक्ष विठ्ठल चोखोबाच्या भेटीला येणे, दोघांनी एकत्र जेवणे, विठ्ठलाच्या पीतांबरावर दही सांडणे, आणि त्याची प्रचिती पंढरीच्या मंदिरात येणे हे सारे प्रसंगही चोखोबाच्या विठ्ठल प्रीतीचे वेगळेपण दाखवतात.

दीपमाळ पूर्ण झाली. पणत्या तयार झाल्या. सोयरा, मुलगा, कर्ममेळा यांनी तेल जमवून कार्तिकी पौर्णिमेला सगळ्या पणत्या पेटवल्या. पणत्या पेटविण्यासाठी सुंद्रीचा वापर केला. इथं सुंद्री शब्द काळाचे भान आणतो! उजळलेली दीपमाळ पहायला सोयरा नव्हती. बऱ्याच दिवसांनी नामदेव भेटले. गप्पांच्या ओघात अभंगांची बरसात झाली. चोखोबाचे जवळजवळ सर्व अभंग लिहून घेऊन ती चोपडी नामदेवाकडे सुपूर्त करणाऱ्या अनंतभटाचीही व्यक्तिरेखा ठसठशीत आहे.

वेशीवरचे बुरूज आणि तटबंदी बांधण्यासाठी चोखोबासह सर्व येसकरांनी

मंगळवेढ्याला यावे असे सरकारी फर्मान निघाले. नामदेवांची अखेरची भेट घेऊन चोखोबा कामावर हजर झाला. पण जाण्यापूर्वी माझ्या मातीत पडलेल्या देहाला तुम्हीच पंढरपूरला घेऊन यावे, असे वचन नामदेवाकडून घेतले.

''बांधकाम सुरू असताना तटबंदीचा बुरूज कोसळून त्याखाली चोखोबा गाडला गेला.'' बहुसंख्य लोकांना एवढीच, माफक माहिती. पण चोखोबाचे अभंग, मजूर, गोविंदासारखं पात्र घालून हे सारे वर्णन भावस्पर्शी केले गेले आहे. ते वाचताना डोळ्याच्या कडा ओलावतात. दूर परमुलखात असलेल्या नामदेवाला अभंग लिहिताना एकदम चोखोबाची आठवण येते, हा प्रसंगही दाद देण्यासारखा आहे.

नामदेव पंढरीला आले. थकल्या शरीराने आणि हळव्या मनाने मंदिरात गेले. प्रत्यक्ष विठ्ठलाच्या तोंडून चोखोबाच्या मृत्यूची बातमी त्यांना मिळाली. नामदेव विठ्ठल यांचा हा संवाद म्हणजे लेखिकेने चोखोबाला वाहिलेली श्रद्धांजलीच आहे. अस्थी कशा ओळखायच्या आणि चोखोबाच्या अस्थीतून विठ्ठल आवाज का येतो याचा खुलासा खुद्द विठ्ठलाच्या तोंडी घातला गेला आहे. 'मरता घेती खांद्यावरती' या न्यायानं चोखोबाच्या अस्थी पालखीतून नेल्या. अस्थीची महायात्रा काढली. पण जिवंतपणी चोखोबाला अवहेलनाच मिळाली. शेवटच्या प्रकरणातील हे सर्व वर्णन, चोखोबाची समाधी महाद्वारी का या प्रश्नावर लेखिकेनं कल्पकतेचा साज चढवला आहे. माणूस म्हणजे नियतीच्या हातातलं बाहुले. माणसाने ठरवलेले बेत सुफल करायचे की विफल हे नियती ठरवते. येथे विठ्ठलाला लेखिकेने नियतीची भूमिका दिली आहे. चोखोबाच्या आयुष्यात घडलेल्या प्रत्येक बऱ्यावाईट घटनेनंतर विठ्ठलाचे मनोगत म्हणजे नियतीने त्या घटनेची केलेली कारणमीमांसा येते. कधी कधी नियतीही चुकते हे अधूनमधून रुक्मिणीच्या संवादातून दाखवले आहे. विशेषत: बैलाच्या तावडीतून तुम्हीच सोडवलेत आणि आता आसुडाच्या फटक्यांची मरेतोवर चोखाला शिक्षा दिली हे सर्वस्वी चूक आहे असे रुक्मिणी विठ्ठलाला स्पष्ट सांगते.

कादंबरीच्या भाषेत एक गोडवा आहे. वाक्ये लहान आणि सुटसुटीत आहेत. कादंबरीला 'संत चोखामेळा' या नावाऐवजी 'जोहार मायबाप जोहार' या नावामुळे जोहार घालणारा चोखा मला समजून घ्या अशी साद घालतो असा भास होतो. या कादंबरीने चोखोबासारख्या उपेक्षित संताला लेखिकेने न्याय दिला आहे. ही कादंबरी म्हणजे चोखोबांना वाहिलेली श्रद्धांजली आहे.

अभ्यासपूर्ण प्रस्तावना हे या कादंबरीला मिळालेले पारितोषिक आहे. सर्वांनी ही कादंबरी आवर्जून वाचावी.

**-प्राचार्य सौ. कमल हर्डीकर, कोल्हापूर**

**किंमत : ३०० रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३० रु.**

**आगामी**




# एका परिसाची कथा

**मिलिंद जोशी**

**२००रु. पोस्टेज २५रु.**

संध्याकाळ होताच सतीश बागेत आला.
रचना आधीपासूनच तिथे हजर होती.
तिच्या टपोऱ्या डोळ्यांमधून प्रेम ओसंडून वाहत होतं.
सतीशच्या डोक्यात थैमान घालणारं
विचारांचं वादळ दूर पळालं.
रचना दृष्टीस पडताच तिच्याबद्दलच्या जिव्हाळ्यानं
त्याचं मन उचंबळून आलं.
त्याला जाणवली, तिच्यातल्या ममत्वानं आणि कणखर
स्त्रीत्वानं त्याला मिळवून दिलेली आध्यात्मिक शांतता.
त्याला जाणवले,
तिच्या मनस्रोताचे निर्मळ आणि पवित्र झरे.

# पुस्तक परिचय

**अर्थार्जनाच्या नवनव्या मार्गांचा अवलंब करताना होत जाणारी नीतिमूल्यांची घसरण**

# अंकरहित शून्याची बेरीज




**दिनकर जोषी** **अनु. अंजनी नरवणे**

टीव्हीच्या कलर्स चॅनलवर सध्या मुक्तिबंधन ही मालिका प्रेक्षकांची दाद मिळवत आहे. एका गुजराती धनाढ्य उद्योगपतीच्या पारिवारिक आणि व्यावसायिक मूल्यांवर आणि संघर्षावर प्रकाश टाकणारी ही मालिका गुजराती लेखक हरिकिसन मेहता यांच्या कादंबरीवर आधारलेली आहे. औद्योगिक क्षेत्रात स्वकर्तृत्वाने संपन्न झालेल्या ईश्वर विरानी यांना आपल्या स्वकष्टार्जित वैभवाचा अभिमान आहे आणि नको तितका अहंकारही आहे. त्यांच्या घरात देव्हारा नाही, कारण आपल्या घरातला ईश्वर आपणच आहो असा त्यांचा समज आहे आणि या घरात आपलाच शब्द अंतिम असणार असा त्यांचा आग्रह आहे. खेड्यातून अल्पस्वल्प शिक्षण घेऊन मुंबईच्या महानगरीत आल्यावर भवानीभाईंच्या आश्रयाला राहून व्यवसायाचे प्राथमिक धडे गिरवून, भवानीभाईंनी एकदा केलेल्या अपमानामुळे त्यांचे घर सोडून स्वत:चा व्यवसाय उभा करणाऱ्या ईश्वर विरानी यांना त्या अपमानाचा विसर कधी पडत नाही. भवानीभाईला एक दिवस नेस्तनाबूत करून आपल्या अपमानाचा सूड उगवायचा त्यांचा निश्चय त्यांना सतत धगधगत ठेवत असतो. एका गुजराती औद्योगिक संपन्न कुटुंबाचे हे दूरचित्रवाणीवरचे दर्शन व्यावसायिक संस्कृतीचे आणि स्पर्धेचे काहीसे उग्र आणि टोकाचे चित्र उभे करते; ते टोकाचे  असल्यामुळे नाट्यमय वाटते आणि प्रेक्षकांना आकृष्ट करते.

'अंकरहित शून्याची बेरीज' या दिनकर जोषी यांच्या कादंबरीतही अशाच एका गुजराती व्यापारी कुटुंबाच्या तीन पिढ्यांचा पट उलगडून दाखवण्यात आला आहे. 'एकडा वगरना मिंडा' हे त्यांच्या मूळ गुजराती कादंबरीचे नाव.

केवळ शून्ये एकापुढे एक लिहून भागत नाही. त्या शून्यांमागे एखादा अंक लिहिला तर त्या शून्यांना अर्थ प्राप्त होतो. केवळ पैसा मिळवणे हेच आयुष्यातले एकमेव ध्येय मानणाऱ्या एका गुजराती कुटुंबाच्या तीन पिढ्यांमध्ये प्रत्येक नवी पिढी पैसा मिळवण्याच्या हव्यासापोटी कुठल्या थराला जाऊ शकते आणि नैतिक अध:पतन, नीतिमूल्यांचे उच्चाटन झाले तर जीवन निरर्थक, अर्थशून्य होते; कितीही संपत्ती मिळाली तरी तिला काही अर्थ उरत नाही. नीतिमूल्ये हीच आयुष्याला सुखसमृद्धी देतात. केवळ संपत्तीने सुखशांती लाभतेच असे नाही असा संदेश देण्यासाठी ही कादंबरी लिहिली आहे, असे लेखक दिनकर जोषी यांनी हे आरंभीच नि:संदिग्धपणे स्पष्ट करतात. ''या पुस्तकात जी कथा सांगितली आहे ती केवळ वाचण्यासाठी नाही; ती वाचून विचार करण्यासाठी आहे.'' संपत्ती, सत्ता, दीर्घायुष्य, प्रतिष्ठा या सर्व गोष्टी सुखसमृद्धी देऊ शकतात, पण त्यांच्या आधी संतोष, प्रामाणिकपणा, धर्म, नीती, करुणा, कृतज्ञता यांपैकी कुठला तरी एक आकडा आरंभी असायला हवा. हा आकडा आरंभी नसेल तर नुसती शून्ये वाढवत राहण्याची कृती अर्थशून्य ठरते. संख्येच्या आरंभी जर आकडा असेल तर पुढचे प्रत्येक शून्य संख्येची किंमत दहापट वाढवते. आकडा नसेल तर कितीही शून्ये वाढवली तरी ती शून्यच राहतात.

आयुष्यात केवळ पैसा असून त्याचे सार्थक होत नाही, त्याला मानवी मूल्यांचे अधिष्ठान हवे. उद्योजकांनी अमाप संपत्ती मिळवली, समृद्धी मिळवली तरी सामाजिक हिताचे भान ठेवून त्या संपत्तीचे अधिक नेमकेपणाने नियोजन करून समाजासाठी तिचा विनियोग करणे हीच आजची गरज आहे अशी भूमिका दिनकर जोषी यांना मांडायची आहे. त्या दृष्टीने त्यांनी सौराष्ट्रातून मुंबईत येऊन अपार कष्ट करून एका पेढीवर काम करीत स्वत:चा व्यवसाय सुरू करून उर्जितावस्थेला आलेल्या व्रजमोहनची आणि त्याच्या पुढच्या दोन पिढ्यांची कहाणी या कादंबरीत त्यांनी वास्तवाचे भान ठेवून पण आदर्श नीतिमूल्यांचा आग्रह मनोमन जपत राहून सांगितली आहे.

१९२० च्या सुमाराला व्रजमोहनदास सौराष्ट्रातील छोट्या गावातून सोळासतराव्या वर्षी मुंबईला येतो. कांदिवलीला एका नातलगाकडे मुक्काम करतो. काळबादेवी रोडवरील रेशीम बाजारातील एका पेढीवर नोकरीला लागतो. महिन्याला २५ रुपये पगार. त्यातले दहाबारा रुपये गावी पाठवतो. दोन वर्षांनी सुटी घेऊन गावी जातो आणि घरचे लोक त्याचे लग्न लावून देतात. मुंबईला परत एकटाच येतो. नातलगाकडे जागा लहान. संसार थाटणे अशक्य. त्याचे शेठ सहा महिन्यांनंतर त्याला म्हणतात. ''अरे व्रजमोहन, आता तुझे लग्न झालेय. बायकोला तिकडे एकटीला ठेवून असे किती दिवस काढशील? कुठेतरी जागेची व्यवस्था कर.''

''जागा घ्यायची तर पागडी कुठून देऊ? पाचशे रुपये तरी मागतात पागडीचे...''

''पाचशे रुपयांसाठी तू बायकोला गावी ठेवून असा एकटा कुठवर राहशील वेड्या? जा घर शोध. पाचशे रुपयांची व्यवस्था होऊन जाईल.''

चंपागल्लीतल्या कबुतरवाला चाळीत व्रजमोहनला जागा मिळून जाते. व्रजमोहन पत्नी जयाबा हिला मुंबईला आणतो. चाळीतल्या खोलीत त्याचा संसार उभा राहतो.

शेठजी त्याच्या पगारातून काहीही रक्कम कापून घेत नाहीत उलट व्रजमोहनला सांगतात, ''जेव्हा तुझ्याजवळ पाचशे नाही, पाच हजार रुपये साठतील तेव्हा ते एखाद्या चांगल्या कामासाठी वापर. कोणाला तरी वर येण्यासाठी हात दे. आज तुम्हा नवराबायकोला एकत्र आणण्यासाठी चांगलं काम मला करू दे. विसरून जा ते पाचशे रुपये.''

... पुढे हे थोरले शेठ मृत्यू पावतात. मुलांमध्ये भांडणे होतात. कोर्टकचेऱ्या सुरू होतात.

व्रजमोहन मूळजी जेठा मार्केटमध्ये स्वतंत्रपणे कापडाचा धंदा सुरू करतात. प्रगती करतात. घड्याळ गल्लीत दुकान विकत घेतात. ए. व्रजमोहनदास अँड कंपनी असे नाव दुकानाला देतात. ए म्हणजे त्यांचा मुलगा अविनाश.तसेच नाझ कंपाऊंडमध्ये अविनाश डिस्ट्रिब्युटर्सच्या नावाने चित्रपट वितरण सुरू करतात... भाग्य साथ देते.

कांदिवलीला बंगला घेतात. पॅरेडाइज कमर्शियल कॉम्प्लेक्समध्ये मोठे ऑफिस घेतात.

पुढे अविनाश सुचवतो, कांदिवली लांब पडते. जाण्यायेण्यात फार वेळ जातो. पेडर रोडला तो फ्लॅट घेतो. बायको रूपाच्या नावावर घेतलेला तो फ्लॅट छान असतो. परंतु व्रजमोहनदासजी कांदिवलीच्या बंगल्यातच राहतात. कबुतरवाला चाळीतील खोली विकून आलेले तीन लाख रुपये हे आपल्या थोरल्या शेठच्या एकाकी राहणाऱ्या पत्नीला नेऊन देतात. ''या पैशावर तुमचाच हक्क आहे. माझा नाही.'' असे ते मानतात. '' हा परमेश्वराचा प्रसाद होता. तो ज्याला त्याला पोचवला. त्यांच्या आशीर्वादानं आपण सुखी आहोत.'' ही त्यांची भावना.

अविनाश आपल्या वडिलांच्या या कृतीने नाराज होतो. ''एवढी मोठी रक्कम मला न सांगता तुम्ही देऊन टाकलीत? थोरल्या शेठनी पाचशे रुपये खोलीसाठी दिले. तुम्ही दहावीस हजार द्यायचे. तीन लाख कशाला?''

''थोरल्या शेठनी मला केवळ ५०० रुपये दिले नाहीत. माझे घर उभे करून दिले. त्यात तुझा, तुझ्या बहिणीचा जन्म झाला.त्यांनी ते घर उभं करून दिलं नसतं तर मी किंवा तुम्ही कुठं असता? मन मोठं ठेवावं बेटा.''

अविनाशच आता सर्व धंदे बघत होता. चार दशकांच्या परिश्रमाने आणि नशिबाने समृद्धी लाभली होती. जे काही होते ते अखेर अविनाशचेच तर होते. मात्र अविनाश डिस्ट्रिब्युटर्सचा कारभार व्रजमोहनदासांनी स्वत:कडे ठेवला होता. त्यात अविनाशला त्यांनी प्रवेश दिला नव्हता. अविनाशच्या मानसिकतेने त्यांना दु:ख झाले. मागे जावयाला मदत करतानाही अविनाशने खळखळ केली होती, त्याचेही त्यांना आश्चर्य वाटले होते. तेव्हा त्यांनी जावयाला एक लाख रुपये देऊन एका ओळखीच्या माणसाच्या धंद्यात भागीमध्ये काम मिळवून दिले होते. ''हे लाख रुपये ही वीणाला दिलेली भेट समज. आज आपल्याजवळ जे काही आहे त्यात वीणाच्या भाग्याचाही काही अंश असेलच. ज्या घरात वीणा वीसबावीस वर्षे राहिली त्या घरावर तिचा एवढा तरी हक्क असला पाहिजे ना बेटा.'' असे अविनाशला त्यांनी समजावले खरे, पण ''याला वाढवताना आपलं काहीतरी चुकलं असणार.'' अशी बोच त्यांना वाटत राहिली.

अविनाशला वाटे, आपले वडील, बापूजी भोळे आहेत. त्यांच्या भोळेपणाचा फायदा घेऊन आपली बहीण वीणा त्यांच्याकडून इस्टेटीचा अर्धा वाटा लिहून घेईल तर आपल्या दोन मुलांच्या (पूर्वी आणि प्रतीप) भविष्याचं काय? बापूजी तर पिकलं पान. बाची तरी आता किती वर्षे? बा ही तर देवमाणूस. कन्या पूर्वी तेरा वर्षांची. तीनचार वर्षात लग्नाला येईल. प्रतीप मोठा होईल तेव्हा आजची ही समृद्धी मध्यमवर्गीय वाटू लागेल. आपण नसलो तर या मुलांचं भवितव्य काय?

व्रजमोहनदास सत्तरी पार केल्यावर चित्रपट वितरणाचा आपला व्यवसाय बंद करायचे ठरवून, तो विकून टाकतात. ती पेढी बंद करतात. त्याची आलेली रक्कम चित्रपट नायिका कंचनी हिला देतात. ''ही कंपनी जिच्यासाठी चालू केली आणि जिच्या नशिबाचं फळ होती, तिला हे विक्रीच्या दस्तऐवजाचे कागद देऊन मला ऋणमुक्त व्हायचे आहे. ही कंपनी हा तुझ्या नशिबाचा भाग होता. जे तुझं आहे तेच तुझ्याकडे सोपवतो आहे.'' असे  स्पष्टीकरण ते देतात.

व्रजमोहनदास यांच्या हातावर मस्तक ठेवून कंचनी म्हणते, ''तुम्ही देवमाणूस आहात. तुमच्यामुळे माझी सगळी दुर्भाग्यं परमसौभाग्य होऊन गेली. माफ करा शेठजी. मी तुमचं पवित्र आयुष्य अपवित्र गोष्टींनी विटाळलं.''

''जे झालं त्यात काही ईश्वरी संकेत असणारच. मनावर कुठलंही दडपण ठेवू नको. भेटणं किंवा दूर जाणं काही आपल्या हातात नसतं. आपण प्यादी असतो. खेळ पुरा होतो तेव्हा ती प्यादी परत टोपलीत ठेवली जातात.

नाझ कंपाऊंडमधली जागा विकून टाकल्याबद्दल अविनाशला ते सांगतात तेव्हा तो चिडतो. व्रजमोहनजी त्याला सांगतात, ''चिडू नको बेटा. ते सगळं ज्याच्या नशिबाचं होतं त्याला परत देऊन टाकलं.. हे बघ भाई, तीस वर्षे मी चित्रपट वितरणाचा धंदा केला. चाळीस वर्षे मूळजी जेठा मार्केटमधले दुकान सांभाळले. पन्नास वर्षे नोकरी व व्यवसाय केले. साठ वर्षे पैसे मिळवण्यासाठी कष्ट केले. आता हे सगळं ज्याचं आहे, त्याला सोपवून देण्यातच कल्याण आहे. आता ऑफिसमध्येही मी रोज येणार नाही. धंद्यातले सगळे बारकावे तुला ठाऊक अहेत. प्रतीपही आता मोठा झालाय. वर्षा दोन वर्षात तुझ्या साथीला उभा राहील. परमेश्वरानं खूप दिलं आहे. मन कधी लहान ठेवू नको बेटा.''

अविनाशच्या कडवटपणाला हे सगळे पटत नाही. त्याला वाटते, नाझ मधील लाखो रुपये बापूजींनी वीणाला दिले असणार. आणि कांदिवलीचा बंगलाही तीच बळकावणार.

व्रजमोहन त्याला म्हणतात, ''अरे मूर्ख मुला, तुझ्या डोक्यात इतके घाणेरडे, वाईट विचार कुठून आले? तुला जे वाटतं ते धादान्त खोटं आहे. खरं काय आहे ते तुला जाणून घेण्याची गरज नाही. सत्याचा स्पर्श नेहमी मृदूच असतो असे नाही.''

अविनाशची अस्वस्थता वाढतच जाते.

तो आपल्या गुंतवणुकी आपल्या मुलांच्या नावावर करू लागतो.

मुलगा प्रतीप लॉच्या पहिल्या वर्षाला असतो. तो डॅडीची अस्वस्थता जाणून म्हणतो, ''डॅडी, दादांची जी मिळकत आहे तिचे तुम्ही आणि वीणा आत्या कायद्यानं

वारस आहात. हिंदू कायद्याप्रमाणे... दादांनी आपल्या लाइफटाइममध्ये वीणा आत्याच्या नावाने प्रॉपर्टी करून टाकली तर तुम्ही काय करू शकणार? तुम्ही टाइमली ॲक्शन घेतली नाहीत तर लूझर ठराल.''

पुढे जाऊन प्रतीप आपल्या बापाला सांगतो, ''डॅडी, डोन्ट टेक इट इल. बिझनेस अँड सेंटिमेंटस ह्या दोन गोष्टी एकत्र असू शकत नाहीत.. तुम्ही दादांना एक लीगल नोटीस द्या. दादांची मिळकत कोणी विकत घेतली वा ट्रॅन्सफर केली तर ती व्यक्ती तसं ॲट देअर ओन रिस्क अँड रिस्पॉन्सिबिलिटी करील.. असं केलं तर त्यांची सगळी ट्रॅन्झॅक्शन्स बंद होतील... वीणा आत्याच काय दुसरं कोणीही मग त्यात पडणार नाही. सगळं एवढं गुंतागुंतीचं होईल की कोणाला काही करताच येणार नाही. अँड दॅट इज एक्झॅटली व्हॉट वुई वॉन्ट.''

अविनाश गोंधळतो. ''डोन्ट बी सिली. दादांशी असं वागणं बरोबर नाही.''

''तुम्हाला असं करणं जमणार नसेल तर फरगेट इट!'' प्रतीप निर्वाणीच्या सुरात म्हणतो.

अविनाशला त्याची पत्नी रूपा म्हणते, ''प्रतीपला खूप भराभर समजायला लागलंय. त्याला धंद्यात गुंतवायला हवं.''

प्रतीप ऑफिसमध्ये दररोज येऊ लागतो. आजोबांच्या केबिनमध्ये स्वत:ची केबिन थाटू पाहतो. त्याच्या खोलीतल्या भिंतीवर पॉप म्युझिक गायकांची मोठी पोस्टर्स असतात. स्टेजवर तोकड्या पोशाखात नाचणाऱ्या तरुणतरुणींची उत्तान चित्रे असतात. पन्नाशीतल्या अविनाशला प्रतीपचे मित्र, त्यांच्या पार्ट्या, त्यांचे वागणे खटकत राहते. प्रतीप परीक्षेत नापास होतो. अविनाशला तो सांगतो, ''वकील होण्यात मला रुची नाही. मी व्यवसायच करणार आहे. वकिली काय किंवा व्यवसाय काय, दोन्हीचं टार्गेट एकच तर आहे. मनी अँड ओन्ली मनी.''

पुढं तो आणखी विस्तार करतो, ''दादा आणि तुम्ही चाळीस वर्षे धंदा करून जेवढी कमाई केली तेवढी कमाई मी पाच वर्षात करू शकेन. आम्ही मित्रांनी रॅप सिंगिंगचा ऑर्केस्ट्रॉ आणि ट्रूप तयार केला आहे. इंटरनॅशनल फेम मिस रुबी आणि मेरिंग्वे ट्युनिंग यांच्याबरोबर आम्ही टायअप ॲरेंजमेंट करतो आहोत. तुम्ही पाच लाखांची मदत केली तर एकाच शो मध्ये तुमचे पाच लाख परत मिळतील. शोसाठी मुंबईचे लोक वेडे होऊन जातील. हा शो झाला की देशात सगळीकडे आमच्या नावाची जादू पसरेल. पैशांची रास घरात येऊन पडेल.''

प्रतीपचा मित्र मोन्टू सांगतो, ''मी पॅरिसमध्ये लोकांना या रुबीच्या ट्युनिंग आणि रॅप डान्सवर वेडं होताना बघितलंय.. ती माझ्यासाठी भारतात शो करायला

तयार आहे... चाळीस आर्टिस्टची टीम आहे. बर्फाचं स्टेज, बर्फाचं डेकोरेशन.. बर्फाचेच कॉस्च्युम, रॅप साँग... डान्सच्या स्टेप्स.. अंकल, ढीग पडतील पैशाचे. सगळा प्रोजेक्ट परफेक्ट आहे. द रेप इज दि मोस्ट थ्रिलिंग एक्सपीरियन्स... प्रचंड गर्दी होईल.''

अविनाश त्याला हाकलून देतो.

पण प्रतीपला पाच लाख रुपये देणे अविनाशला भाग पडते. कारण तो ए.व्रजमोहन कंपनीतून बाहेर पडायचा आपला कायदेशीर अधिकार वापरण्याची धमकी देतो... ''तुम्ही माझा भाग मला देऊन मोकळं करा. मी निर्णय घेतला आहे. मला माझं लाइफ माझ्या पद्धतीनं जगायचा अधिकार आहे. त्यात भावनांचा गोंधळ नको.''

रॅप साँग-डान्सिंग शो तुफान यशस्वी ठरतो. त्याला भरपूर प्रसिद्धी मिळते.

दिल्ली, बंगलोर, कलकत्ता वगैरे ठिकाणी शो होतात. अनेक राजकीय नेते व उद्योगपती त्यात रस घेतात. प्रतीप अविनाशपुढे नोटांनी भरलेली सुटकेस ठेवून म्हणतो, ''पप्पा, तुमचे पाच लाख रुपये... त्यावर हव्या तेवढ्या व्याजासह यातून घ्या... हा आमच्या कमाईचा थोडासाचा भाग आहे.. नाऊ टेल मी, मी माझ्या स्वत:च्या पायावर आता उभा आहे की नाही?''

या रॅप साँग शोच्या धंद्यात राजासाहेब पार्टनरशिपच्या बदल्यात कलावृंद असे संस्थेचे नामांतर करून जमिनीचा मोठा प्लॉट देतात. आणि मोन्टूला इलेक्शनमध्ये उमेदवारीही! राजासाहेब हे एक बडे प्रस्थ. निवडणुकीच्या धंद्याचे अनभिषिक्त सम्राट. त्यांचा व्यवसाय काय, मिळकत काय , कोणाला काही पत्ता नव्हता. परंतु नगरसेवकापासून आमदारखासदारापर्यंत निवडून येण्यासाठी त्यांचा आशीर्वाद हवा हे सर्वज्ञात होते.

प्रतीप व राजासाहेब यांची चांगली घसट होते तेव्हा प्रतीप अविनाशला सांगतो, ''आता हिशेबाच्या वह्या लिहून धंदा करायचे दिवस संपले. दादांनी लखपती व्हायचे, तुम्ही करोडपती व्हायचे स्वप्न बघितले असेल. आता अब्जाचे आकडेही छोटे वाटतील, इतक्या शून्यांनी भरून काढणाऱ्यांसाठीच हे जग असणार आहे.''

व्रजमोहनने एकाच्या पुढे थोडी शून्ये चढवली. अविनाशने आणखी काही शून्ये वाढवली. पण प्रतीपचा वेग भन्नाट होता. मोन्टू कलावृंदच्या माध्यमातून परदेशी दौरे करून राजासाहेबांचे स्विस बँकेतील खाते पुष्ट करीत होता. राजासाहेबांची सून कलावृंदची सक्रिय ट्रस्टी म्हणून सांस्कृतिक यज्ञात सहभागी होते. प्रतीप मोन्टूचा उजवा हात असतो.

व्रजमोहनचा व्यावसायिक आणि कौटुंबिक मूल्यांचा आग्रह पुढच्या दोन पिढ्यांमध्येच कसाला लागला होता. पुढच्या पिढ्यांनी नक्कीच व्यवसायधंद्याला प्रगतीपथावर नेले

होते. एकावर बरीच शून्ये वाढवण्यात कसूर केली नव्हती. परंतु व्रजमोहनना कुठेतरी हे सारे निरर्थक, पोकळ वाटत होते. नव्वदीचा टप्पा गाठताना त्यांना कांदिवलीचा आलिशान बंगला सोडून चंपागल्लीतल्या कबुतरवाला चाळीतील खोलीची सय येत होती. त्या घरातल्या घरट्याची पुन्हा पुन्हा त्यांना आठवण होती. तसं घरटं पुन्हा बांधलं गेलंच नाही अशी खंत जाणवत होती.

व्रजमोहन निरवानिरवीच्या मनोवस्थेत जातात. पत्नीला ते म्हणतात, ''आज आयुष्यात फार मोठी चूक झालीय... तुमचा मी फार मोठा गुन्हा केलाय. मी जन्मभर तुम्हाला फसवत आलोय. तुमच्या भोळ्या स्वभावाचा मी फायदा घेतला. तुम्हाला समजू न देता पाप- -''

पत्नी जयाबा विवेकी शांत स्वरात विचारते, ''आज इतक्या वर्षांनंतर तुम्हाला कंचनीबाई आठवली.. उगीच मनावर ओझं ठेवू नका.. मला तुमचे व तिचे संबंध आधीपासून ठाऊक होते. त्यात मला काही वावगे वाटले नव्हते. कंचनीबाई तर बिचारी दु:खी बाई होती. तिला आयुष्यात कुठंच सुख मिळालेलं नव्हतं. तिला तुम्ही काही दिवस शांती तृप्ती दिलीत.. हे तर पुण्याचं काम होतं.. तुम्ही तिला जे दिलंत ते काही माझ्याकडून हिरावून दिलं नव्हतं.. त्याची काळजी मी का करू? तुम्ही माझं मन दुखावेल असं कधी वागला नाहीत. माझं आयुष्य तर नांगरलेल्या भूमीसारखं होतं. प्रेमाचे दोन थेंब पडले तरी पेरलेले बी उगवणार. पण कंचनीबाई तर वैराण वाळवंटासारखी होती. तिच्या आयुष्यात प्रेमाचं थोडं सिंचन करायला तुम्ही निमित्तमात्र झालात. त्याला पाप मानून दु:ख करू नका. तुमच्या ह्या पुण्याच्या कमाईत तर माझाही वाटा असेल.. या बंगल्याला कधीही उजाड म्हणू नका. स्त्री ही तर उंबऱ्यावरच्या एकाच्या आकड्यासारखी असते. शून्यं तर लिहिली जातात, पुसली जातात. त्यांची काळजी कशाला? जोपर्यंत एकाचा आकडा शाबूत आहे, तोपर्यंत उंबरा उजाड होणार नाही.''

एका गुजराती व्यावसायिकाच्या सत्तरऐंशी वर्षाच्या वाटचालीच्या अनुषंगाने गुजराती मानसिकतेत आणि व्यावसायिक जीवनमूल्यात घडलेल्या परिवर्तनाचे या कादंबरीद्वारे घडणारे दर्शन मार्मिक आणि अंतर्वेधक आहे. व्रजमोहनदास यांच्या निष्ठा आणि प्रामाणिक नीतिकल्पना यांची पारदर्शकता, अविनाशची आर्थिक महत्त्वांकांक्षी व्यावसायिकता आणि प्रतीपच्या अर्थार्जनाला लाभलेली नवी राजकीय सांस्कृतिक परिमाणे तसेच नातेसंबंधात आलेले संधिसाधू शैथिल्य- हा पट वाचकांना अस्वस्थ करणारा ठरेल.

**किंमत : १६० रु.  सभासदांना : सवलतीत  पोस्टेज : २५ रु.**

## पुस्तक परिचय

**यशस्वी ‘बँकर’च्या पासबुकातील आनंददायी संपन्न नोंदींचे आगळेपण**

# आनंदाचं पासबुक




**श्याम भुर्के**

'आनंदाचं पासबुक' हे पुस्तक म्हणजे श्याम भुर्के या उत्साही, चलाख, उपक्रमशील, हरहुन्नरी माणसाचं म्हटलं तर आत्मकथन आहे; कारण त्यात त्यांच्या शाळा कॉलेजातल्या दिवसांपासून 'बँक ऑफ महाराष्ट्र'मधल्या कारकीर्दीतल्या घटनांचे तपशील आले आहेत. परंतु हे वैयक्तिक तपशील आले असले तरी त्यातून श्याम भुर्के यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सामाजिक दृष्टी असलेला उपक्रमशील कार्यकर्ता, बँकेत विविध पदांवर विविध शहरात कामे करून बँकेच्या प्रगतीला हातभार लावणारा एक अधिकारी, थोरामोठ्यांच्या सहवासात रमणारा आणि सहकाऱ्यांच्या मनाचा आणि मतांचा आदर राखणारा सुहृद, विनोदाच्या अंगाने कुठलाही विषय रंजकपणे मांडण्याची हातोटी साधलेला वक्ता, कुठल्याही अनुभवाचा सकारात्मक अर्थ लावून स्वत:ला समृद्ध व सर्वस्पर्शी करीत राहिलेला दिलदार प्रामाणिक गुणग्राहक अजातशत्रू वगैरे पैलू प्रकट होत असले तरी बँकिंगच्या क्षेत्रात करीयर करू पाहणाऱ्या कोणाही व्यक्तीला बहुमोल टिप्स देणारे एक हँडबुक म्हणूनही हे पुस्तक पाठ्यपुस्तकासारखे वापरता येऊ शकेल. जनसंपर्क वाढवून बँकेच्या नव्या शाखा काढणे व त्यांचा कारभार लोकाभिमुख करणे, बँकेचे खातेदार वाढविणे, बँकेला नामवंत कलाकार साहित्यिक-क्रीडापटू यांच्याकडून ठेवी मिळवणे, फायदेशीर छोटेमोठे खातेदार मिळवणे, खातेदारांच्या अडीअडचणी जाणून घेऊन त्यांना उत्तम सेवा देणे, कर्मचाऱ्यांचे नीतिधैर्य आणि आत्मसन्मान जपणे व जोपासणे, कोणी खाते बंद करण्यास आला तर त्याची तक्रार ऐकून त्याला अधिक चांगली सेवा देणे, व्यापारउद्योगाला योग्य प्रकारे पतपुरवठा करून त्यांना प्रोत्साहन देणे, राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये व्याजदार सारखे असल्याने आपल्या ग्राहकांना अन्य काही सेवा देऊन ठेवी मिळवणे. (उदाहरणार्थ, नवरात्रात देवीच्या उत्सवकाळात मंदिरात बँकेचे एक्स्टेंशन काऊंटर उघडणे, एकात्मिक ग्रामीण विकास योजना, बायोगॅस प्रकल्प वगैरे योजना प्रामाणिकपणे राबवणे) अशा अनेकविध बाबतीत श्याम भुर्के यांनी दाखवलेली कल्पकता या पुस्तकात पानोपानी दिसते.

या पुस्तकात बँकिंगशी संबंधित शेकडो किस्से आलेले आहेत; त्यामुळे कुठलेही पान उघडून वाचायला लागले की वाचक पुढे वाचतच राहतो. बँकेच्या लॉकरमधली केडगाव देवस्थानची पाऊण किलो सोन्याची मूर्ती आणि सोन्याचा देव्हारा दरवर्षी दत्तजयंतीला केडगावला नेला जाई, एकदा चोरट्यांनी पाठलाग करून मूर्ती पळवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा मूर्ती केडगावला नेण्याऐवजी बँकेच्या स्ट्राँगरूममध्येच एका टेबलावर ठेवून भक्तांना दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात येते. बँकेच्या लॉकरमध्ये अशी सोय केली जाते, ही दंतकथा नव्हे. अशा कल्पकतेची अनेक उदाहरणे या पुस्तकात वाचायला मिळतात.

ग्राहकांच्या घरी जाऊन बचत, चालू, रिकरिंग, मुदत ठेवी, गृहकर्ज, उपभोक्ता कर्ज, कार लोन, शिक्षण कर्ज यातील जास्तीत जास्त सेवांचा लाभ घेण्यासाठी ग्राहकाला प्रवृत्त करणे म्हणजे क्रॉस सेलिंग. त्यावरही भुर्के भर देत.

'बँक ऑफ महाराष्ट्र'मध्ये १९६४ साली क्लार्क म्हणून श्याम भुर्के यांची सेवा सुरू झाली. रहिमतपूर, कोल्हापूर, सातारा, पुणे, अमरावती, नागपूर, सोलापूर वगैरे ठिकाणी त्यांनी काम केले. शाखाधिकारी, ब्रँच मॅनेजर, रिजनल मॅनेजर, ट्रेनिंग सेंटरचे प्राचार्य अशी वाटचाल करीत उपमहाव्यवस्थापक पदावरून ते साठाव्या वर्षी निवृत्त झाले. बँकेतील कामाकडे त्यांनी एक नोकरी म्हणून कधीच बघितले नाही. सामाजिक कामाची एक संधी म्हणून पाहिले. आनंदाची बाब म्हणून पाहिले. आत्मविकासाचे आणि आत्मसंतोषाचे साधन म्हणून पाहिले. बँकर म्हणून नियमांच्या चौकटीत स्वत:ला बंदिस्त न मानता त्या चौकटीला व्यापक स्वरूप दिले. मानवतावादी वृत्तीने समोर आलेल्या प्रकरणांची हाताळणी केली. जनसंपर्कासाठी शाखेत वर्षातून एकदा पानसुपारी व हळदीकुंकू समारंभ आयोजित करून त्याची निमंत्रणे स्वत: समक्ष देण्यास सर्व कर्मचाऱ्यांना प्रवृत्त केले. शाखेतील कर्मचाऱ्यांना त्यांच्या आवडीप्रमाणे कामाचे टेबल देण्याचा कटाक्ष ठेवला. वसुलीच्या कामातही त्यांनी वास्तवाचे भान ठेवून मार्ग काढले.

एक उदाहरण देण्यासारखे आहे. वेल्डिंग मशीनसाठी बँकेने पवार यांना १९६२ मध्ये २५०० रुपये कर्ज दिले पण वेल्डिंग करताना पवार यांच्या डोळ्यात ठिणगी पडली. हॉस्पिटलचा खर्च भागवण्यासाठी वेल्डिंग मशीन विकले. बारा वर्षांनी बँकेने जप्ती आणायचे ठरवले. श्याम भुर्के यांनी त्यांच्या घरी जाऊन माहिती घेतली. पवारांना दोन मुले होती. किराणा दुकानात नोकरी करून त्यांना दरमहा ३५ ते ४० रुपये मिळत. भुर्के यांनी आपल्या शाखेच्या दोन मोठ्या खातेदारांना फोन करून त्या दोघांना जादा पगाराच्या नोकऱ्या मिळवून दिल्या. प्रत्येकी १२५-१३० रुपये पगार त्यांना मिळू लागला. त्यातून दरमहा प्रत्येकी ५० रुपये हप्ता म्हणून बँकेने कर्ज वसूल केले. पवारांच्या घरात बँकेच्या कर्जाचा हप्ता जाऊनही चार पैसे जास्त खेळू लागले.

वसुलीप्रमाणेच बँकेच्या माध्यमातून श्याम भुर्के यांनी समाजकार्यालाही चालना दिली. बाबा आढाव यांच्या हमाल पंचायतीतल्या हमालांना श्रमतारणावर कर्जे देण्याचे धारिष्ट्य दाखवले. ''कर्जाला तारण नको, कारण हवे'' हे बँकेचे तत्त्व आहे असे म्हटले. बाजीराव रोड शाखेपुढच्या भजीवाल्याची मुलगी एसएससी परीक्षेत बोर्डात मेरिटमध्ये आली, तेव्हा बँकेच्या कर्मचाऱ्यांनी वर्गणी काढून भजीवाल्याचा

आणि त्याच्या मुलीचा सत्कार केला. लातूर किल्लारी भूकंपाच्या वेळी किल्लारीला भेट देऊन मृत खातेदारांच्या वारसांना किमान कागदपत्रांवर कर्ज देणे, पुनर्वसनासाठी अल्प मुदतीचे कर्ज देणे, सध्याच्या कर्ज प्रकरणात परतफेडीची दीर्घकालीन योजना आखणे वगैरे निर्णय घेण्यास बँक वरिष्ठांना प्रवृत्त केले. सांस्कृतिक, सामाजिक वाङ्‌मयीन कार्यक्रमांना अनुदान व प्रायोजकत्व देण्यात उत्साह दाखवला.

या कामांच्या निमित्ताने खांडेकर, कुसुमाग्रज, पु.ल., खेबुडकर, व्ही शांताराम, अटल बिहारी वाजपेयी, शिवाजीराव पटवर्धन, सुंदरलाल बहुगुणा, सुरेश भट, चितमपल्ली, श्यामराव कुलकर्णी (स्वामी धर्मव्रत) वगैरेंशी स्नेहसंवाद घडले. त्यांच्याही आठवणींची रेलचेल आहे.

श्याम भुर्के यांच्या या आनंददायी पासबुकातील प्रत्येक एन्ट्री जमेची असून ती आपल्या भावजीवनाला समृद्ध करणारी आहे.

**किंमत : ३००रु.  सभासदांना : सवलतीत  पोस्टेज : ३०रु.**


**टी बुक क्लब २० मधून प्रकाशित होणारी पुस्तके**

**नोंदणी चालू**

| **पुस्तकाचे नाव** | **लेखक** | **अनुवाद** |
|---|---|---|
| स्क्रीम फॉर मी | करेन रोझ | दिपक कुळकर्णी |
| अल्टिमेटम | मॅथ्यू ग्लास | सुदर्शन आठवले |
| द प्रिझनर्स ऑफ बर्थ | जेफ्री आर्चर | लीना सोहोनी |
| द लास्ट ज्यूरर | जॉन ग्रिशॅम | विभाकर शेंडे |
| ब्लड मनी | क्रिस कॉलेट | वैशाली रानडे |
| क्रिटिकल | रॉबिन कुक | डॉ. प्रमोद जोगळेकर |

वाचकांनी आपली सभासद फी (५०रु.) डी.डी. अथवा मनीऑर्डरने मेहता पब्लिशिंग हाऊस येथे पाठवावी.

# अभिप्राय




## द फर्म

**जॉन ग्रिशॅम - अनु. अनिल काळे**

'द फर्म' ही जॉन ग्रिशॅमची पहिली कादंबरी. तिच्यामुळे त्याला अमाप प्रसिद्धी मिळाली.

वकिली पेशाच्या पार्श्वभूमीवरील वेगवान कथानक, थरारक घटनांची तितक्याच कुशलतेने केलेली मांडणी ही ग्रिशॅमच्या लेखनातील वैशिष्ट्ये या कादंबरीतदेखील आढळतात. या कादंबरीचा अनिल काळे यांनी केलेला अनुवाद 'द फर्म' याच शीर्षकाने मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केला आहे. ही कादंबरी मुखपृष्ठापासूनच वाचकांची पकड घेते. मुखपृष्ठावर वरच्या भागात एखाद्या कॉर्पोरेट कार्यालयाचे वाटावे असे चित्र आणि त्याखाली अंधाऱ्या रात्री कशापासून किंवा कुणापासूनतरी लांब पळू पाहणारा एक उंची पेहरावातील तरुण... हॉर्वर्ड लॉ स्कूलमधून शिक्षण घेऊन नुकताच बाहेर पडलेला तरुण वकील आहे मिचेल मॅकडिअर ऊर्फ मिच. अतिशय हुशार असल्याने मिचने प्रतिकूल कौटुंबिक आणि आर्थिक परिस्थितीत आपले कायद्याचे शिक्षण पूर्ण केलेले असते. साहजिकच तो आणि त्याची सुस्वरूप पत्नी ॲबी यांच्यासमोर उज्ज्वल आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न भविष्याची स्वप्ने असतात.

'बेन्डिनी, लॅंबर्ट ॲंड लॉक' ही लॉ फर्म या तल्लख बुद्धीच्या होतकरू तरुणाला हेरते. त्याच्या अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त पगार आणि इतर सुविधा त्याला देऊ करते. तो हुरळून जातो. न्यूयॉर्क, शिकागोसारख्या मोठ्या शहरातील नोकरीच्या इतर तीन ऑफर्स धुडकावून मेंफिससारख्या तुलनेने लहान शहरातील ही नोकरी तात्काळ स्वीकारतो. झपाटून कामाला लागतो. आता त्याला बक्कळ पैसा कमवायचा असतो; फक्त बक्कळ पैसा. त्यासाठी तितकेच प्रामाणिक कष्टही करायची त्याची तयारी असते. मात्र त्याला जेवढे वाटते तितके हे सगळे सरळसोपे नसते. बेन्डिनी, लॅंबर्ट ॲंड लॉक या फर्मची एक छुपी बाजूही असते आणि तिचे धागेदोरे जातात ते

थेट एका कुख्यात माफिया फॅमिलीपर्यंत. आपली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाण्याची त्या फॅमिलीची तयारी असते.

मिच नोकरीला लागल्याच्या काही महिन्यानंतर फर्मच्या कामासाठी गेलेल्या दोन असोशिएटसचा मृत्यू होतो. वरवर पाहता तो एक अपघात असतो. फर्मतर्फे मृतांच्या कुटुंबियांना सर्वतोपरी मदत करण्याची आश्वासने दिली जातात. मात्र फर्ममधल्या अजून तीन वकिलांच्या त्यापूर्वी घडलेल्या मृत्यूंबद्दल त्याचवेळेस मिचला समजते आणि काहीतरी काळेबेरे असल्याचा त्याला प्रथमच संशय येतो. त्यात भर पडते ती वेन टॅरेन्स नामक एक एफ. बी. आय. एंजट त्याला सतत भेटण्याचा, त्याला सावध करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा.

वकिली पेशावर मनापासून प्रेम करणारा मिच एकएक गोष्ट समजते तेव्हा हादरून जातो. पण पूर्ण विचारांती या सर्व गैरव्यवहारांच्या मुळाशी जाण्याचं ठरवितो. एकीकडे माफिया फॅमिली तर दुसरीकडे एफ.बी.आय अशा विचित्र कात्रीत तो सापडतो. पण त्याची पत्नी, भाऊ, भावाचा मित्र आणि त्या मित्राची सेक्रेटरी यांची साथ त्याला लाभते आणि सुरू होतो एक थरारक, जीवघेणा खेळ. एक असा खेळ की ज्यात मिचचे करिअर आणि वैवाहिक आयुष्य सगळे पणाला लागते....

'द फर्म' च्या कथानकात अनेक पात्रे आहेत. असे असूनही कादंबरी कुठेही कंटाळवाणी होत नाही. सर्वच व्यक्तिचित्रणे उत्तम झाली आहेत. मिचला भुलवण्यासाठी चोखंदळपणाचे, कार्यक्षमतेचे आणि संपन्नतेचे दिखाऊ चित्र ज्या प्रकारे ती फर्म त्याच्या समोर उभे करते तो कादंबरीचा सुरुवातीचा भाग उत्कंठावर्धक झाला आहे. ते सर्व वर्णन वाचत असताना वाचकांना त्यामागच्या फर्मच्या काळ्या हेतूंबद्दल शंकाही येत नाही. एफ.बी.आय.चा ससेमिरा चुकवत असतानाच मिच फर्मच्या गैरव्यवहारांचे कागदोपत्री पुरावे गोळा करण्यासाठी एका चलाख पण अतिशय धाडसी योजना आखतो. त्याची पत्नी आणि भावाच्या मित्राची सेक्रेटरी दोघी जिवावर उदार होऊन ती अमलात आणतात. तो सर्व रोमांचकारी घटनाक्रम नेमकेपणाने येतो. वाचकांना अगदी खिळवून ठेवतो.

'द फर्म' सारख्या बांधीव कथानकाचा अनुवाद करताना दोन्ही भाषांची शैली आणि बाज सांभाळणे अतिशय महत्त्वाचे असते. नाहीतर मूळ कलाकृती कितीही उत्कृष्ट असली तरी अनुवाद नीरस, कंटाळवाणा होऊ शकतो. काही मोजके अपवाद वगळल्यास हा तोल या पुस्तकात योग्य रीतीने सांभाळला गेला आहे.

एकूणात हे पुस्तक ग्रिशॅमच्या अगणित चाहत्यांना पुन:प्रत्ययाचा आनंद देते आणि ज्यांनी ग्रिशॅम आधी वाचलेला नाही अशांना त्याच्या चाहतेवर्गात तात्काळ सामील करून घेते.

**प्रीती छत्रे**

(लोकसत्ता १० एप्रिल २०११)

## नवे कोरे

# थ्री कप्स ऑफ टी




### ग्रेग मॉर्टेनसन
### डेव्हिड ऑलिव्हर रेलीन

अनु. सिंधु जोशी

**३५०रु.** पोस्टेज ३०रु.

‘कोणाही व्यक्तीबरोबर काम करायचे असेल तर आम्ही तिच्याबरोबर चहाचे तीन कप पितो.

चहाचा पहिला कप घेताना तुम्ही आमच्यासाठी अनोळखी व्यक्ती असता. चहाच्या दुसऱ्या कपाबरोबर आमचे तुमच्याशी मित्रत्वाचे नाते जुळते.

तिसऱ्या कपाबरोबर आम्ही तुमचे कुटुंबातील एक व्यक्ती म्हणून स्वागत करतो आणि तुमच्यासाठी सर्वस्वही पणाला लावतो. मागे पुढे बघत नाही.’ – हाजी अली.

१९९३ साली के-२ शिखरावरील मोहिमेत अयशस्वी ठरलेला गिर्यारोहक ग्रेग मॉर्टेनसन, वाट चुकून पाकिस्तानातील काराकोरम पर्वतराजीतील एका खेड्यात पोहोचतो. खेड्यातील लोकांच्या दयाळूपणाने भारावलेला मॉर्टेनसन परत येऊन मुलांसाठी शाळा बांधण्याचे वचन देतो. त्या वचनाची पूर्तताही करतो.

तालिबानच्या दहशतवादामुळे पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या दोन देशातील वातावरण तंग आणि धोकादायक बनले तरी पर्वतराजींच्या कुशीत वसलेल्या दुर्गम खेड्यात मॉर्टेनसन एकच नाही, तर पंचावन्न शाळा बांधतो.

**खिळवून टाकणारे साहस आणि मानवतावादी चैतन्य यांचे प्रत्ययकारी चित्र.**

## मेहता पब्लिशिंग हाऊस
### सत्यकथा

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| डायरी ऑफ ॲन फ्रँक : ॲन फ्रँक | अनु. मंगला निगुडकर | १७५ |
| द ब्रेडविनर : डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर | १०० |
| परवाना : डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर | १२० |
| शौझिया : डेबोरा एलीस | अनु. अपर्णा वेलणकर | ११० |
| नॉट विदाऊट माय डॉटर: बेट्टी मेहमूदी | अनु. अशोक पाध्ये | २०० |
| साम्राज्य बुरख्यामागचे : कारमेन बिन लादेन | अनु. अविनाश दर्प | १५० |
| काबुलीवाल्याची बंगाली बायको : सुस्मिता बॅनर्जी | अनु. मृणालिनी गडकरी | १०० |
| ब्लास्फेमी : तेहमिना दुर्रानी | अनु. भारती पांडे | १५० |
| जिहाद | हुसेन जमादार | २२० |
| मयादा - इराकची कन्या : जीन सॅसन | अनु. भारती पांडे | २५० |

**पोस्टेज खर्च वेगळा**

## मेहता पब्लिशिंग हाऊस
# विज्ञान विषयक पुस्तके

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| कर्णपिशाच्च | डॉ. बाळ फोंडके | २२० |
| सुगरणीचं विज्ञान | डॉ. बाळ फोंडके | १८० |
| अश्मजीव | डॉ. संजय ढोले | १९० |
| कल्पित-अकल्पित | सुधा रिसबूड | १४० |
| अस्मानी | शुभदा गोगटे | १८० |
| वसुदेवे नेला कृष्ण | शुभदा गोगटे | १८० |
| स्वप्नचौर्य | निरंजन घाटे | १२० |
| रोबॉट फिक्सिंग | निरंजन घाटे | १३० |
| विज्ञानातील सरस आणि सुरस | डॉ. राहूल गोखले | १८० |

**पोस्टेज खर्च वेगळा**

# पुरस्कार



### * डॉ. जयंत नारळीकर यांना 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार

आकर्षक रोषणाई, भव्य व्यासपीठ,फटाक्यांची आतषबाजी आणि समुद्राच्या लाटा यांच्या साक्षीने २ मे रोजी खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांना गिरगाव चौपाटीवर राज्यपाल के. शंकरनारायणन आणि मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच समारंभात भारताचा मास्टर ब्लास्टर फलंदाज सचिन तेंडुलकर ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना, डॉ. भटकर आणि क्रिकेटपटू झहीर खान यांनाही सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे, विलासराव देशमुख, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिकमंत्री संजय देवतळे, राज्यमंत्रीफौजिया खान आदी मान्यवर उपस्थित होते. शाल श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि पाच लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. राज्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त गेल्या वर्षभरापासून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या कार्यक्रमाची सांगताही गिरगाव चौपाटीवरील या कार्यक्रमाने झाली.

### * ४८ वा मराठी चित्रपट पुरस्कार सोहळा

भारतीय चित्रपटांचे जनक दादासाहेब फाळके यांच्या जयंतीदिनी राज्य शासनातर्फे आयोजित अठ्ठेचाळिसावा मराठी चित्रपट पुरस्कार प्रदान सोहळा यंदाही गेटवे ऑफ इंडियासमोरच्या भव्य आवारात दिमाखात साजरा झाला.

राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ दिग्दर्शक तसेच छायालेखक गोविंद निहलानी तर राज कपूर विशेष योगदान पुरस्कार चतुरस्त्र अभिनेत्री शबाना आझमी यांना प्रदान करण्यात आला.

चित्रपती व्ही.शांताराम विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री-निर्माती-दिग्दर्शिका स्मिता तळवलकर यांना तर चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ

दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना प्रदान करण्यात आला.

यंदा मूकपटापासून ते आजपर्यंतच्या मराठी चित्रपटांचा आढावा  एकाहून एक सरस नृत्याविष्कार सादर करून घेण्यात आला.

सर्वोत्कृष्ट चित्रपट व दिग्दर्शक पुरस्कार अनंत महादेवन यांनी व 'मी सिंधुताई सपकाळ' या चित्रपटाने मिळविला.

ार अर्चना नेवरेकर यांना 'करूया उद्याची बात' या चित्रपटाच्या निर्मितीसाठी देण्यात आला.

प्रसाद ओक याला विशेष अभिनेता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

उत्कृष्ट चित्रपट क्रमांक तीन हा पुरस्कार 'प्लॅटफॉर्म' या चित्रपटाला तर उत्कृष्ट दिग्दर्शक क्रमांक दोन हा पुरस्कार 'धूसर' या चित्रपटासाठी अमोल पालेकर यांना प्रदान करण्यात आला. पुढील वर्षीपासून पुरस्कारांच्या रकमा वाढविण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. मॉरिशसमध्ये २००८ साली शासनाने मराठी चित्रपट महोत्सव भरविला होता त्याचप्रमाणे पुढील काळातही भारताबाहेर महोत्सव भरविण्यासाठी शासन पुढाकार घेईल, असे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले*

*** भारती विद्यापीठ-जीवनगौरव पुरस्कार**

'ग्लोबलायझेशनचे वारे आता शिक्षण क्षेत्रातही वाहू लागल्यामुळे येत्या काही वर्षांत जागतिक स्तरावरील विद्यापीठे भारतात बस्तान बसवतील. या विद्यापीठांना नामोहरम करीत भारतीय विद्यापीठांनी आपला पाया भक्कम केला पाहिजे,' असे आवाहन महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले. भारती विद्यापीठ संस्थेच्या स्थापनादिनानिमित्त जीवनसाधना गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आले. विद्यापीठाचे संस्थापक डॉ. पतंगराव कदम, कुलगुरू डॉ. शिवाजीराव कदम, विश्वजित कदम आदी या वेळी उपस्थित होते.

विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर, रा.ग. जाधव, डॉ. तात्यासाहेब लहाने, अभिनेत्री आशा काळे-नाईक, डॉ. रणजित जगताप यांना जीवनसाधना गौरव पुरस्कार देण्यात आला. शाल, पुष्पगुच्छ व ५१ हजार रुपये असे त्याचे स्वरूप आहे.




**टाईमपास**

**प्रोतिमा बेदी**    अनु. सुप्रिया वकील

मुक्त जीवन जगणाऱ्या प्रोतिमा बेदी यांचं बिनधास्त आत्मकथन

**२५०रु.   पोस्टेज २५रु.**

‘राजकारणाचे क्षेत्र विविध गोष्टींमुळे चर्चेत राहते. राजकारण डावपेचाने किंवा कपटनीतीनेच होते असे वाटते. पण राजकारण सरळ मार्गानेही करता येते. एका बाजूला विद्यापीठाची निर्मिती व दुसऱ्या बाजूला समाजकारण असा दुहेरी भाव साधणारे काही नेते आहेत, याचे कौतुक वाटते,’ असे थोरात म्हणाले.

जीवनसाधना पुरस्कार हा ज्ञानोपासनेचा गौरव असल्याचे प्रा. रा.ग.जाधव म्हणाले.

भालजी पेंढारकर यांनी आमच्या डोक्यावरच ठेवला आणि आई-वडिलांनीही भारतीय संस्कारांचा कधी विसर पडू दिला नाही. त्यामुळे एक अभिनेत्री म्हणून वेगळी ओळख निर्माण करता आली, असे आशा काळे म्हणाल्या. जीवनगौरव पुरस्कार म्हणजे आयुष्याची कृतार्थता आहे, अशी भावना डॉ. जगताप यांनी व्यक्त केली. डॉ लहाने यांनी पुरस्कारामुळे जबाबदारी वाढल्याचे सांगितले.

*** स्नेहवर्धन पुरस्कार**

‘वाचन संस्कृती कमी झाली म्हणून तरुणांच्या नावाने ओरडून फायदा नाही. बदलत्या जीवनशैलीचा विचार करून तरुणांना भावेल असे कसदार मराठी वाङ्मय निर्माण करणे हेच लेखक आणि प्रकाशकांपुढचे आव्हान आहे. तसे झाल्यास वाचनसंस्कृतीही आपोआपच वाढणार आहे,’ असे मत ज्येष्ठ व्यवस्थापनतज्ज्ञ डॉ. प्र. चिं. शेजवलकर यांनी व्यक्त केले. स्नेहवर्धन प्रकाशनातर्फे आयोजित ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार वितरण कार्यक्रमात प्रा. मा.ना.आचार्य (डॉ. प्र.न.जोशी संतमित्र पुरस्कार), डॉ. श्याम टिळक (डॉ. प्र.न.जोशी विज्ञानमित्र पुरस्कार), डॉ. विजया राजाध्यक्ष (डॉ. वि.भि. कोलते समीक्षातमित्र पुरस्कार), स्वाती शिंदे-पवार (संजीवनी मराठे साहित्यसखी पुरस्कार), डॉ. आनंद यादव (ग.ल. ठोकळ ग्रामीण साहित्यमित्र पुरस्कार), सुप्रिया मराठे (निर्मला गोपाळ किराणे प्रकाशकमित्र पुरस्कार), ॲड. रावसाहेब शिंदे (डॉ. पंजाबराव जाधव समाजमित्र पुरस्कार) यांना गौरविण्यात आले.

भेलके यांच्या पारितोषिकप्राप्त लेख आणि डॉ. प्र.न. जोशी यांच्या ‘आर्य’ या पुस्तकांचेही प्रकाशन करण्यात आले. डॉ. शेजवलकर म्हणाले, ‘सध्याचे लेखक पूर्वीच्या लेखकांइतक्या अभिजातपणे लेखन करत नाहीत. त्याचप्रमाणे आपल्याकडे ललितेतर लेखनही होताना दिसत नाही. मराठी भाषा समृद्ध होण्यासाठी सर्वच विद्याशाखांविषयीचे लेखन मराठीतून होणे आणि बदलत्या जीवनशैलीनुरुप नव्याने साहित्यनिर्मिती करू शकणारी पिढी निर्माण होणे आवश्यक आहे.’ नागरिकत्वाची जाणीव प्रगल्भ होण्यासाठी लेखन वाचनाची गरज असल्याचे डॉ. भोसले यांनी सांगितले. सुजाता शेणई यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. स्नेहल तावरे यांनी आभार मानले.

### * आशीर्वाद पुरस्कार २०११

वंदना प्रकाशन तर्फे दिला जाणारा ललित साहित्य प्रकारात प्रथम श्रेणीचा उत्कृष्ट मराठी वाङ्मय निर्मितीसाठीचा 'आशीर्वाद पुरस्कार २०११' सुप्रिया वकील लिखित व मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित 'पॉपकॉर्न या पुस्तकाला मिळाला आहे. वंदना प्रकाशनाचे यंदा रौप्य महोत्सवी वर्ष आहे. सदर पुरस्काराचे वितरण २८ एप्रिल २०११ रोजी सुप्रसिद्ध साहित्यिक शिरीष कणेकर यांच्या उपस्थितीत दादर-माटुंगा सांस्कृतिक केंद्र, माहिम, मुंबई येथे झाले.

### * के. बालचंदर यांना फाळके पुरस्कार

ज्येष्ठ तामीळ चित्रकर्मी के. बालचंदर यांना २०१० चा दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे. आपल्या अनोख्या शैलीने सत्तरच्या दशकात तामीळ सिनेमात ताजे वारे आणणारे बालचंदर (वय ८१) यांना चित्रपटसृष्टीतील आयुष्यभराच्या योगदानासाठी हा पुरस्कार मिळाला आहे. एके काळी महालेखा परीक्षकांच्या कार्यालयात कारकून असलेले बालचंदर यांनी हौशी नाटककार ते चित्रपटसृष्टीतील एक महान व्यक्तिमत्त्व असा विलक्षण प्रवास केला आहे. एम. जी. रामचंद्रन यांच्या 'धैव थाई' या चित्रपटात संवादलेखक म्हणून सुरुवात केली. हिंदी चित्ररसिकांना त्यांची ओळख आहे ती कमल हसन-रती अग्निहोत्रीच्या सुपरहिट 'एक दुजे के लिए'मुळे. 'मारो चरित्र' नावाने त्यांनी हा चित्रपट मुळात तमीळमध्ये तयार केला होता. बालचंदर यांना १९८७ मध्ये 'पद्मश्री'ने गौरविण्यात आले होते.

### * नर्गिसदत्त पुरस्कार

श्री समता पतसंस्था नर्गिसदत्त पतसंस्था व कृष्णकांत कुदळे फाऊंडेशन च्या वतीने वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी पुरस्कार जाहीर झाले असून, त्यात 'श्री समता पुरस्कार' विवांता ताज ब्लू डायमंड या संस्थेला, तर नर्गिसदत्त पुरस्कार सिने अभिनेत्री स्मिता शेवाळे यांना जाहीर झाला आहे. रोख अकरा हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

हॉटेल सेंट्रल पार्क येथे एक मे रोजी जलसंपदामंत्री (कृष्णा खोरे महामंडळ) रामराजे नाईक निंबाळकर यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण झाले. यावेळी पुणे सेवासदन संस्थेच्या अध्यक्ष शशी किर्लोस्कर, महापौर मोहनसिंग राजपाल, कृष्णकांत कुदळे आदी उपस्थित होते.

श्री समता पतसंस्थेच्या वतीने पुणे जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट पतसंस्थेला देण्यात येणारा 'श्री समता सहकार पुरस्कार' बाणेर येथील योगीराज सहकारी पतसंस्थेला, 'सुनील दत्त पुरस्कार' रक्ताचे नाते चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष राम बांगड यांना देण्यात आला आहे.

## * पंडित गणेश्वरशास्त्री द्राविड यांना पुरस्कार

फुलगाव येथील श्रुतिसागर आश्रमामार्फत काशी येथील न्यायरत्न पंडित गणेश्वरशास्त्री द्राविड यांना भगवत्पूज्यपाद आदिशंकराचार्य पुरस्कार जाहीर झाला आहे. २१ हजार रुपये, मानपत्र, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्काराचे हे पहिलेच वर्ष आहे. महामंडलेश्वर भागवतानंद गिरी महाराज, संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. अजित कुलकर्णी आणि पं. वसंत गाडगीळ यांच्या उपस्थितीत स्थितप्रज्ञानंदलिखित 'कठोपनिषद' या ग्रंथाचेही प्रकाशन झाले.

## * आश्वासक पत्रकारिता पुरस्कार

पत्रकारितेत उल्लेखनीय काम केल्याबद्दल पत्रकार वरुणराज भिडे मित्रमंडळाचा 'आश्वासक पत्रकारिता पुरस्कार' 'लोकमत'चे मुंबई येथील ब्युरो चीफ अतुल कुलकर्णी यांना देण्यात आला.

शहरी भागासाठी देण्यात येणारा आश्वासक पुरस्कार देवेंद्र गावंडे यांना तर ग्रामीण भागासाठी देण्यात येणारा पुरस्कार राहता (शिर्डी) येथील दैनिक 'सकाळ'चे बातमीदार सतीश वैजापूरकर यांना देण्यात आला. यापूर्वी मुख्य पुरस्कार अरविंद व्यं. गोखले, प्रताप आसबे, राजीव साबडे, मंजिरी दामले, सुरेश भटेवरा, राही भिडे, प्रकाश अकोलकर, प्रकाश बाळ, विजय नाईल व प्रतिमा जोशी यांना देण्यात आले आहेत.

गावंडे यांनी लोकसत्तामध्ये गेली अकरा वर्षे बातमीदार म्हणून काम केले आहे. चौदा वर्षांपासून सातत्याने नक्षलवादी चळवळ तसेच नक्षलवाद्यांच्या नावाखाली आदिवासींची होणारी पिळवणूक, आदिवासींचे प्रश्न, आंध्र सीमेवरील बारा गावांचा प्रश्न आदी प्रश्नांवर लेखन केले आहे.

पुणे विद्यापीठाच्या पदविका अभ्यासक्रमाला असलेल्या दोन विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने पारितोषिक देण्यात आले.

## * 'व्हाइटली गोल्ड' पुरस्कारासाठी शास्त्रज्ञ रमण आत्रेय यांना नामांकन

निसर्गसंवर्धनासाठी लंडन येथील व्हाइट फ्रेंड फॉर नेचरतर्फे दिल्या जाणाऱ्या 'व्हाइटली गोल्ड' पुरस्कारासाठी जगभरातून सात शास्त्रज्ञांना नामांकन मिळाले असून, त्यामध्ये पुण्यातील शास्त्रज्ञ रमण आत्रेय यांचा समावेश आहे. शहरातील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च या संस्थेत आत्रेय कार्यरत असून त्यांनी अरुणाचल प्रदेशात स्थानिक पातळीवरील ईगल नेस्ट अभयारण्यात आदिवासींची मदत घेऊन पक्षिसंवर्धनाचे काम केले आहे. आत्रेय यांना त्यांच्या प्रकल्पासाठी साठ हजारांचे अनुदान व्हाइट फ्रेंड फॉर नेचर तर्फे दिले जाणार आहे.

### * वालावलकर, घोटगे, कुंटे आणि साने यांना शाहू मोडक पुरस्कार

शाहू मोडक प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ अभिनेत्री सुलभा देशपांडे यांच्या हस्ते तेजश्री वालावलकर, गायक ॠतुज घोटगे, अजित कुंटे आणि ज्योतिषी उदयराज साने यांना शाहू मोडक पुरस्कार प्रदान करण्यात आला. रंगमंच कलाकार शुभांगी मांजरेकर यांना उपचारासाठी अर्थसाह्य करण्यात आले. संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे, अभिनेता अजिंक्य देव आणि प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रतिभा शाहू मोडक यावेळी उपस्थित होत्या. सुलभा देशपांडे म्हणाल्या, ''एखादे व्यक्तित्व आपलेसे करून त्याचे दर्शन घडविण्याचा अभिनय करणारा खरा नायक असतो. शाहूरावांचा अध्यात्म, तत्त्वज्ञान आणि ज्योतिष यांचा अभ्यास त्यांच्या भूमिकांतून प्रकट होत असे.''

देखणे म्हणाले ''शाहू मोडक हे कलेच्या विश्वात सत्याचे दर्शन घडविणारे कलाकार होते. चिंतनातून माणूस तत्त्ववेत्ता होऊ शकतो, त्याचे मोडक हे उदाहरण आहे.'' अजिंक्य म्हणाला, ''पायलट व्हावे असे मी बालपणी ठरविले होते. मोठा झाल्यावर संगणक क्षेत्रात काम करण्यासाठी अमेरिकेला जायचे होते; पण, मी कलाकार होणार हे भाकीत शाहूरावांनी वर्तविले होते आणि ते खरे ठरले.'' प्रतिभा शाहू मोडक यांनी कविता सादर केल्या.

### * निखिल वागळे यांना स.मा. गर्गे पुरस्कार

बीड जिल्हा पत्रकार संघाच्या स.मा.गर्गे राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कारासाठी या वर्षी 'आयबीएन-लोकमत' वृत्तवाहिनीचे संपादक निखिल वागळे यांची निवड करण्यात आली. 'आम आदमी का पत्रकार' अशी ओळख असलेल्या निखिल वागळे यांनी १९७७ मध्ये पत्रकारितेत प्रवेश केला. सुरुवातीला मुक्त पत्रकार म्हणून काही दिवस काम केल्यानंतर त्यांनी 'दिनांक' या मराठी साप्ताहिकाच्या संपादकपदाची धुरा सांभाळली. श्री. वागळे यांनी १९८३मध्ये 'अक्षर प्रकाशन' ही स्वत:ची संस्था स्थापन केली. त्याद्वारे 'एकच षटकार', 'चंदेरी', 'आपलं महानगर' आदी प्रकाशने सुरू केली. देशात गेल्या ३० वर्षांत घडलेल्या अनेक घटनांचे वार्तांकन केले आहे.

### * डॉ. माशेलकर यांना लोकमान्य पुरस्कार

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांना लोकमान्य सोसायटीतर्फे लोकमान्य पुरस्कार जाहीर झाला आहे. पाच लाख ५१ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे यंदाचे दुसरे वर्ष आहे. गोव्यातील मडगाव येथील रवींद्र भवन येथे १० मे रोजी पुरस्कार वितरण झाले.

### * डॉ. गुरुप्रसाद यांना पुरस्कार प्रदान

संरक्षण संशोधन विकास संस्थेतर्फे (डीआरडीओ) दिला जाणारा सर्वोत्कृष्ट शास्त्रज्ञाचा पुरस्कार पुण्यातील विकास व संशोधन संस्थेचे (आर.अँड डी.ई.ई) संचालक डॉ. एस.गुरुप्रसाद यांना देण्यात आला. गुरुप्रसाद यांनी कॉंबॅट इंजिनिअरींग, वेपन लॉंच सिस्टिम; तसेच रोबो संबंधित संशोधनात मोलाचे काम केले आहे. ब्राम्होस लॉंचर प्रकल्पाच्या संचालकपदाची जबाबदारी त्यांनी पार पाडली होती. तसेच प्रोजेक्ट 'सर्वत्र'मध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. लष्करासंबंधी तांत्रिक विषयांवर डॉ. गुरुप्रसाद यांचे अनेक शोधनिबंध प्रकाशित झाले आहे.

## * अ. भा. मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे पुरस्कार

अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणेचे २००९ चे पुरस्कार ९ मे २०११ रोजी पुणे येथे प्रसिद्ध लेखक डॉ. अनिल अवचट यांच्या शुभहस्ते देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून प्रसिद्ध बाल सिाहित्यिका सरिता पदकी या उपस्थित होत्या. श्री. गोविंद गोडबाले, मदन हजेरी,अनिल कुलकर्णी, राधिका लोखंडे यांनी परीक्षणाचे काम पाहिले.

१. सौ. माया धुप्पड,जळगाव -पावसाची राणी -काव्य -ग.ह. पाटील पुरस्कार
२. मुकुंद निगवेकर,कोल्हापूर-वनरक्षक -कादंबरी-जोशी पुरस्कार
३. प्रभाकर चौधरी, जळगाव-राजांच्या झकास गोष्टी-बालकथा-वा.गो.आपटेपुरस्कार
४. सौ. मालविका देखणे, नागपूर-पर्यावरण कथा-किशोरकथा-दयार्णव कोपर्डेकर पुरस्कार
५. ज्ञानदा आसोलकर, सावंतवाडी-वॉल्ट डिस्ने-चरित्र-स.गो. देसाई पुरस्कार
६. वि.गो. भागवत, पुणे-सामान्य ज्ञानासाठी-विज्ञान-श्री. बा. रानडे पुरस्कार
७. सौ. संध्या देशपांडे, बेळगाव-तीन एकांकिका-एकांकिका-रा.वा.शेवडे गुरुजी पुरस्कार
८. महावीर जोंधळे, औरंगाबाद-रामनाथीचा पाऊस-ललित-सुलोचना नातू पुरस्कार
९. श्रीनिवास पंडित, पुणे-अघळ-पघळ-अनुवाद-भा.रा.भागवत पुरस्कार
१०. ऋग्वेद मासिक-उत्कृष्ट दिवाळी अंक-बालमित्र मासिक पुरस्कार
११. इंदुमती अरकडी-बालसाहित्य -जत्रा -दिनकर-लोखंडे पुरस्कार

## * 'सीझर कर म्हणतेय माती' काव्यसंग्रहाला पुरस्कार

''कुसुमाग्रज यांच्या नावाने मिळालेला पुरस्कार हा मातीचा आणि मातीतील माणसांचा गौरव आहे. या मातीने अभिव्यक्त होण्यासाठी माझी निवड केली आणि कवितेच्या माध्यमातून ती प्रकटली,'' अशी भावना प्रसिद्ध कवयित्री कल्पना दुधाळ यांनी व्यक्त केली. डॉ. द.भि.कुलकर्णी यांच्या हस्ते दुधाळ यांच्या 'सीझर कर म्हणतेय माती' या कवितासंग्रहाला कुसुमाग्रज पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा कवितासंग्रह प्रकाशित करणाऱ्या नाशिक येथील नवसिद्धान्त प्रकाशनच्या डॉ.मनीषा जगताप

यांनाही पुरस्कार प्रदान करण्यात आला.

न्या नरेंद्र चपळगावकरलिखित 'तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ' या पुस्तकाला जाहीर झालेला शं.ना. जोशी पुरस्कार डॉ. विकास चित्रे यांनी स्वीकारला. परिषदेच्या कार्याध्यक्षा डॉ. माधवी वैद्य, प्रमुख कार्यवाह प्रा. मिलिंद जोशी यावेळी उपस्थित होते. दुधाळ म्हणाल्या, ''शेतीमध्ये राबणाऱ्या बाईचे कष्ट यापूर्वी मराठी साहित्यामध्ये फारसे प्रतिबिंब झाले नव्हते. कवितेतील प्रत्येक शब्दाने मला अडवलं, थांबवलं आणि संवाद साधला''. द.भि.कुलकर्णी म्हणाले, ''बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील भावोत्कटता आणि सर्जनशीलता दुधाळ यांच्या काव्यातून अवतरली आहे. कवीला शब्दभान, भाषाप्रभुत्व, जीवनमूल्यांचे भान आणि कल्पकता याची जाणीव असावी लागते.'' यावेळी रमण रणदिवे आणि डॉ. सदाशिव शिवदे यांनी परीक्षकांचे मनोगत व्यक्त केले.

*** प्रा. रा.ग. जाधव यांना मसाप सन्मान पुरस्कार**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वर्धापनदिनानिमित्त 'मसाप सन्मान पुरस्कार' ज्येष्ठ समीक्षक प्रा. रा.ग. जाधव यांना, तर 'डॉ.भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' ज्येष्ठ पत्रकार किरण ठाकूर यांना देण्यात आला आहे. २६ मे रोजी संध्याकाळी 'लोकसत्ता'चे निवासी संपादक मुकुंद संगोराम, डॉ. रामचंद्र देखणे, अशोक याळगी, डॉ. अरुणा ढेरे, प्रकाश होळकर, दीपक शिकारपूर मृणालिनी गडकरी, डॉ. चंद्रशेखर फणसळकर, अनंत भावे व शांता गोखले यांना 'ग्रंथकार पुरस्कारा'ने गौरविण्यात आले.

परिषदेच्या वतीने देण्यात आलेले ग्रंथपुरस्कार पुढीलप्रमाणे (कंसात पुस्तकाचे नाव

भालचंद्र नेमाडे (हिंदू-जगण्याची समृद्ध अडगळ),
डॉ. आनंद पाटील (समीक्षा अपहरण),
डॉ. कृ.ज्ञा.भिंगारकर (संत तुकाराम आणि संत कबीर),
कन्हैयालाल जळगावकर (जात-वर्ण व्यवस्था विचार: एक कृतिबद्ध भूमिका),
डॉ. अशोकराव ढगे (पीक वाढीसाठी चौफेर तंत्र),
भारती पांडे (सोमाली माम, द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स),
जयवंत अवघडे (सरपंच),
भानू काळे (अंतरीचे धाव),
नंदिनी पब्लिशिंग हाऊस, पुणे (ॲण्ड द ऑस्कर गोज् टू...)
ज्योत्स्ना कदम (सर आणि मी),
रवींद्र शोभणे (महाभारताचा मूल्यवेध),
